# तडीपार

८३

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय का. वा.
दा.क्र. ८९८९

शंकरराव रा. खरात

IRBK-0108989

IRBK-0108989

साधना प्रकाशन : पुणे २.

किंमत : रु. ३·५०

ी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
केल्यास घटना नियम क्र. ७ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

# त डी पा र

अनुक्रम ३०९८२
वाचनालय शाखा

शंकरराव रा. खरात

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ८९८९ नों. दि.
वि. बा. वा.

IRBK-0108989

IRBK-0108989

साधना प्रकाशन : पुणे २.

किंमत : रु. ३·५०

प्रकाशक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन
४३०-३१ शनिवार
पुणें २
*
मुद्रक
चिं. ग. वझे
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार
पुणें २
*

© शंकरराव रा. खरात

चित्रकार
सर्जेराव घोरपडे

प्रसिद्धि
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंति
१४।४।१९६१

म. ज्योतिबा फुले

यांच्या

पवित्र स्मृतीस.

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| उचल्या | .... | १ |
| वैदु | .... | १७ |
| माकडवाला | .... | ३१ |
| बेलदार | .... | ४० |
| कैकाडी | ... | ५६ |
| डोंबारी | ... | ६८ |
| फांसेपारधी | ... | ७६ |
| वडार | .... | ८६ |
| भामटा | .... | १०० |
| कोल्हाटी | ... | ११२ |
| नंदीवाला | ... | १२५ |
| मांगगारुडी | ... | १३६ |

# उचल्या

गडद रात्रीं गांवच्या उघड्याबोडक्या माळावर भप्कन् जाळ झाला आणि खोल अंधारांत दडलेल्या सोन्या उचल्याच्या खोपटाचा उमट झाला. दिवसां रानोमाळ गेलेली सोन्याची बायको सारजा व मुलें एका वाटेनें रात्र करून खोपटावर आलीं. सोन्या दुसऱ्या वाटेनें आला. सगळेच रात्रीला खोपटावर आले. पक्षी विसांव्याला येतात तसे. आणि ध्यादुपारा गप्पगार उभ्या असलेल्या खोपटाला जाग आली.

खोपटापुढें चूल पेटली होती. सारजा व पोरें चुलभोंवतीं बसलीं होतीं. दिवस्या पेटवावयाला बसलेल्या भुतावानी. सारजाच्या हातांतून तव्यांत भाकरी पडत होती. मुलांची भुकेली नजर त्यावर झडप मारीत होती. सोन्यानें चुलींतला इंगळ भरलेल्या चिलमीवर ठेवला व झुरके हाणूं लागला. धूर सोडूं लागला, जाळाच्या उजेडांत बसलेल्या आपल्या नागड्या-उघड्या मुलांकडे तो बघत होता. अधून-मधून दाट अंधारांत तो सहज आपली बारीक नजर घुसवत होता, तो न्याहाळत होता, हेरत होता.

जाळाच्या उजेडावर खालच्या लवणांतून-पांढरा गडी थेट वर निघाला. अंधारांतून दगड-टोळे तुडवीत नीट जाळाच्या खुणेवर खोपटाकडेच आला. सोन्याची बारीक नजर त्याच्यावर खिळली. अंधारांत पांढरा सफेत गडी बघून सोन्या जरा दचकलाच. त्यांत रातकिड्यांची किर किर अधिकच वाढली आणि अंधारांत भीति अधिकच उठली. आपल्या अंगावर येत असलेल्या गड्याला बघून सोन्याच्या मनांत झटकन् आंदिशा आली.

“ आयला खालच्या वस्तीवरनं गडी मागावरंच आला वाटतं ! ” गडी नेटानेंच खोपटाजवळ येतोय हें बघून सोन्यानें चिलीम विझवली व हलकेंच

आपल्या बायकोला बोलला, “ सारजे ! अग गडी आपल्या कोपीवरच नीट आला बग ! ते कणसाचं पोतं मागल्या डबऱ्यांत तरी टाक ! ”

सारजाची नजर झटकनू खालच्या बाजूला झाली आणि “ खरंच कीं गडी नीट पुढं आला ! ” म्हणून ती चटकनू उठली व नवऱ्याला बोलली, “ अव बघताय काय ! गड्याला पुढं आडवं तरी व्हा ! ”

सोन्याच्या डोक्यांत चटकनू बायकोची हिकमत शिरली. चोरीचा माल-मुद्या गडपकरीपर्यंत पुढें आलेल्या गड्याला ‘ कां आलां ? कोण पाहिजे ? अशा बोलण्याच्या नादांत ठेवावा म्हणून सोन्या झटक्यानें उठला. लहान पोराला घेऊन गड्याच्या आडवा गेला. तेवढ्यांत सारजानें कणसांचें पोतें खोपीमागें डबऱ्यांत टाकून दिलें आणि चुलीपुढें येऊन बसली. पुढें बघून भाकरीचें पीठ मळूं लागली, काऱ्या नजरेनें त्या गड्याकडे बघूं लागली. सोन्या चार पावलें पुढें गेला. त्याच्या मागें कुत्रीं हाललीं. लांबूनच त्या गड्याला त्यानें हाटकलें, “ कोण गडी हाय ! ”

आवाजाचा रोख त्या बेरक्या कुत्र्यांच्या ध्यानीं आला व तीं भुंकत त्या गड्याच्या अंगावर धांवलीं. भुंकून भुंकून कालवा करूं लागलीं. कुत्र्यांच्या आवाजानें खोपीपुढची गाय खडबडून उठली आणि कान टव-कारून कुत्र्याच्या आवाजाच्या दिशेला बघूं लागली. नव्या माणसाच्या वासानें ठिसकारूं लागली.

तेवढ्यांत तो गडी पुढेंच आला. खोपीपुढें पेटलेली चूल बघून त्याच्या मनांत धीर आला, ‘ आपली भन ! आपला मेव्हणा ! आज वस्तीला घावला बरं झालं ! ’ म्हणून त्याला बरें वाटलें आणि त्यांतच आपला मेव्हणा चार पावलें आडवा आला हें बघून त्याला आधिकच धीर आला. आपल्या मेव्हण्याचा आवाज ऐकून लांबूनच तो उलटा आवाज देत म्हणाला,

“ मी हाय ! ”

“ मी ? पन कोन ? ”

“ फर्जा नव्हका मी ? ”

असें बोलून तो पुढेंच आला. फर्ज्याचा आवाज ऐकून सोन्याचा जीव खालीं पडला आणि आपला मेव्हणाच सांगून धाडल्यासारखा आला म्हणून सोन्याला एकदम बरें वाटलें. त्याच्या मनांतील धुकधुक पार गडप झाली. कुत्र्याचा कालवा चालला होता. तीं फर्ज्याच्या अंगावर धांवत होतीं. सोन्यानें त्यांना एकदम 'हाड' म्हणून गप्प केलें. वातावरण पुन्हां शांत झालें. त्यावर पुन्हा सोन्या फर्जाला. म्हणाला, "काय सांगावा हाय ! माणूस लया दिसा येतं तर पुढं सांगावा धाडतं ! त्यांत एवढी रात करून येणं केलं ! आलां बरं झालं !" असें बोलून तेथूनच ओरडून बायकोला म्हणाला, "आग ! सांगून धाडल्यावानी मनीला बघायला मुराळी आल्यागत पावणा आला बग !"

"खरंच आपला धाकटा भाऊ लया दिसा आला कीं !" म्हणून सारजा पिठाच्या खरकट्या हातानेंच चुलीपुढून उटली व पुढें आली. फर्जानें सोन्याचा हातातलें मूल घेतलें. ते खोपटापुढें आलें. चुली भोंवतालचीं पोरं उठून उभीं राहिलीं. जळाच्या उजेडांत मामाचा चेहरा हेरून पुढें आलीं, त्याच्या हाताला झट्या घेऊं लागली.

सोन्यानें पावण्याला बसायला पोत्याचें पटकार टाकलें. त्यावर फर्जा बसला. शेवटची भाकरी टाकून सारजा फर्जाला बोलली, "दादा कसा हाय ?"

"ठीक हाय !

"पोरं ?"

"तीबी बरी हायती !"

"लया दिवसांनीं येणं केलं ?"

"काय करायचं ? पोटापाण्याचं आडतं ! अन् त्या झपाट्यांत काय तरी हातनं घडतं ! मग त्याच्या पुढचं तुमाला काय सांगायला पायजे ?"

"मग तु कुठं धावला हुतास ?"

"तर काय ! जोंधळ्याची कणसं खुडली म्हणून धावलं ! अन् महिन्याचीं सजा भोगून आलुं !" असें बोलला अन् उगीच हंसला.

"मग आमाला न्हाय कळवलं !" ती काळजीच्या सुरांत बोलली.

त्यांत काय कळवायचं ? एकदां का दोनदां ! नेहमीचंच !" तो निर्ढावलेल्या आवाजांत सहजपणें बोलून गेला.

" अर तें खरं ! पण एवढं कसं दगडाच्या काळजावानी ? असें बोलून पुन्हां सारजा म्हणाली, " एवढ्या रातीचं का येणं केलं ! "

" आलं ! तुज्या कोंवड्याच्या रशाचा आठव झाला, त्यांत दुसरं एक नडीचं काम निघालं ! "

" कशाचं काम ? "

" उद्यां बोलीन.......? " एवढेंच आखडत तो बोलला अन् काळजींत बसला.

" काय का असंना, आलात बरं झालं. आतां चार-आठ दिस राहा. आमच्या घरची चटणी-भाकरी खा. अन् मग खुशाल जा ! " लया दिसांनीं भावाला बघून ती मनांत हारकून गेली होती.

बोलतां बोलतां चुलीवर कोरड्यास शिजलें. सारजानें आपल्या भावाला एका थाळींत वाढलें. नवऱ्याला पितळींत वाढलें. दोन पोरें फर्जाच्या ताटांत बसलीं. दोन मुलें सोन्याच्या ताटांत बसलीं. जेवणें झाल्यावर बोलत बोलत त्यांना कधीं डोळा लागला, याचें कुणालाच भान राहिलें नाहीं.

रात्र सरली. दिवस उजाडला. उन्हें पडलीं. सगळा माळरान उन्हांत उजळून निघाला. त्यांत एकटें खोपाट अधिकच वाळींत टाकल्यावानी दिसूं लागलें. येरवाळींच उठून सोन्यानें ओढ्याच्या धारेच्या दोन घागरी पाणी आणलें. फर्जा दिवस उगवावयाच्या आंत ओढ्यानें आंघोळ करून आला.

' पावणा लया दिसा दारीं आला. त्याला निशापाणी करावी. चांगली पोटभर सागुती खायाला घालावी !' असा विचार सोन्याच्या मनांत सारखा घोळूं लागला.

सारजाला वाटे, ' आपला भाऊ फार दिसांनीं आला. त्याला चांगली चपाती करून घालावी. गुळभात करावा. ' पण हें करायचें कसें ? घरांत दाणा नव्हता का तांबडा पैसा नव्हता ! दाळयानं रात्रीं खुडून आणलेलीं कणसेंच झोडपून खाण्याचा प्रसंग आला होता ! आतां भावाला तरी गोडधड घास घातला पाहिजे. सकाळीं उठल्या उठल्या तिच्या डोक्यांत

सारखा विचार उसळून येत होता—पण नवऱ्याला कसें बोलावें म्हणून गप्प बसत होती.

दिवस चढत आला, अंगाला ऊन लागूं लागलें. तसा सोन्याच्या मनांतला विचार अधिकच उसळूं लागला. पावण्याला निशापाणी करावी. कोंबड्याचा चांगला झणझणीत रसा घालावा. नाहींतर बकऱ्याकोकराचा चमचमीत कडाण सरोस्तर घालावें...पण हें कसें म्हणून त्याच्या विचाराला दुसरी वाट घावली, गति मिळाली. तेव्हां तो बायकोला म्हणाला, " अग तुजा भाव किती दिसांनीं आलाय. तेला चांगलं करून घाल ! "

त्यावर फर्जा मध्येंच बोलला, " आपल्या गांठी-भेटी झाल्या. त्यांत सगळं आलं ! खाण्या-पिण्यांत काय हाय ! "

" छे ! छे ! पात्रणं असं कसं बोलताय् ! तुमच्यासाठीं जीव घाण टाकूं, पण तुमाला चार चांगलं घास घालूं ! "

त्यावर आपल्याच घोरांस असलेल्या फर्जाची कावरी-बांवरी नजर सगळ्या रानोमाळ भरारली ! पुन्हां ध्यानावर येऊन तो म्हणाला, " कशाला निस-कारणी जीवाला यातायात करून घेताय ? "

" त्यांत कसली यातायात ? आपल्या हातची गोष्ट.... ! " सोन्या पुढें बोलणार तेवढ्यांत सारजानें मध्येंच तोंड घातलें व जरा निबार आवाजांत नवऱ्याला बोलली, " हे बगा ! आज काय तरी सागुतीचा बेत करा. माजा भाव चार घास खाईल. अन् पोरांना रसा-पाणी मिळेल. पावण्याच्या नांवानं घरा-दाराला तरी पाणी मिळेल ! "

' आपणहून आपली बायकोच बोलली, आतां कशाला माघार घ्या ? नाहींतर आपली दानत उघडी पडावयाची. ' असा ईर्षेचा विचार सोन्याच्या मनांत आला व त्याच तडाख्यांत तो बोलला, " अग, पावण्याला सरोस्तवर कोंबडी-बकरीं खायाला घालीन, त्यांत काय ? त्यो आपल्या हातचा मळ ! " असें बोलून पुढच्या तयारीच्या बेताने पुन्हां बायकोला म्हणाला, " मी बाहेरचं बघतूं ! तूं घरातलं बघ ! "

" ठीक हाय ! घरांत मिरची उडली. कुठंतरी मळ्यांत जाते, चार मिरच्या खुडून आणते. त्यो डाग.... वाण्याच्या दुकानीं ठेवून मापटं-चिपटं गव्हाचा दाणा आणतें ! "

तें तुजं तूं सांभाळ ! माजं मी सांभाळतों ! ”

“ तुमी मात्र लय रात लावूं नका. नीट सांभाळून या ! माजं मी यरवाळींच दिवसांबरोबर येती ! ”

नवरा-बायकोचें बोलणें चाललें होतें. फर्जा मुकाट्यानें ऐकत होता. त्याची नजर चार वाटा बघत होती. पुन्हा माघारीं फिरत होती. तो आला होता एका कामाला. पण नवरा-बायकोच्या बोलण्याच्या नादांत तो गप्पच होता. आपली कावरी-बावरी नजर आजूबाजूला फिरवत होता. माणसांचा सुगावा घेत होता.

घरांतला सगळा बेत झाला. सोन्या पुढच्या तयारीला लागला. मध्येंच बायकोला म्हणाला, “ तुज्या भावाला माज्या सोबतीला पाठवती का ! एकाला दोघं. लवकर काम करून येऊं ! ”

“ कशाला तेला ! तुमच्या वाटा तुमाला माहीत ! तेला काय या रानचं माहीत ? ”

तोंच फर्जानें बहिणीचा बोल हेरला. मेव्हण्याचा बेत ओळखला. जनावर मेल्याचा वास जसा घारी-कावळ्याला लागतो, तसा फर्जाला सोन्याच्या बोलण्याचा वास लागला. त्याला मार्ग कळला आणि त्यावर तो स्वतःच बहिणीला म्हणाला,

“ काय घरांत हाय तें करा. कशाला दुसऱ्या येपांत पडताय ! ”

त्यावर सारजा लागलीच म्हणाली, “ आर बाबा ! हें याप जल्माला लागल्यात ! तुज्या नावानं माजी पोरं चार घास खात्याली. तूं कशाला मोडा घालतुय ! ”

आपल्या बायकोचा बोल सोन्याला एकदम पटला व तोहि पाहुण्याला बोलला. “ पावणं घरीं बिनघोरी बसा ! बहीण-भावंडं चार सुखा-दुःखाच्या गोष्टी बोला. काम करून मी येरवाळीच येतुं ! ”

बोलानें बोल वाढला. दिवस डोक्यावर आला. ऊन झालें आणि त्याबरोबर सोन्याच्या डोक्यांतले विचार अधिकच तापले. त्या झटक्यांत सोन्यानें धोतर खांद्यावर टाकलें. दारांतून हालला. वरच्या अंगानें काटवनांत निघाला. झपाझपा पावलें टाकीत पुढें चालला.

सारजा निघण्याच्या तयारीला लागली. जुन्यारांत लहान पोराला पाठीशीं बांधलें. दुसऱ्या एका कळत्या पोराला बरोबर घेतलें आणि गांवाखालच्या अंगाला मळया-वस्तीची वाट धरून निघाली.

थोरल्या पोरानें दारांतली गाय सोडली, शेरडाची पेंडी फोडली व तें ओढयाच्या कांठानें निघालें. त्याच्यामागें दारांतलीं दोन्हीं कुत्रीं निघालीं. फर्जा खोपीजवळ लिंबाच्या झाडाखालीं पटकर टाकून त्यावर कलंडला. लिंबाच्या डाहाळीवर, या फाट्यावरून त्या फाट्यावर उड्या हाणणाऱ्या चिमण्या पाखरांकडे बघत पडला. त्याची नजर वर गेली आणि एका जागीं तरंगत असलेला बहिरससाणा सटक्यानें लिंबाच्या झाडांत घुसला व जिवाच्या भीतीनें झाडांतल्या चिमण्या रानोमाळ भरारल्या. फर्ज्याच्या डोक्यांत विचाराचा कालवा उठला. पडलेली जागा अंगाखालीं हादरूं लागली. विचाराच्या कालव्यानें तो उठून बसला व आजूबाजूला त्यानें दृष्टि टाकली...

उन्हाचा भर होता. सोन्या काटवनांतून चालला होता. त्याची धुंडाळती बारीक नजर आजूबाजूला फिरत होती....उंच आभाळीं घार तळपत होती. ....तिची नजर स्थिरावली आणि ती मुटका होऊन गोळीगत खालीं आली. झपाटा मारून झाडावर विसावली. सोन्याची नजर घारीमागें धांवली आणि त्याच्या वासना सागुतीच्या वासानें अधिक उसळल्या....त्या रानोमाळ उधळूं लागल्या. तो अस्वस्थ झाला. आपल्या हेरक्या नजरेचें जाळें लांब लांब टाकूं लागला. नजरेमागें झपाट्यानें चालूं लागला. काटवनांत ओढयाओघळीनें पुढें निघाला. वर कटनाला रानांत येऊन मेंढयाचीं खोंडें पाहूं लागला. तसाच तो पुढें चालला. पुन्हां पुढच्या वळणाला वळला. ओढयांत उतरला आणि पुढें त्याला मेंढरांचीं खांडें दिसलीं. त्याला एकदम धीर आला. बरें वाटलें. तो पुढें त्या शेरडा-मेंढरांच्या कळपाजवळ आला. तेथें थांबला. आजूबाजूला नजर टाकली. पण त्याला धनगरांचा ठावठिकाणा लागेना. पुन्हां तो ओढयाची डगर चढून वर आला. कटनावर उभें राहून झाडा-झुडपाच्या सांवलीला धनगरांचा ठावठिकाणा घेऊं लागला आणि लांब दोन हांकेच्या अंतरावर झाडाखालीं बसलेल्या धनगरांचा त्याला सुगावा लागला. शेळ्यामेंढया लांब खालीं ओढयाला तुरंगळल्या. सोन्यानें आपली हेरकी नजर पुन्हां पुन्हां आजू-

बाजूला फिरवली. त्याची पक्की खात्री झाली. जवळ-पास माणसाचा वारा नाहीं. कुत्रें नाहीं. तो जपून पावलें टाकीत पुढें गेला. एक ताजेफूट कोकरूं उचललें आणि पटकन् त्याची मान मुरगळली. कोकरूं बँऽऽ करून ओरडलें. त्याबरोबर शेळी कान टवकारून सोन्याकडे बघूं लागली. तेवढ्यांत त्यानें कोकराचें तोंड दाबून कोकराची मान मोडली व तें एका झुडपांत टाकलें. त्या कोकराची आई तशीच बँऽऽ बँऽऽऽ ओरडत झुडुपाजवळ उभी राहिली....

उन्हाचा चटका लागत होता. सोन्या घामाघूम झाला होता. त्याची कावरी-बावरी नजर सगळ्या दिशा धुंडाळत उधळत होती. मनासारखी गोष्ट झाली म्हणून त्याचा जीव थंड झाला होता. त्यानें खांद्यावरच्या धोतरानें तोंडावरचा घाम पुसला. तो तेथून लांब धारेनें वर गेला. धारेंत उभा राहून हात पाय धुतले. चूळ भरली. पोटभर पाणी प्याला आणि तो ओढ्याच्या दरडानें पुन्हां वर आला व त्यानें धनगराकडे पाहिलें. ते बसल्या जागीं झाडाखालीं होते. सोन्याला वाटलें आपण धनगर गड्यांना भेटावें. तंबाखू मागून घ्यावी. त्यांच्याशीं चार गप्पागोष्टी कराव्या. त्यांच्या पोटांत शंका आलीच तर दूर करावी. अन् मग आपली शिकार घेऊन आडवाटेनें जावें. असा विचार करून तो नीट धनगरावर निघाला. तोंडावर ऊन आलें म्हणून धोतराची घडी सरळ डोक्यावर घेतली.

सोन्या धनगरांजवळ गेला. लांडग्याला बघून मेंढ्या बावरतात, टवकरतात, तसे धनगरगडी त्याच्याकडे बघूं लागले व आपापल्यांत बोलले...

"कोण गडी हाय बरं?"

"गडी तर काळाझेंर दिसतोय!"

"काळा तर गडी हायेच पन अंगानं भररेला हाय!"

"इच्यायला तेच्या हातांत चांगली काठी दिसतीय!"

"कुनाला ठावं! बायली तो फरारी हाय का काय?"

"लेकांनो! आपलीं मेंढरं तरी बगा!"

"खरं तर काय तेच्या काय नेम!"

असे उलट-पालट बोलत समोर आलेल्या सोन्याला बघत धनगर उभे राहिले. सोन्या जवळ आला. धनगरांकडे बघून लांबनेंच हंसला.

जवळ आलेल्या सोन्याला ओळखून एकजण धनगर गडी बोलला, " आरं ह्यो तर सोन्या उचल्या नव्हं का ! "

दुसरा सोन्यालाच सरळ बोलला, " लेका उचल्या ! एवढा उन्हातान्हाचा कुठंरं ! "

तिसरा सहज पुटपुटला, " धुंडाळत असल तेची शिकार ! "

चौथ्यानें जरा उघडच विचारलें, " काय घावलं कारं झपाट्यांत ! "

सोन्या एका एकाचें बोलणें ऐकून उगीचच हंसत राहिला व डोक्यावरचें धोतर खांद्यावर नीट ठेवून हंसतच बोलला, " काय राजानूं चेष्टा चालवलीय ! पोटापाण्याचं बघायला वन वन हिंडतुंया ! काय कुणी वाढना. तुमची खांड दिसली तवा तंबाखू खावी आन् पुढं जावं म्हणूनशान वाकडी वाट करून आलूं ! त्यांत तुमचं भलतंच चाललंय. बरं ! कुणीं तंबाखू तरी द्या ! "

तेवढ्यांत एक धनगर उगीचच खवचटपणें बोललाच, " बाबांनो बघा ! न्हाय तर ह्यो नांवाचा सोन्या उचल्या हाय, गोड बोलून केंसानं गळा कापणारी अवलाद ! "

सोन्या उचल्याचा अनुभव जमेस धरूनच धनगर गडी नेमका बोलला. या बोलण्याचा सोन्याच्या मनाला चांगलाच झटका बसला तरी आपल्या मनांतला खरा कावा उघड होऊं नये म्हणून तो पुन्हां लाचारी हास्य तोंडावर आणीत बोलला, " गड्यानुं, तुमी धनगर राजं ! मोठ्या मनाचीं मानसं. तुमा म्होरं कशाला काय दडवूं ! आतां माजी निम्मी हुई झाली. मस्तं चोऱ्याचपाट्या केल्या. बघत बघत कोंबडीबकरीं उचललीं. त्यापाय तुरुंगाच्या वाऱ्या केल्या. पण तुमाला लेकराची आन घेऊन सांगतूं, त्यांत काय राम न्हाय ! आतां हायती चार मुलं तींच तुमच्या आसऱ्यानं आयपांढरींत जगवायाची, एवढं खरं. हे ऐकून मग तुमच्या मनांत काय का येईना ! "

असें सरळ सांगून सोन्यानें धनगरांभोंवतीं मायाजाळ टाकण्याचा प्रयत्न केला. त्यांत सोन्याचा कांहींच तोटा नव्हता. सोन्यानें जें मनांतलें सांगितलें तें सगळ्यांना महाजूर होतें. त्यांत धनगरांना तें नवें नव्हतें. सोन्यानें खरें सांगण्याचा मोठा आव आणला, पण लागलीच म्हातारा धनगर म्हणाला,

"लेका, मस्त तूं बोललास, पण जित्याची खोड मेल्याबिगार कशी जायाची रंऽ!"

या बोलानें सोन्या जरा मनांतून चपापला आणि आपल्या मनालाच बोलला, 'बायली हीं धनगरं काय तोंडांत घास पडूं दियाचीं दिसत नव्हती!' त्यांतच पुन्हां धीर धरून तो मनालाच म्हणाला, 'मला बी सोन्या उचल्या म्हणत्यात! अशी कितीक धनगरं खेळवीन'–आणि हातांतली तंबाकू चोळून दाढेखालीं सोडून पुन्हां धनगर गड्यांना सोन्या म्हणाला, "दादा! तुमाला कशाला लबाड म्हणूं! पण खरं सांगतुं या धंद्यांत पांच रुपयाचा माल उचलायचा अन् सा सा महिनं तुरंगांत अडकून पडायचं! त्यांत काय चव न्हाय!"

त्याचें बोलणें ऐकून पुन्हां म्हातारा बोलला, "लेकांनो, असं गोड बोलूनच कांटा काढतां!"

"न्हाय! न्हाय बरं! तायआयची आन घेऊन सांगतुं!" एवढें बोलून सोन्या पुन्हां धनगरांच्या तोंडाकडे बघून हंसला व मनांतल्या मनांत म्हणाला,

"बायली धनगर 'येडी येडी' म्हणत्यात, पण हे गडी लांब पुढचं हेरल्याबानी बोलतात. पण काय का असना! त्यासनी टोला दियाचा तो दियाचाच! काय त्यांची हुशारी मग मला कळंल!" असें तो आपल्या मनालाच बोलत, धनगराचा निरोप घेऊन निघतांना म्हणाला, "बरं जातुं, मला पुढचं पोटाच बघायचं हाय!" असें बोलून सोन्या धनगराच्या मेळ्यांतून उठला. पुन्हां मागें वळून धनगरांकडे पाहिलें. चालतां चालतां त्याच्या मनांत विचार आला,

'धनगरांच्या मनांतली कांक्षा फेडायची तर आपण उलटी झुकांडी हाणावी आणि पुन्हां आडवाटेनें मागं फिरावं व आपली शिकार घेऊन पसार व्हावं!' असा विचार करून तो चिंचेच्या मळ्याच्या दिशेनें निघाला, धनगरांच्या डोळ्यांआड आला. येथून पुन्हां ओघळी ओघळीनें सरळ खालीं ओढ्यांत उतरला. कोकरूं मारून टाकलेल्या झुडपाजवळ आला. कोकराच्या ओढीनें शेळी झुडपाजवळ सारखी बॅं ऽ ऽ बॅं ऽ ऽ ऽ करून ओरडत होती. सोन्या अगदींच झुडपाजवळ आला. झुडपांत शिरला. त्यानें मेलेलें कोंकरूं उचलून

अनुक्रम ... विभाग ... दिनांक ...

घेतलें. कुणाला कळूं नये म्हणून नीट धोतराच्या पदरात बांधले व खांद्यावर टाकून आडरानांतूनच झपाट्यानें गांवाकडे निघाला.

दिवस खालीं उतरला. सावल्या खाल्ल्याबाजूला निघाल्या. धनगर उन्हाची सांवली खाऊन उठलीं. पाण्यासाठीं ओढ्यांत उतरलीं. तेथून शेळ्या–मेंढ्यांचीं खांडें खालच्या अंगाला हाकलून घेतलीं पण एक शेळी सारखी बँ ऽ ऽ बँ ऽ ऽ ऽ आवाज करून ओरडत होती. रानच्या शांत वातावरणांत तिच्या ओरडण्याचा आवाज लांब खालच्या बाजूला येत होता. शेळीचें ओरडणें हेरून धनगराचा एक गडी बोलला, " आरं तिच्या भनं ! खंडात माझी बांडी शेळी दिसना ! मागं ओरडती ती तीच हाय वाटतं ! "

तोच म्हातारा गडी बोलला, " लेका पळ लांडग्यानं कोंकरू पळवलं का काय ? "

म्हाताऱ्याच्या बोलानें त्या गड्याला धस्स झालें. आणि शेळीच्या आवाजाच्या दिशेनें हातांत काठी घेऊन त्यानें पळ काढला. बघतो तो शेळी ओरडत निघाली होती. पुढें आडरानांत धावत होती. तो गडी शेळीच्या मागे हर्र ऽ ऽ ! हर्र ऽ ऽ ऽ ! बांडे ऽ ऽ ! अशा हांका मारत धांवत होता. शेळी कान टवकारून मागें बघत होती. पुढें धांवत होती.

बिन कोंकराची एकटीच ओरडत असलेली शेळी बघून त्या धनगराला धसकाच बसला आणि आपोआप त्याच्या तोंडांतून शब्द बाहेर पडले, " आरं आरं !! लांडग्यानं कोंकरूं लांबवलं वाटतं ! "

शेळी सारखी ओरडत होती. ती पुढें पुढें ओढ खात होती. धनगर गडी तिच्या गळ्यांतल्या कंड्याला धरून मागें ओढीत होता. कोकराच्या ओढीनें शेळी सारखी ओरडत होती. तोंवर ' शेरडू कां वरडतंया ' म्हणून मागोमागच बाकी धनगर गडी आले व एकानें विचारलें, " आरं शेळीचं कोकरूं कुठायरं ! "

तो पडल्या आवाजांत बोलला, " पळवलं वाटतं, लांडग्यानं ! "

त्यांत म्हातारा धनगर बोलला, " लेकांनो लांडग्याचा माग तरी बघा, कुठं कोकराचं रगात तरी दृष्टी पडल ! "

त्यावर चारी धनगर गड्यांनीं चारी दिशेला, ओघळीला, ओढ्याला, बघितलें. झाडा-झुडपांत बघितलें. पण कोंकराचा मागमुद्दा कांहींच लावेना. तेवढ्यांत म्हाताऱ्याच्या मनांत दाट शंका येऊन तो सहज बोलला, "अरं तो मगाचाच लांडगा खरा! सोन्या उचल्या नव्हता का आला!" म्हाताऱ्याच्या बोलावर सगळ्या गड्यांनीं माना डोलावल्या अन् ते विचारांत पडले "आतां कसं काय करायचं?"

पुन्हां म्हातारा कावलेल्या आवाजांत ओरडला, "लेकांनो, आतां कशाचार इचार करताय! पळा त्या उचल्याच्या मागं, गावच्या वाटनं, वाटंतच तेला गाटा. गांवांत गेल्यावर तो कसला घावतोय?"

म्हाताऱ्याचा सल्ला सगळ्यांना पटला. म्हातारा एकटाच मेंढरांच्या खांडामागें राहिला आणि धनगराचं चारी गडी चारी बाजूला गांवच्या दिशेनें धांवत सुटले. कुणी ओढ्यानें पळत होते. कुणी ओघळीओघळी बघत धांवत होते. कुणी झाडें झुडपें बघत निघाला होता. त्यांना सोन्या दिसत नव्हता. ते सारखे धांवत, बघत निघाले होते.

* * *

सोन्या झपा झपा पावलें टाकत मागें-पुढें बघत लांब पुढें आला होता. तो घामाघूम झाला होता. चांगलें चिकणें कोकरूं झपाट्यांत घावल्यानें तो निर्धास्त झाला होता. "कोकराची चवीदार सागुती आज पाहुण्याला मिळणार! पाहुणा खूष होणार!" याच धुंदींत तो घराकडे आडवाटेनें नेटांत चालला होता.

* * *

चारी धनगर चारी बाजूंनीं पुढें धांवत होते. सोन्या ओघळ चढून पाऊलवाटेला लागला आणि तो धनगरांच्या डोळ्यापुढें गप्पकन् उभा राहिला. त्यांनीं एकमेकाला शिट्या मारल्या, आवाज दिले, पालवलें, खुणावलें व ते एका मेळावर आले. त्यांनीं हातांतल्या काठ्या सावरल्या. कोंकरूं पळवणाऱ्या लांडण्याचा पाठलाग करतात तसे ते सोन्याच्या मागें जोर करून धावूं लागले.

आपल्या मागें रपा रपा कसला आवाज येतोय, म्हणून सोन्यानें सहज मागें पाहिलें. तों आपल्याच्च मागें धनगर पळतात, हें बघून त्याच्या उरांत धस्स झालें. चालतां चालतां त्याला दरदरून घाम आला. 'आतां आपल्याला धनगरांनीं पक्के गाटलं !' या विचारानें त्याचा धीर ढासळूं लागला. पण आतां आल्या वेळेला तोंड दिलें पाहिजे, यांतून वाट काढली पाहिजे; म्हणून तो शांत झाला. थोडा दम त्यानें खाल्ला. मनांत धीर आणला आणि मनाचा मोठा धडा करून, सोन्यानें खांद्यावरचें कोंकरूं डोळ्यांची पापणी लवते न लवते तोंच गड्यांची नजर चुकवून बाजूला ओघळींत टाकलें व पुढें बघून दमा-दमानें निघाला. सोन्यामागें धनगर गडी धांवत होते. त्यांच्या तोंडाला फेस आले होते. गडी दमछॅक झाले होते. तरी ते जोर करून सोन्यापासून अगदीं नेटावर आले आणि सोन्यामागें पळतां पळतां कोंकराचा मालक लांबनेंच कावानें ओरडला, "अरे लेका उचल्या ! आरं थांबतूंच का न्हाय !"

या हाळीचा रोख सोन्यानें हेरला, पण मागें बघून पुन्हां तसाच पुढें पाय ओढूं लागला. तेवढ्यांत धनगर गडी धांवत सोन्यामागें आलेच; आणि पुन्हां कोंकराचा मालक दम खाऊन रागाच्या आवाजांत कडाडला, "कायरं, उचल्या ! तूंच आमच्याभंवतीं लांडगा झालास ! कोंकरूं देतुंच का न्हाय ! का तुझा मुडदा पाडून घियाचा हाय !"

धनगरांचा निर्वाणीचा बोल ऐकून सोन्याला वाटलें, 'आतां काय वेळ टळत न्हाय,' म्हणून तो मोठ्या धीरानें थांबला. आणि काळ्या सांवरून आपल्याजवळ आलेल्या धनगर गड्यांना शांतपणें बोलला, "आतां तुमच्या म्होरंच निघालं अन् माझ्यावर निस्कारणी काय ह्यो आळ ! मी बा कशाला तुमचं कोंकरूं पळवूं ! तें लांडग्यानं कवांच उचलून नेलं असंल, अन् तेचा कवांच फडशा पाडला असल !"

त्यावर कोंकराचा मालक रागानें उसळत होता. त्याच्या हातांत काठी वळवळत होती. पुन्हां तो रागाच्या भरांत आवाज चढवून म्हणाला, "सोन्या लेका, खरं बोल ! न्हायतर तुला मरूस्तर मारूं !"

या शेवटच्या बोलानें सोन्याला कांहींच सुचेना. 'आतां आपलं पांच खडं भिजलं ! अशा विचारांतच तो घुटमळला. तरी त्यांतच तो धीर धरून

खड्या आवाजांत बोलला, बाबानु ! मी खरंच सांगतुय ही ! माज्या लेकराची आन खावून तुमाला सांगतुं कीं, माज्या हातून तें झालं न्हाय ! ”

सोन्याच्या या उत्तरानें धनगर गडी अधिकच पिसाळले. त्यांना वाटलें, आतां हा काय उचल्या कोंकरूं दावत नाहीं आणि खऱ्या बोलानें सरळ सांगत नाहीं म्हणून कोंकराच्या वेडानें अगदींच बिघडलेल्या धनगर-मालकानें पुढें धांवून सोन्याच्या गचोरीला धरलें व चांगलें सणसणून दोन रट्टे मारले व त्याला चांगला दम भरला, “ खऱ्या बोलानं काय तें सांग, न्हायतर आतां हितंच तुजा मुडदा पाडतुं ! ”

सोन्याची खात्री झाली कीं, या गड्यांच्या अंगांत आतां धनगरवेड शिरलें. आपली काय आतां यांतून सुटका होत नाहीं, त्यांतच तो हात जोडून पुन्हां बोलला, “ तायआयच्यान् सांगतुं मी काय सुदीक केलं न्हाय ! ”

पहिलाच रागानें लाल झालेला कोंकराचा मालक, सोन्याच्या या उत्तरानें अधिकच पिसाळला आणि त्या झटक्यांत त्यानें हातांतली काठी सोन्याच्या डोक्यांत घातली. त्याबरोबर सोन्या कळवळला. रक्तबंबाळ झाला. आतां मात्र सोन्याचा धीर पार ढासळला. त्याची पूर्ण खात्री झाली, ‘ कोंकरा-पाय हीं धनगरं आपला मुडदा इथंच पाडायला मागपुढं बघायचीं न्हायती ! तवां खरं काय तें सांगावं, अन् धनगरांच्या पुढं पदर पसरावा. एवड्या बार गुन्हा माफ करा.’ असा विचार करून पुन्हां एक वेळ गयावया करून, हात जोडून सोन्या बोलला, “ गड्यांनो ! मला काय गरीबाला मारूं नका मला कशाचीबी शिपत घियाला सांगा; पण म्यां काय कोंकरूं पळवलं न्हाय.”

पुन्हां उचल्याच्या त्याच बोलानें धनगर गडी भलतेच बिघडले. त्यांचे हात वळवळूं लागले. याला मारूं कीं खाऊं असें त्यांना झालें. त्यांतच मालक रागानें बोलला, अजूनबी ह्यो सरळ बोलानं खरं सांगत न्हाय ! हेला दावा कीं आपला इंगा ! पुढं काय होईल ती बघायला येईल ! ” असा निर्वाणीचा पुन्हां बोल करून चवताळुन तो दोन्ही हातानें सोन्याच्या डोक्यावर पुन्हां काठीचा घाव घालणार तोंच वरच्या अंगानें जोरांत वाऱ्यावर आवाज आला. “ आरं, लांडगा पुढं आला ! लांडग्यानं कोकरूं पळवलं ! पळा ! पळा ! ”

म्हाताऱ्याच्या हाळ्या पुन्हां पुन्हां आल्या. त्या वातावरणांत घुमल्या. लांडगा आला ! हे शब्द धनगर गड्यांच्या कानांत धडाक्यानें घुसले. त्यांनीं वरच्या अंगाला हाळीकडे कान दिला. आणि, 'लांडगा आला !' या आवाजानें कोंकराच्या मालकाच्या हातांतली काठी ढिली पडली. तोंवर पुन्हां जोरजोरांत त्याच हांका आल्या. आपल्याच म्हाताऱ्याचा हा आवाज म्हणून चारहि धनगरांनीं पुन्हां तटस्थ नजरेनें वरच्या अंगाला पाहिलें. तेवढ्यांत ओढ्यांतून वर झपाट्यानें धावत लांडगा निघाला आणि तोंडांत कोंकरूं उचलून उलट कांटवनांत नेटानें धावत सुटला. त्याबरोबर चारी धनगर गडी कुत्र्यासारखे लांडग्यामागें काठ्या घेऊन पळत निघाले. त्यांत धनगरांची दोन्हीं कुत्रीं लांडग्याचें शेपूट धरूनच जोरांत मागें होतीं. लांडगा वेगांत होता. त्याच्या मागें कुत्रीं वेगांत होतीं. धनगर अंगातला जीव एकवटून लांडग्यामागें दौडत होते. म्हातारा धनगर टेकडावर उभा राहून मोठमोठ्यानें आवाज देत होता.

कुत्र्यांनीं भलताच जोर केला. लांडगा गाठला—आणि त्याबरोबर लांडग्यानें तोंडांतलें कोंकरूं खालीं टाकलें व तसाच जोरांत तो वाऱ्यासारखा पळत सुटला. कुत्रींहि त्याच वेगांत लांडग्यामागें सुटलीं. तोंवर धनगर गडी दम टाकत लांडग्यानें तोंडांतून टाकलेल्या कोंकराजवळ आले. एका गड्यानें कोंकरूं उचलून हातांत घेतलें. त्याच्या नरडीला लागलेलें दांत बघत बघत, दम खाऊन तो सहज बोलला, "बायली, त्या गरीब उचल्याला आपून उगाउगी ठोकलं ! तेचच खरं ! लांडग्यानंच कोंकरूं पळवलं !"

आपण आतां पसार झालें पाहिजे, म्हणून सोन्यानें घाई केली. आपल्या कपाळावर—मानेवर ओघळलेलें रक्त नीट पुसलें. डोईला नीट पटका बांधला. आणि पुन्हां धनगरांची खिलामत आपल्या अंगावर येऊं नये, म्हणून तो झपाट्यानें ओघळींत शिरला. तेथें टाकलेलें कोकरूं उचललें आणि जवळच्या डबऱ्यांत पुरून टाकलें. त्यावर नीट माती ढकळली. खुणेसाठीं त्यावर दगड ठेवला. तेथून तो निर्धास्तपणें गांवच्या वाटेला लागला आणि तेथून हालतां हालतां हलकेंच पुटपुटला, " चांगला अंधार करून इन अन् पुरलेलं कोंकरूं घेऊन जाईन....निम्मी रात का होईना, पण पावण्याला याची सागुती—कडाण चारीन !"

अशा विचाराच्या गुंगींतच तो निघाला. सूर्य मावळला होता. रानांतलें माणूस गांवाकडे निघालें होतें. सोन्यानें चालण्याचा झपाटा मारला आणि उजेडाबरोबर आपल्या खोपटावर आला.

खोपाटावर सगळेंच सामसूम होतें. कोणीच दारांत दिसेना. दारांत जनावरें बांधून पोरेंहि कुठें ओढ्याला पसार झालीं होतीं. तोंच खालच्या लवणांतून सारजा पोराला कडेवर घेऊन खोपीवर आली आणि पोराला दणकन् भुईवर टाकून आपलें कपाळ बडवून घेऊं लागली. तिला बघून सोन्या कावरा-बावरा झाला व त्यानें बायकोला विचारलें, "पावणा गं ! "

" पशार झाला ! "

" कां ? "

" पोलीस त्याचा माग काढत आपल्या कोपीवर आलं ! "

" तेशा कां ? "

" तो डाक्यांत घावला हुता ! "

" हत् तिच्या आयला ? तेला काय घाबरायचं ! निवांत कोंकराचं कडाण खायाचं अन् मग जायाचं ! "

कधीं नव्हत तो भाऊ आला, अन् एकाएकीं निघून गेला. म्हणून सारजा भावाच्या घोरानें डोळे गाळूं लागली. चिंतागती होऊन बसली. तिला बघून पुन्हां सोन्या बोलला, " तूं कां म्हण घोर करीत बसलीस. तो फर्जा मस्त पक्का हाय ! पोलिसाला हुलकावणी देऊन, निम्या रातीं तुज्या हातचं कडाणं खायाला कोपींवर इल बग ! उठ ! चूल पेटव ! भाकरी टाक. तवर मी माघारीं जावून पुरलेलं कोंकरूं तेवढं आणतूं ! "

नवऱ्याचा बोल सारजाला पटला. आणि खरंच आपला भाऊ रातींच कोपीवर येईल, या आशेनें ती उठली. तिनें चूल पेटवली. भाकरी टाकूं लागली.......

तोंवर अंधार दाटला....आणि सोन्याची वाट मोकळी झाली. तो दारांतून उठला.

" लागलींच कोंकरूं घेऊन येतूं ! तूं सगळं भाकरीचं आटप ! " असें बायकोला बोलून परत तो काटवनाच्या वाटेला लागला आणि वाटेनें जातां जातां पुढें तो दाट अंधारांत गडप झाला....

# वैदू

तीन-चार दिवसांवर नागपंचीमचा सण आला....आणि वैदूचीं आठदहा पालं ढालेगांवच्या माळरानांत पक्षांसारखी उतरलीं....

आषाढ सरला होता. पावसाची रिपरिप थांबली होती. श्रावणानें तोंड दाखविलें होतें. श्रावण आला नि पावसांत ऊन पडूं लागलें. ढगांनीं लोंबलेलें आभाळ वांगरलें.

त्यांत काय झालें, आणि पावसाला वेड लागलें. रात्रभर उगीचच पावसाची चांगलीच झड लागली...सकाळींच माणूस उठून बघते....तों रानोमाळ पाणीचपाणी झालेलें दिसलें.

ओढे पाण्यानें भरून चालले होते. ओघळी वाहत होत्या. आणि नदीला भलतेंच पाणी आलें होतें. तिच्या पात्रांतून पाणी बाहेर पडलें होतें. कुरणांत शिरलें होतें. सगळ्या काटवनांच्या लवणांत पाणीच पाणी दिसत होतें. नदी ढालेगांवला वळसा घेऊन पुढें चालली होती. ती खालीं गांवच्या काटवनांतून कुरणांतून पुढें निघाली होती.

रात्रीच्या पावसांत, वैदूंचीं पालं आख्खी रात्र उभीं होतीं. त्यांत उघडें माळरान. कशाचाच आडोसा नाहीं. वरून पावसाची राप अन् गार वारा. त्यामुळें पालांतले लहान-मोठे माणूस हातपाय आंखडून रात्रभर बसलेले होते. कुत्रीं मुटका होऊन, पालाच्या आडोशाला बसलीं होतीं. डालग्यांतलीं कोंबडीं मरून-झुरून बसलीं होतीं, डोळ्यांच्या उघडझापीनं तीं आपलें आस्तित्व दाखवीत होतीं. पालापुढें गाई-वासरें गारठून तटस्थ उभीं होतीं. शेळ्या-करडें पालांत तोंडं घालून खडा होतीं...

सगळे जीव गारठलेले होते-

सकाळ झाली. दिवसानें तोंड दावलें. कोंवळीं किरणें सगळ्या रानांत उधळलीं. गवताच्या हिरवळीवर पावसाचे थेंब मोत्यासारखे चमकूं लागले. रानांतलें वाहतें पाणी चकाकूं लागलें आणि झाडावरचे पक्षी मोकळ्या वातावरणांत भराऊं लागले.

वैदूच्या पालांतले सगळे जीव बाहेर पडले...गडी बाहेर आले. आंखडलेल्या हाता-पायांना हिसडे मारूं लागले.

शेळ्या उन्हांत बाहेर पडल्या अन् उभ्या जागीं अंगावरचें पाणी झाडूं लागल्या. कोंकरें स्वछंदानें उड्या हाणूं लागलीं व आपल्या आईच्या कासेला ढसूं लागलीं. डालग्याचें तोंड मोकळें केलें अन् कोंबडीं फडाडा पंखे उडवीत पालाभोंवती मोकाट पळूं लागलीं. मुटका होऊन बसलेलीं कुत्रीं अंगाला तणावे देत उन्हांत आलीं. ती रानपांखरामागें धांवूं लागलीं. आपले पाय मोकळें करूं लागलीं. पालापुढें आकसून उभ्या राहिलेल्या गाई-कालवडी अंगाला उन्हाची ' तिरीप ' लागतांच मोकळ्या उभ्या राहिल्या, कान हालवूं लागल्या, शेपट्या उडवूं लागल्या.

रात्रभर गारठ्यांत पडलेलीं आरवाळ मुलें रानांत पाणीच पाणी बघून पाण्याकडे धांवलीं आणि खडकांतून चाललेल्या खळखळत्या पाण्यांत धिंगाणा घालूं लागलीं. तान्ह्या मुलांच्या आया, मुलाला घेऊन बाहेर आल्या. उन्हांत बसून नदीच्या पाण्याकडे बघत राहिल्या. बापई गडी पालाजवळच चांगला खडक बघून बसले आणि नदीचें चढतें पाणी पाहून त्यांचे चेहरे खुलूं लागले...

त्यांतच नागपंचीम दोन दिवसांवर आली. सालाच्या कमाईचा दिवस आला. सालाबादप्रमाणें यंदाहि वैदू मोठ्या आशेवर गांवाला उतरले....

त्यांतच श्रावण महिना सुरू झाला. आषाढांतील ढगाळ आभाळ पार निघून गेलें. श्रावणांतल्या कोंवळ्या उन्हाच्या धारा पडूं लागल्या. गारठलेल्या वातावरणांत ऊब आली. झाडा–झुडपांवर गारठून बसलेले पक्षी मोकळ्या उन्हांत स्वच्छंदानें भराऊं लागलीं....हिरवीगार माळरानें अधिकच खुलून दिसूं लागलीं.

....वैदू गडी गोळामेळ्यानें बसले होते. नागपंचीमचा सण आला. या सणाच्या दिवसाच्या कमाईचें बोलणें चाललें होतें.

रोजचींच तीं झाड–पाल्याचीं औषधें, मुळ्या, शेंगा, पाला, फुलें फळें या औषधी वनस्पतींची भाषा आज नव्हती. त्यांच्या वनस्पतीच्या झोळ्या, टोपलीं आज पालांत गप्प बसून होत्या. आज वैदूंनीं त्यांना विसावा दिला होता.

—पण नागपंचीम चार दिवसांवर आली कीं, वैदू त्यांचा वैदूपणा विसरतात. ते दुसऱ्याच कसल्यातरी गुंगींत असतात. नाग, अस्सल-नाग, फड्या–नाग पकडण्याच्या धुंदींत असतात.

ते सगळेच आज नाग पकडायला जाणार होते...सगळ्या वैदू गड्यांच्या नजरा नदीच्या तीराकडे फिरत होत्या. नदीकांठा कांठानें त्या खालीं काटवनांत, कुरणांत धांवत होत्या. त्यांच्या आशाळभूत नजरा नागांचा शोध घेत होत्या !

त्यांत मण्याप्पानें चिलीम भरली. गुरप्पानें चकमकीनें विस्तू पाडला. चिलीम पेटविली. मण्याप्पानें ती ओलसर छापी नीट लावून जोरांत झुरका मारला. नाकातोंडांतून ठाव घेऊन धूर बाहेर पडला. गुरप्पानेंहि चिलमीच्या झुरक्यानें आपला कोठा गरम केला आणि चिलीम एकेका गड्याकडे फिरूं लागली. चिलमीच्या झुरक्यानें सारे गडी गरम झाले आणि त्या तलपेंत गारठलेलीं तोंडं बोलूं लागलीं.

मण्याप्पानें पुन्हां चिलमीचा झुरका हाणून नाकातोंडांतून शांतपणें धूर सोडला व म्हणाला,

“नागपंचीम आली. अंगाला सालाचा कपडा मिळंल.” सगळ्यांच्या मनांतला बोल मण्याप्पा बोलला. त्या बोलानें बाकी गड्यांच्या चेहऱ्यावर आशेचा तजेला चढला. गुरप्पानें छापी पुन्हां पुसून चिलमीला नीट लावली. झुरका मारण्याच्या अगोदर बोलला,

“नागराजाची आपल्यावर कृपा”

शेजारच्या बुटक्या गड्यानें एक झुरका मारून, चिलमीची राख खालीं ओतली व गंभीर चेहरा करून तो म्हणाला,

" पंचीमला सालाचा जुना-पाना कपडा मिळतु खरं—पण त्यापायी अगोदर बाबा.... ! ! " असें अर्धवटच म्हणून त्यानें मांडीला खराखरा खाजविलें अन् त्याबरोबर मांडीवर फाटलेलें धोतर त्यानें मागें सारलें. त्याच्याच शेजारीं बसलेला अंगापिंडांत नेटका असलेला गडी चटकन त्याचा पुढचा बोल हेरून बोलला.

" तसंच असतं बाबा ! "

आणि या गड्याच्या बोलाबरोबर सगळ्यांनीं माना डोलावल्या. पहिल्या गड्याचा बोल मण्याप्पानें हेरला व समोरच्या झाडा-झुडपांकडे बारीक नजर टाकून म्हणाला,

" हाय खरं. तसंच हाय ! " असें मंदपणानें बोलून सुस्कारा टाकला. त्याच्या मंद बोलण्यांत व सुस्कारा टाकण्यांत वैतागाच्या लहरी उमटत होत्या. गांवोगांव भटकावयाचें. वनस्पतीचा पाला-मुळी पसा-पायली दाण्यावर द्यावयाची. त्यावर सगळ्या पोराबाळांचा जीव जगवायचा हें रोजचं. त्यामुळें मण्याप्पाच्या आवाजांत जडपणा आला होता.

तेवढ्यांत मध्येंच गुरप्पानें तोंड घातलें. त्यानें जातीची कुळीमुळी उघडी करून दाखविली व गंभीर चेहरा करून नदीच्या फेसाळत्या पाण्याकडे बघत बोलला,

" उगं हाय तें उगळत बसूं नका ! नदीचं पाणी चढतंय् तोंवरच आपल्याला अस्सल जनावर हातीं लागंल...!!!

गुरप्पाच्या बोलानें सगळ्यांच्या पुढें आजचा प्रश्न उभा राहिला....

एक बुटक्या गड्यानें कसा नाग पकडला, जीवावरचे संकट कसे टळले हें सांगितलें आणि अंगांतला कोट दाखवून म्हणाला,

" हा बघा कोट ! एका भल्या घरधन्यानं दिला हौसेनं." त्याजवळच बसलेल्या गड्याला आपोआप बोलण्याची उबळ आली. त्यानें आपल्या अनुभवाचे पान वाचून दाखविलें. आणि त्याची निशाणी म्हणून अंगावर असलेली पैरण दाखविली. आज ती पैरण भुजावर टिगळं दिलेली होती. पाठी-पोटावर दोऱ्याच्या टिपा मारलेल्या होत्या. अंगावरची ती जुनी पैरण जाऊन या नागपंचीमला नवी येईल अशा आशेचे भाव त्याच्या चेहेऱ्यावर उमटले होते.

गुरप्पाहि त्याबरोबर शांत झाला....... त्याच्या चेहऱ्यावर गंभीरपणा आला होता. तो गप्प झाला होता....आपल्याच अंगावरच्या सदऱ्याकडे बघत होता...पुन्हां भरलेल्या नदीकडे टक लावत होता आणि बाजूला माळावर आपली नजर स्थिर करीत होता. त्याचे डोळे स्थिरावले होते— आणि पाण्यानें भरले होते....

....याच माळरानांत वैदूंचीं पालें उतरलीं होतीं.....

नागपंचीम दोन दिवसांवर आली होती. श्रावणांतली पावसाची भुरभुर सुरू होती. नदीला पूर आलेला होता. सगळे वैदू गडी दिवस उगवल्यावर नाग पकडण्यासाठीं तयार झाले होते. फडक्यांत भाकरी बांधून घेतल्या. हातांत पुरुष-दीड पुरुष लांब वेळूच्या काठ्या घेतल्या. त्याला लोखंडी कडीचा आकडा बांधून दोरीचा फास बसविला होता. सगळी तयारी झाली होती.... बरोबर कुत्रीं होतीं. दहा-बारा वर्षांचीं पोरं नाग झाकून ठेवण्याच्या टोपल्या डोईवर घेऊन निघालीं आणि सगळे नदीच्या काठाकडे चालले.

गुरप्पानें वेळूची लांब काठी घेतली व तो निघाला. त्याचा धाकटा भाऊ संगाप्पाहि नाग पकडण्यासाटीं सर्व तयारीनिशीं निघाला होता. बरोबर कुत्रें होतें.

नदी दुथडी वहात होती. ती फेंसाळत, आवाज देत चालली होती. पाणी चढत होतें. तें गढूळ मातकट पाणी आक्राळविक्राळ रूप प्रकट करीत वेगानें धावत होतें. पाण्यांत झाडें-झुडपें उलटींपालटीं होत वाळवंटी ओहटीला लागलीं होतीं. रानजनावरांचा त्यांत बळी पडत होता.

नदी पात्राबाहेर रानांत पसरत होती. पाणी वाट मिळेल तिकडे चाललें होतें. काट्याबरोबऱ्याचे फेस वहात येत होते. पाण्याच्या लोंढ्याच्या तोंडाचें रान-जनावर पुढें धांवत होतें. बुटक्या झुडपांत धरटीं केलेले पक्षी झुडपावर तरंगत होतें. कसल्यातरी अंतरीच्या वेदनेनें तळमळत होते. पाण्याचा सूऽऽसू आवाज होत होता. नदीचें चढतेंवाढतें पाणी पाहून वैदू गड्यांना हर्ष झाला होता.

ते उड्या हाणीत नदीकाठानें निघाले होते.

गुरप्पा व संगापा दोघेहि आनंदांत होते.

घरच्या प्रत्येक माणसाला एक एक नाग मिळेल. चारी हातांनीं नाग-पंचीमला मिळकत मिळेल. सालभर कपडयाची बेगमी होईल, असा त्यांचा बेत झाला होता.

नदीकांठ आला आणि गडी नाग पकडण्यासाठीं लांब लांब काठाकाठानें पांगले. एक दोन मैल अशा आवारांत पांगले.

जो तो आपापली जागा धरून काठाकाठानें नजर रोखीत होता.

पाण्याच्या लोंढ्याबरोबर काठावर येत असलेल्या काट्यांच्या फेसाट्यांत धुंडाळत्या नजरा घुसत होत्या.

पाण्याच्या लोंढ्याबरोबर दमछाक होऊन वहात आलेले नाग काठावर येऊन उन्हांत गप्प पडत होते. कांहीं पाण्यांतून जीव बचावण्यासाठीं झाडा-झुडपाचा आश्रय घेत होते.

वैदू गडयांची मधून मधून एकदम आरोळी कानावर पडत होती. नाग पकडल्याची ती आरोळी खूण होती. ती कानावर पडल्यावर प्रत्येकाच्या तोंडावर समाधानाच्या छटा उमटत होत्या.

संगापाच्या नजरेंत चांगला अस्सल फडयानाग आला. वाढत्या पाण्यापुढें तो नाग जीव बचावण्यासाठीं सळसळत, सरपटत होता. त्याच्या सरपटींत वेग होता. जोर होता. संगापा त्याला पाहून त्याच्या बगलेबगलेनें निघाला होता. चालीच्या आवाजानें नाग जागावला अन् त्यानें मान फिरवून पाहिलें अन् संगापावर त्यानें फडी उभारली, डोलूं-झुलूं लागला. दोन हातांच्या पंजाएवढी ती फडी ! त्यावर दहाचा आंकडा. तें काळेढोण जुनाट जनावर पाहून कोणीहि सामान्य माणूस जीवाच्या भीतीनें गर्भगळीत झाला असता. पण संगापा पडला वैदूचा पोरगा. असलें जनावर धरण्यास पटाईत ! नागानें आपल्यावरच उगारलेली फडी पाहून संगापाला चेव चढला. त्याला पाहून उगीच तो हंसून मनाशीं बोलला,

" हं ! तूं आतां माझ्या तावडींत घावलास ! कुठं जातुस आतां ! "

तेवढ्यांत तो भला मोठा नाग पुढें धावूं लागला....तें पाहून संगापानें आपल्या जवळच्या कुत्र्याला नागावर 'छ्यो' घातलें आणि वैदूच्या त्या चिकट बेरक्या अवलादीच्या कुत्र्यानें हाताच्या बोटाच्या खुणेवर नाग हेरला. वेगांत धांवून तो नागाच्या आडवा झाला, त्याबरोबर नागाने फणा उगारला व कुत्र्याच्या अंगावर फिसकारत झडप मारली. त्याबरोबर कुत्रें मागें पळालें व आडव्या बाजूनें नागावर चाल केली. नागानें पुन्हां कुत्र्यावर चाल केली. तेवढ्यांत वेळूला नीट फासा लावून संगापा पुढें धांवला.

—पाण्यांतून जीव बचावून निघालेला नाग पहिलाच चवताळलेला होता. त्यांतच त्याच्यापुढें हा जीवावर प्रसंग. त्यानें तें जनावर अधिकच चवताळलें व फडी काढून फूसऽफूसऽऽ असें ठिसकारूं लागलें, अंगावर चाल करून फणा जमिनीवर आपटूं लागलें.... त्याबरोबर त्यांतून भयंकर रागाच्या ठिणग्या उफाळून वर येत होत्या. कुत्रें बाजूबाजूनें त्याच्या अंगावर जात होतें—पुन्हां भीतीनें मागें पळत होतें.

संगापा आपल्या हातांतल्या वेळूच्या काठीनें त्याच्यावर फासा टाकायला पहात होता—अन् नाग त्याच्या अंगावर चवताळून धांवत होता.

त्यांचा असा सारखा झगडा चालला होता. संगापाला नाग कांहीं घावेना आणि नागाला कुत्रें पुढें कांहीं जाऊं देईना. त्यामुळें नाग चवताळून अंगावर धांवत होता. तें त्याचें फुसकारणें भयंकर होतें.

शेवटींनाग फाशांत सांपडला. संगापानें तो वेळूखालीं दाबला; काठी पायानें दाबत तो पुढें गेला. त्यानें त्याच्या शेपटीवर पाय दिला, तसा नाग भलताचे चवताळला. संगापा नेमकें त्याचें तोंड पकडणार तोंच तें रानजनावर जोर करून संगापाच्या हाताला कडाडून डसलें, उलटें-पालटें झालें. नागाचे दांत हातांत रुतले अन् संगापा 'आयऽऽगं!' म्हणून विव्हळला. त्याच्या कपाळावर दारून घाम सुटला—पण त्यानें नागाची शेपटी सोडली नाहीं आणि नागाने पुन्हां फणा हाणला तरी त्याने त्याचें शेवटीं तोंड पकडलेंच.

संगापाची व नागाची झटापट झाली...संगापाच्या हाताच्या पंजांतून रक्त ओघळलें. पण झटापटीच्या धुंदींत त्याच्या तें ध्यानांतच आलें नाहीं.

आणि मग नागाचें तोंड फाडून वस्तऱ्याच्या पात्यानें त्याचे विषारी दांत काढले, विषारी पिशवी कापून काढली व नागाकडे धुंद डोळ्यांनीं तुच्छतेनें पाहून बडबडला.

" माझ्यापुढें च्याव च्याव ! माझ्या झपाट्यांत घावला हुतास.... ! "

—आणि मग त्या आनंदानें बेहोष होऊन तो ओरडला—मोठमोठ्यानें त्यानें आरोळी ठोकली, सगळ्या वातावरणांत तिचा आवाज घुमला आणि संगापानें नाग पकडला हें आजूबाजूच्या गड्याला कळलें. त्याचा बंधू गुरप्पालाहि समजलें, त्याक्षणीं त्याचा चेहरा समाधानानें उजळून निघाला.

शेवटीं संगापानें नागाल. टोपलींत बंद करून ठेवला अन् तें कुत्रें त्याच्या भोंवतीं उड्या मारूं लागलें.

संगापा निवांत बसला. नदीकाठानें पुन्हां एक वेळ नजरेचे फास फेकले. झाडा-झुडपांत काट्यां-बोराट्यांत शोध घेऊन ते परत फिरले. कपाळावरचा घाम पुसला. समाधानाचा सुस्कारा टाकला. हाताच्या पंजाचें रक्त पुसलें. नाग डसलेली जागा चाचपून पाहिली व ओघळलेलें रक्त पुसलें. आणि त्याचें अंग थरारलें...

तोंच संगापा झटपट मागें फिरला. उतारा मिळावा म्हणून वनस्पतीची मुळी पाहूं लागला; धोतराचा घडपा सोडला. पण औषधाची पिशवीच त्यांत दिसेना; ' पिशवी घेतां घेतां तशीच पालावर विसरलों कीं काय ? ' या विचारानें त्याच्या अंगावर उगीचच कांटा उभा राहिला !....

संगापानें पुन्हां दगडानें कुत्र्याची बारीक काढणी तोडली. दंडाला करकचून बांधली. कपाळावर घाम पुसून कोंडलेला दम सोडला आणि पुन्हां नागाच्या शोधांत नदीकांठीं नजरेचें जाळें टाकून बसला.

दिवस माथ्यावर आला. अन् ऊन तावूं लागलें...तसें तसें संगापाला कसनुसं वाटूं लागलें. त्याची नजर चाळवली. अंग जड झालें. पायांत बेड्या पडल्यासारखें भासूं लागलें. पोट-पाट घामानें डबडबली. कपाळावरचा घाम निरपून टाकून संगापानें ती जडशीळ नागाची टोपली उचलली अन् नदीच्या काठाकाठानें वरच्या अंगाला गुरप्पाकडे निघाला.

संगापाची चालण्याची मंदगति. डोळ्यांतला धुंदपणा, हाताला बारीक करकचून बांधलेली काढणी हें सगळं पाहून गुरप्पा त्याच्या पुढें गेला अन् टोपलींतलें मोठें जनावर बघून एकदम दचकला....

तेवढ्यांत गुरप्पानें आजूबाजूला धांवपळ केली. उताऱ्याचा पाला लौकर घावेना...शेवटीं पाला मिळाला. तो पळतच संगापाजवळ आला. दगडावर गुंड्यानें पाला चेचला. त्याचा रस काढला. संगापाला पाजला. डोळ्यांत पिळला आणि मग गुरप्पा निर्धास्त झाला. पाल्याचा रस घेतला....आतां आपण मोकळे झालों असें समजून संगापा पुन्हा नदीकाठा काठानें नागाच्या मार्गावर निघाला जड अंगानें, धुंद नजरेनें....

सूर्य मावळायला टेकला...आणि नदीकाठा काठानें वैदू गडी एकामागें एक पालावर आले. नाग बंद करून ठेवलेल्या जडशीळ टोपल्या खालीं उतरून ठेवल्या, समाधानाचे सुस्कारे सोडले.

संगापा दमादमानें पालाकडे येत होता. त्याच्या डोईवर जडशीळ नागाची टोपली होती. त्याच्याबरोबर कुत्रें मंदगतीनें चाललें होतें.

संगापा पालाजवळ आला. टोपली खालीं ठेवली आणि एकदम भुईवर कलंडला.

प्रत्येक पालापुढें वैदू गडी बसले होते. ते आनंदांत होते. आजची रात्र कधीं जाईल, उद्यांचा दिवस कधीं उजाडेल, याच विचारांत ते होते, उद्यांच्या आशेनें भारून गेले होते.

संगापा जमिनीवर आडवा झाला, हें बघून पालापुढें बसलेले वैदू उठले, त्याच्याजवळ आले आणि त्याचा बांधलेला हात बघून जरा घोटाळलेच. त्यांच्यांतला कळता म्हातारा सोन्या पुढें आला. खालीं बसून संगापाचें सगळें अंग चांचपून पाहिलें. डोळ्याच्या पापण्या वर उचलून पाहिल्या. त्याची जीभ पाहिली व हलकेंच खालीं बघूनच बोलला,

"पोराचं अंग जड झालेलं दिसतंय्. डोळ्याची बाहुली मंद आलीय."

त्यानें पुन्हां अंगावर हात फिरवला. दंड चांचपून मान वर करून बाघतिलें व बोलला,

" अरं हेचा भाव कुठाय् ! हे गुरप्पा पोरा ! "

आणि खालीं मान घालून पालापुढें बसलेला गुरप्पा चटकन् उठला व पुढें आला. त्याला पाहून पुन्हां सोन्या म्हाताऱ्यानें विचारलें,

" कां रं ! पोराला कवा जनावर ढसलं ? "

चेहरा उतरलेला गुरप्पा हलक्या आवाजांत बोलला,

" मला का माहीत ? पण दुपारी मला भेटला. त्याचं चलींतार बघून, तो पाला चेचून त्याचा रस पाजला अन् वाटलं आतां उतारा पडलं. मग मी नदीकाटानें पुढें गेलों. हा नदीकाटानें मागें गेला. "

सोन्या म्हातारा गप्प झाला. दम खाऊन त्यानें पुन्हा पुसलें,

" कारं ! कशाचा पाला ? "

वनस्पतीचं, पाल्याचं वैदूच्या शास्त्रांत नांव घ्यावयाचं नसतं. नांव घेतल्यानं औषधांचं सतपण मरल म्हणून गुरप्पा बाजूला रानांत गेला. अन् धुंडाळून पाला आणला, म्हाताऱ्याला दाखविला.

म्हाताऱ्यानें पाला घेतला, उलथा-पालथा करून पाहिला. पानाचे काठ बघून म्हातारा फटकन् बोलला,

" अरं ! अरं !! चुकलास पोरा ! हा पालं नव्हं ! त्या पाल्याच्या पानाला कडेनें दात्या असतात. "

म्हातारा असा बोलला, तो आपलें कपाळ धरून गप्प बसला. पुन्हां त्याचे ओठ थरथरले व म्हणाला,

" आरं ती आपली कायमची मुळी कां जवळ ठेवली न्हाय ? "

संगापा नागपंचीमच्या नादानं गुंग झाला अन् आपल्या जवळची वनस्पती पालावर विसरला आणि तेच गुरप्पा बोलला.

" अगा, ती वनस्पतीची पिशवीच पोरगा विसरला. " सोन्या म्हातारा हें ऐकून गोंधळला; त्यांतच त्यानें संगापाच्या टोपलींतला नाग पाहिला अन् तें भलं मोठं जुनाट जनावर बघून चिंतागती होऊन बोलला,

" लेकांनो ! पान लागून किती येळ झाला ! अन् तुमी गप्प बसून पोराला कां अपघात करतां ! "

असें बोलून म्हातारा उठला. तरातरा आपल्या पालावर गेला. घागरभर गार पाणी आपल्या अंगावर घेतलें. ओल्या पडद्यानें व्यंकोबा मूर्तीपुढें उभा राहिला. भक्तिभावानें हात जोडले. देवापुढची वनस्पतीची पिशवी घेतली. कोणाचा विटाळ होऊं नये म्हणून गडी, बाया व पोरें बाजूला हाटकलीं. ध्यनस्थ मुद्रेनें, तोंडानें कांहींतरी पुटपुटत तो संगापाजवळ आला. त्याच्या अंगावर गार पाणी शिंपडलें. तीन वेळां अंगावर हात फिरवला. मोठ्या पिशवींतील बारीक चंची काढली. त्यांतील एक मुळी काढली. स्वतःच शेजारच्या दगडावर उगळून त्याचा रस काढला. तो संगापाच्या जिभेला तीन वेळा लावला. पुन्हां डोळ्यांत घातला आणि त्याला उठवून व्यंकोबाच्या पुढें झोंपविला...

भोंवतालीं जमलेल्या गडी-बायांच्या चेहेऱ्यावरील चिंतेची झाक निघून गेली. त्यांनीं सुटकेचे दीर्घ निस्वास सोडले, निर्धास्त मनानें उठले आणि आपापल्या पालावर गेले.

अंधार पडला. रात्र झाली. पालापुढें चुली पेटल्या. गडी—बाया
भुकेपोटीं पुढें आलीं तीं जेवलीं आणि थोड्याच वेळांत
पालं पुन्हां गर्द अंधारांत गडप झालीं.

त्या दाट अंधारांत उगीचच कुत्रें विव्हळून रडले...

टिटवी ओरडून पालावरून फेरी मारून गेली....

रात्र उजडत आली. कोंबड्यानें बाग दिली. पालं जागीं झालीं. नाग—पंचीमचा दिवस उजाडला...

आणि भल्या येरवाळी झाडून सगळे वैदू उठले. त्यांचे चेहरे खुलले होते....पालावरून गडी निघाले. बाया निघाल्या. पोरें निघालीं आणि तालुक्याच्या गांवची वाट धरली. गड्यांनीं हातांत नागाच्या टोपल्या घेतल्या. बायांनीं जवळ झोळ्या घेतल्या. भांडीं-मडकीं घेतलीं. पिशव्या घेतल्या.

संगापाचा भाऊ गुरप्पाहि नागाची टोपली घेऊन वाटेला लागला. नाग-पंचीमचा दिवस म्हणून त्याच्याहि चेहऱ्यावर टवटवी उमटली.

पालावर संगापा पडला होता....

त्याला उतारा पडला नव्हता. त्याचा हात सुजला होता. डोळ्यांत वेगळीच धुंदी दिसत होती. अंगांत अधिकच जडपणा शिरला होता. त्याच्या हालचालींत अस्वस्थपणा दिसत होता.

नागपंचीमचा दिवस बुडाला...

*　　　*　　　*

झांजड पडली आणि एकामागें एक वैदू तालुक्याहून पालावर आले. कुणी गप्पा हाणीत आले. कुणी खुषींत गाणें म्हणत आले. पोरें उड्या हाणीत आलीं. नागपंचीम आली अन् पुढच्या सालाची चिंता निघून गेली. प्रत्येकानें जुन्यापान्या कपड्याचीं गाठोडीं बांधून आणलीं होतीं. झोळ्या पोळ्या—धान्न्यांनीं भरल्या होत्या. नागोबाला वाढलेल्या दुधांनीं भांडीं—मडकीं भरून आणलीं होतीं. त्यांतच तांबड्या पैशाची, आण्या—दोन आण्यांची ओंजळभर चिल्लर कुणी कुणी मिळवली. सगळेच गडी, बाया आनंदानें पालावर आले.

गुरप्पाहि पालावर आला. त्यानें हातांतली नागाची टोपली खालीं ठेवली. धान्याची झोळी बाजूला ठेवली. त्याच्या बायकोनें जुन्या कपड्यांचें गाठोडें खालीं ठेवलें. धोतराच्या धडप्यांत बांधलेल्या पोळ्या बाजूला ठेवल्या आणि त्या कपड्याकडे बघून गुरप्पाच्या चेहऱ्यावर समाधानाची झळाळी उठली.

पालांत चुली पेटविल्या. जाळाचा उजेड पडला....

संगापा कण्हत उठून बसला. त्याच्या डोळ्यांत अधिकच धुंदी उतरली होती. जीभ जड झालीं होती आणि त्यांतच कपड्याचा पुढचा ढीग बघून संगापाच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव उमटले. त्यांतच तो अडखळत्या जिभेनें बोलला—

" आपा ? माझ्या अंगाला येणारी धड पैरण मिळाली ? "

आणि संगापाच्या या बोलण्यानें गुरप्पाला धीर आला आणि त्याचा जीव खालीं पडला. त्याला वाटलें, गड्याला उतारा पडत चालला. त्याचें बोलणें ऐकून एकदम समाधानांत गुरप्पा म्हणाला,

" चांगली पैरण मिळालीय, बरं कां ! "

असें सांगून त्यानें चटकन् गाठोडें सोडलें. त्यांतला निळ्या रंगाचा, चांगला घड शर्ट बाहेर काढला आणि संगापाच्या हातीं दिला. तो पाहून संगापाच्या तोंडावर तेज चमकलें आणि विव्हळतच तो शर्ट त्यानें अंगांत घातला...त्याबरोबर त्याला हर्ष झाला....व त्यांतच त्याच्या तोंडांतून अडखळते बोल बाहेर पडले,

" आपा ! ही पैरण मला चांगली सहा महिनं जाईल ! "

आणि लागलीच गुरप्पाच्या बायकोनें झोळींतल्या पोळ्या ताटांत काढून ठेवल्या. संगापापुढें त्यांतल्या चार पोळ्या ताटांत वाढल्या. मडक्यांतली आमटी वाढली. संगापा पोटभर जेवला आणि निवांतपणें झोंपीं गेला.... पालांतल्या चुली विझल्या. अंधार आधिकच दाटला आणि सगळीं पालं त्यांत बुडालीं.

रात्रींत संगापाला जास्त झालें. त्याच्या जीवाची तगमग झाली. त्याची जीभ एकदम बंद पडली. अंगांत भलताच जडपणा आला नि त्यामुळें त्याची हालचाल बंद पडली...

दिवस उगवला....त्याचें सगळें अंग पिवळें पडलेलें दिसलें. त्यानें गुरप्पाचा जीव खालींवर होऊं लागला...माणूस जमले....आणि कुणीतरी बोललें,

" गड्याला औषधाचा गुण आला न्हाय ? "

आणि घटकाभरांतच पुढें संगापानें जीव सोडला...संगापाच्या अंगांत तो धड निळा सदरा तसाच होता...आणि समाधानाचें तें हास्य त्याच्या चेहऱ्यावर तसेंच उमटलेलें दिसत होतें....

—आणि मग आपोआपच गुरप्पाच्या डोळ्यांतून अश्रु ओघळूं लागले.

त्याचा कंठ दाटून आला, म्हणून तो बोलतां बोलतां गप्प झाला. जवळच संगापाच्या समाधीचा दगड होता, तिकडे तोंड करून भक्तिभावानें त्यानें त्याला हात जोडले....

—मग ही गोष्ट बाकी वैदू गड्यांच्या ध्यानीं आली. तेहि त्या स्मृतीनें गप्प झाले. सगळेच गप्प झाले व नदीच्या सो ऽ सो ऽऽ आवाज देणाऱ्या पात्राकडे आशेनें बघूं लागले.

दिवस उगवून बराच वर आला आणि उद्यांची नागपंचीम एकदम त्यांच्यापुढें उभी राहिली. मण्याप्पानें पुन्हा पेटविलेली चिलीम विझवली. खालीं ओतलेली राख हाताच्या बोटानें दाबीत तो हलक्या आवाजांत गुरप्पाला समजुतीनें म्हणाला,

" आपल्या जातीचं नशीबच असं.... !

त्यानें गुरप्पाची समजूत घातली अन् त्या क्षणीं त्यानें आपले डोळे पुसले व पुन्हां संगापाच्या समाधीकडे बघितलें....त्याबरोबर चिक्कार भरून चाललेल्या नदीकडे त्याची नजर गेली व मंद आवाजांत तो म्हणाला,

" गड्यांनों ! आतां उठा ! दिवस लांब वर आला. उद्यांच नागपंचीम. मिळकतीचा दिवस ! "

आणि मग सगळेच गडी उठले. आपापल्या पालावर गेले. फडक्यांत भाकरी बांधून घेतल्या. नाग ठेवायच्या टोपल्या हातांत घेतल्या. चरीचा फास लावलेला लांब वेळू हातांत घेतला आणि नदीच्या काठाकाठानें ते निघाले....त्यांत गुरप्पा पुढें होता. त्याचे कुत्रें त्याच्या मागें होते.

तो संगापाच्या थडग्याकडे पाहत होता...व झपाट्यानें नदीच्या कांठाकडे निघाला होता....

# माकडवाला

वाळेवाडीच्या माळावर दरसालाप्रमाणें यंदाहि माकडवाले उतरले होते. पहिलाच गारवा, मग त्यांना उघड्या माळरानावर कुठली नीट झोप ! ते भल्या येरवाळी उठले होते, भीक मागण्यासाठीं पालांतून दिवसा-बरोबर बाहेर पडण्याच्या तयारीला लागले होते. कुणी खालच्या लवणांतल्या ओढ्याला जाऊन चूळ भरली, कुणी धारेचें वाहतें पाणी गिलटाच्या भगुल्यांत भरून आणलें. आदले दिवशीं गांवांतून, मळ्या-वस्तीवरून मागून आणलेल्या ओल्यावाळल्या भाकरी–चटणीवर ताव मारू लागले. पोटांत दिवसाचा आधार करू लागले, सगळी चव-ढव सोडून सूर्य उगवतांच पालाबाहेर पडण्याच्या ते घाईत होते. तुकडा खाऊन झाल्यावर लेकुरवाळ्या बाया तान्ह्या पोराला पाजीत बसल्या व त्यांच्या केसांत बारीक नजरेनें बोटें चालू लागल्या. कुणी वाळल्या तुकड्याचा तोटरा घशांत बसला म्हणून लोटक्यानें घटाघटा पाणी पीत होते, निवांत होऊन पालाबाहेर येत होते. उघडीबंब बिनकळतीं मुलें तसल्या गारठ्यांतहि चवीनें तुकडा चघळत होती. ती आई–बाच्या पाठीमागें घुटमळत होती.

सगळ्या पालांत एकच घाई झाली होती. दिवसानें तोंड दाखवलें. गडी-बाया, कळती पोरें आपलीं माकडें घेऊन, काखेला ती मळकट झोळी अडकवून मळ्या-वस्तीच्या वाटेने निघण्याच्या घाईत होती.

थंडीचे दिवस....अन्

त्यांत सकाळीं भलताच गारठा पडला. अंगाला झोंबू लागला. कांहीं माकड-वाले येरवाळीच उठून काटक्याकुटक्यांचा जाळ करून मनसोक्त शेकाटा घेऊ लागले. त्यांत गंगाराम म्हातारा, आपले उघडे हात-पाय जाळाजवळ

घेऊन बसला. त्याच्या अंगाला चांगली धग लागली, अंगांत ऊब आली, बसल्या जागीं सावरून, तोंडावरचा घोंगड्याच्या पटकाराचा पदर काढून बाजूला थुंकला व तोंड मोकळें करून त्याच्या कैकाडी बोलींत बोलला—

"पोरांनो ! या माळावर लागेल तेवढं शेण्या-शेणकूट पडलंय् ते तरी आणा ! तेनं चांगला निवार जाळ अंगाला लागल !"

गंगाराम म्हाताऱ्याचा बोल ऐकला. त्याच्या बोलाला पोरांनीं मान दिला व ती शेण्या-शेणकूट चघाळ-काटक्या आणावयास माकडासारख्या उड्या मारीत पळालीं.

....शेकोटींत रान-शेण्याचा, काटक्यांचा चांगला जाळ लागला. निवार विरत् पडला आणि गंगारामाच्या अंगांत उबीनें चांगला जीव आला. विस्त-वाकडे पायाचे तळवे व वर हातांचे पंजे धरून त्याची नजर जवळच लवणां-तील काळ्या शिवरांत एकन्हेर बसलेल्या जोंधळ्यावर गेली. रसरसलेल्या दाण्यांची तांब्याएवढी हुरड्यांत आलेली कणसें बघून त्याच्या तोंडाला पाणी सुटलें. त्यावर वासना जाऊन जवळच बसलेल्या म्हाताऱ्या बजाला बोलला,

"बजा ! बग, लेका ! लवणांतल्या पट्टींत काय पीक बसलंय ! आपल्या बापजल्मी हुरड्यांत आलेला दुधाचा दाणा चावायला मिळाला का ?"

गंगाराम असा बोलला व आपली घारीसारखी तळपती नजर पिकाकडे लावली. त्याच्या सुरकुतल्या चेहऱ्यावर वेगळेच तरंग उठले.

गंगाराम म्हाताऱ्याचे ऐकून शेकाटा खात बसलेल्या गडी व पोरांच्या नजरा त्या पिकावरून भोरड्या पांखरासारख्या तरंगू लागल्या. ते रोजच भीक मागावयास त्या जोंधळ्याच्या बांधाबांधानें जात, पण गंगारामाच्या बोलानें, त्यांच्या हावऱ्या नजरा करड्याचे हिरवेगार पट्टेच्या पट्टे व त्याची तांबूस-पिवळसर बोंडें सोडून हुरड्यांत आलेल्या दाणेदार कणसांवर धावल्या. सगळेच गप्प झाले. कुणी कांहींच न बोलतां पिकाकडेच बघू लागले.

जवळच हिरव्याचार थापच्याथाप बसलेला हरबरा व त्याची निळसर-जांभळी फुलें पाहून, गंगारामाच्या मनांत कालवाकालव झाली. त्याचे ओठ थरारले व त्यांतून हालकेच शब्द बाहेर पडले—

“उभा जल्म घालवला दुसऱ्याच्या दारांत माकडा-माकडाचा खेळ करण्यांत व भीक मागण्यांत पण....!”

गोफणींतून पिकांत बदकन धोंडा पडला अन् लांड्या-भोरड्यांचे कळप पिकावरून उडून भरारत बांधावरचे झाडाझुडपांवर बसले....त्याबरोबर माकडवाल्यांच्याहि नजरा मागे फिरल्या. थंड झालेल्या शेकोटींत काटकीने उसकटून त्यांतला विस्तू बाहेर काढला व पुन्हां त्यावर सर्वांनी हात.चे पंजे धरले. तोंडावरून हाताचे ऊन पंजे फिरवून तरतरीत डोळे करून बजा गंगारामला बोलला,

“गंगाराम! आपल्या जातीला मुळचाच श्राप हाय! दारोदार... घरुघर माकडं घेऊन भिक मागायचं!”

बारीक डोळे करून गंगाराम बजाकडे बघून म्हणाला “अरं, हे असं कुठपातूर जल्म जायाचा! आमचा गेला....मस्त झालं! पण या बारीक लेकरा-बाळाला तरी रांकेला लावा!”

“तुझा बोल ठीक! पण माकडवाल्याचा धंदा सोडला तर भावकी काय म्हणल? जात वाळीत टाकील की!”

“हे बघ बजा! जातीबरोबर माती खाल्ली, जलूमपातूर या पालांत खितपत पडलो!”

“गंगाराम! पालं वाडवडलाचा सत्तंचा निवारा! त्यांत जल्म जगून उलटा बोलायला लागलास!”

“खरं हाय! जल्म काढला, पण माणसातनं बाहेर!”

गंगारामाचा बोल ऐकून बजा थोडासा चिडला व आवाज चढवून म्हणाला,

“हे माळरान सोडून....माणसांत काय हाय....?”

दोघेहि म्हातारे....गंगाराम व बजा, यांचा बोलांत बोल वाढला व चांगलेच जुंपले. अंगावरचीं पटकारे खालीं घसरलीं. सूर्यानें चांगलेच तोंड दाखविलें आणि पालांतले माकडवाले पालाबाहेर आले. माकडे सोडलीं.

बाहेर पडण्यासाठीं चारी वाटेला त्यांची तोंडें झालीं. त्याच्या आशाळभूत नजरा लांब लांब मळ्यावस्त्यावर गेल्या. ते पुढच्या वाटेला लागणार....

—तोच बाळेवाडीचा पाटील व एक पोलीस पालामागून आसनधपक्या दिवस उगवायाला पालापुढें आले. मांजरीला बघून कोंबडीची पिलें बावरतात, तसच माकडवाले गोंधळले. त्यांच्या काबऱ्याबावऱ्या नजरा एकमेकाला डकू लागल्या.

पालावर एकाएकी पाटील, पोलीस कां ?—म्हणून माकडवाले एकमेकाला मूकपणें डोळ्यांनीं पूसू लागले.

—आणि पालावर नवीं माणसें बघून मुटका होऊन बसलेलीं कुत्रीं घशांतल्या घशांत गुरगुरूं लागलीं, हेरक्या नजरेनें पाटील व पोलीसाला पाहून दमादमानें भूंक टाकूं लागलीं. हुशार-बेरकीं कुत्रीं भुकत, तावदारून त्यांच्या अंगावर चाल करीत आलीं. पोलिसानें त्यांच्या अंगावर दगड भिरकावला, तर दगडच चिडीनें कुत्रीं फोडूं लागलीं आणि त्यांनीं भुंकण्याचा अधिकच कालवा केला व ते त्यांच्या येरगल्यांत घावले. तोंच कुणीतरी माकडवाल्यानें कुत्र्यांवर धोंडा टाकला व कुत्रीं लांब भुकतच पांगलीं.

पाटील-पोलीस पाहून गंगाराम एकदम उठला, अंगावरचें पटकार बाजूला टाकून पाटलापुढें धावला व त्यांचें पायां पडला व हात जोडून बोलला,

"मालक ! सरकारला बरोबर घेऊन एवढ्या येरवाळीं गरीबाच्या पालावर !"

पाटील-पोलीस यांना पाहून पालाच्या तोंडाशीं बसलेल्या बायांनीं पिती मुलें तोडून कडेवर घेऊन झिंज्या मागें सारत, फाटक्या जुनाऱ्याचा पदर नीट घेऊन भेदरलेल्या नजरेनें पुढें आल्या.

चार दिशांना तोंडें करून उभे असलेले माकडवाले पुन्हां झाडाला माकडे बांधून चमत्कारिक चेहरे करून पुढें आले. गारठलेलीं उघडीं-नागडीं पोरें गोळा झालीं. कुत्र्यांनीं भुंकून अधिकच कालवा केला होता. त्यांत माकडवाल्यांचा आपापसांत बोलण्याचा कलकलाट चालला होता.

माकडें नवख्या माणसांना पाहून उलट्या-पालट्या उड्या मारूं लागलीं, दांत विचकावून गुरगुरूं लागलीं, बांधलेल्या साखळीला हिसके देऊं लागलीं.

पोलिसावर चाल करूं लागलीं. तीं झाडाच्या बुडख्यांतून, फांद्यांवर बसून, पुन्हां पुन्हां दांत विचकावूं लागलीं व साखळीला हिसके देऊं लागलीं.

पालापुढचीं गाढवें फुरफुरलीं. कान झाडूं लागलीं. पालापुढच्या गाई बावरल्या. त्या ठिस्कारूं लागल्या. कोंबडीं उंच माना करून "कोऽकोऽऽ" आवाज करूं लागलीं.

पालावर एकच गोंधळ झाला, कालवा झाला आणि ते बरोबरच होतें. कुणी अंमलदार पालावर आला कीं, माकडवाले काळजींत पडतात. उभीं केलेलीं पालें उठवावीं लागतात. त्या गांवची शीव सोडून दुसऱ्या गांवच्या हद्दींत जावें लागतें. भरल्या ताटावरून उठवावें, तसेंच माकडवाल्यांचें होतें.

....त्यांत पोलिसाला बघून त्यांच्या काळजाचें पाणी झालें, उगाउगीं गेटावर नेऊन बसविणार कीं काय, म्हणून ते सगळेच घाबरले व गंगाराम पोलिसाच्या पायां पडून म्हणाला,

"सरकार ! काय हुकूम आणलाय् ?"

तोंवर पोलिसाची कावळ्यासारखी नजर पालापालांत सुगावा घेत होती. एका पालांतून दुसऱ्या पालांत शिरत होती. त्याच्या धुंडाळत्या नजरेस कांहीं घावत नव्हतें.

माळावरचीं पालें उघडीं, रिकामीं. पोत्याचीं पटकारें, वाकळा–गोधड्या, चार गिलटांचीं भांडीं याशिवाय पोलिसाला दुसरें काय दिसणार !

पोलिसानें आपली नजर सगळ्या पालांवरून फिरवून डाफरत्या आवाजांत म्हाताऱ्या गंगारामला म्हटलें,

"तूं म्हातारा झालास ! तुझ्याजवळ सगळी कळ आहे, बघ ! मळेकऱ्यांचीं कणसं खुडतां काय ! वाटकाचे भारे बांधून रात्रीं आणतां ! बरं बघतो तुमचं !"

असें निबार आवाजांत बोलून हातांतला दंडुका फिरवीत माकडवाल्याचे चेहेरे न्याहाळूं लागला.

–आणि पोलिसाच्या दमानें माकडवाले भलतेच घाबरले व फुकाफुकी हा काय आळ... ? म्हणून त्यांचे चेहरे उतरले. गंगाराम पुन्हां हात जोडून गरीब गाईगत कळवळून बोलला, "पाटील ! तुमी या आयपाढरीचें मालक !

सालोसाल तुमच्या गांवीं येतों. माकडवाल्यांची कधी कागाळी आली का? बोला! मग आमा गरीबावर कां ह्यो आळ?"

गळयांतले धोतर मागेंपुढें सारीत पाटील म्हणाला, "गंगाराम, तुला मी ओळखतों! अरं, पन तुझ्यासारखीं सारीं हायेत का? लेकांनो, पिकवाल्या मळंकऱ्यांनीं तुमच्या नांवानं खबरी दिल्या!"

"पाटील! एक तत दहा घरं मागून खाणारीं आमची जात! कधीं कुणाच्या जिनसाला हात लावायची न्हाय!"

"अरं मला ते माहीत हाय! पन लुगं कुणीं खुडावं? बाटूक कुणी उपटावं?" असें म्हणून पाटील विचार करूं लागला.

"मालक! दारांत कणसाच्या पिशा तर बगा! का पालांत दाणा हाय?"

त्यात पाटीलच पुन्हा पोलिसाकडे तोंड करून हलकेंच म्हणाला, "भाकरी मागून खाणारी ही जात! कशाला या धंद्यांत पडतीया?"

पाटलाचे म्हणणें पोलिसाला पटलें नाहीं म्हणून तो म्हणाला, "पाटील! तुम्हांला मालमुद्यांसह माकडवाले पकडून दाखवीन, मग तुम्हाला माझ्या बोलण्याचा खरा-पत्ता लागेल." पोलीस असें ठासून बोलला व त्यानें पुन्हां एकवेळ आपली नजर आजूबाजूला फिरवली व दोघेहि गांवाच्या वाटेनें निघाले.

गंगाराम त्यांच्या पुढें झाला व पाटलाचे पाय धरून म्हणाला, "पाटील तुमी गांवचं मालक, मी हीं पालं घेऊन कोल्हापूरपासून नागपूरापासून मुलूखं फिरलों. आतां या माझ्या लेकरांबाळांकडं बघा! अन् कायमचं या माळावर निवाऱ्याला जागा द्या! तुमच्या आसऱ्यानं आमी जगूं!"

पाटील हंसून बोलला, "लेकानो तुमी दहा गांवं मागून खाणारं, तुमाला एका गावाचं अन्न गोड लागतंय का?"

त्यावर लागलींच पोलीस म्हणाला, "कायमची वस्ती करून गांवालाच उठवावयाचा माकडवाल्यांनीं विचार केला कायरं ऽऽ"

गंगाराम हात जोडून म्हणाला,

' नका तसं वंगाळ बोलू ! गांव ततं माकडवालं जगणार ! ''

" अरं, तुमी बोलण्यांत पटाईत ! धावाल झपाट्यांत तवा दिसंल ! ''

असें बोलून पोलिसानें पुन्हां पालावर नजर फिरविली व वाटेला लागले.

जरा अंतरावर असलेल्या दुसऱ्या पालावर त्यांची नजर खिळली....

पालावरून पाटील-पोलीस गेले आणि माकडवाल्यांना एकदम फाशांतून मोकळें पडल्यासारखें वाटलें. चारा-पाण्याला घरट्यांतून पक्षी बाहेर पडावेत तसें माकडवाले रानोमाळ गेले...

दोनचार दिवसांनीं पोलीस ध्या--दुपारा पालावर येई व टेहळणी करून जाई...असे आठ दिवस गेले.

अंधार दाटला होता. सगळे माकडवाले पालावर आसऱ्याला आले. पालाबाहेर धोंड्याच्या चुली पेटल्या.

लोटक्यांत, भगुल्यांत वाढून आणलेल्या शिळ्या कोरड्याशाला बाया जाळ लावू लागल्या. त्यांत वाळल्या भाकरीचे टुकडे टाकून शिजवूं लागल्या. लहान मुलें आशेनें चुलीजवळ सरकून बसलीं. तान्हीं मुलें बायांना चिटूं लागलीं.

गारठ्यांत...पालापुढें माकडवाले शेकत बसले होते, विचार करीत होते. त्यांत गंगाराम म्हातारा बोलला,

" आमी कुणाच्या वाळल्या पाचोळ्यांवर पाय देणार न्हाय ! मग पोलीस इळातिंदा पालावर कां येतु ? ''

शेकोटींतल्या जाळाचा मध्येंच भपका होई व त्याच्या उजेडांत माकड-वाल्याचीं तोंडें दिसत....आणि ते चिंतागती होऊन विस्तवावर हात धरीत.

बजा हलक्या आवाजात म्हणाला, " करणी एकाची अन् आळ माकड-वाल्यावर ....! ''

मध्येंच कुणी तरी बोललें,

" भामट्याचा गुन्हां पचवायचा अन् माकडवालं दानाला दियाचं. माकडा-सारख्या मुक्या प्राण्याला आमी शिकवतों ! आम्हांला कां कळत न्हाय पोलिसाचं ! ''

गंगाराम हलकेंच म्हणाला, " तसंबी असंल. शेजारगुण म्हणून आपल्या-वरहि पाळत असेल ! म्हणूनशान म्हणतो, आतां कायमची वस्ती बगा ! ''

पालावर पोलीस कां रोज रोज येतो, याचाच खल करीत माकडवाले शेकोटींभोवतीं बसले. त्यांत निम्मी रात्र झाली. शेकोटीनें अंगांत उबारा आला आणि माकडवाल्यांनीं बसल्या जागीं पक्ष्यासारखें डोळे झांकले. शेवटीं शेकोटीच्या उबेच्या बाजूला कलंडले.

रात्र उजाडली. दिवसानें तोंड दावलें आणि माकडवाल्यांची गाळण उडाली. त्यांचा गोंधळ झाला. नांवें घेऊन झुलप्या, तान्या, रान्या व मरीआबाई यांना पोलिसांनीं धरलें व पुढें घेऊन त्या उभ्या पिकाकडे चालले.

माकडवाल्यांचा कालवा झाला. बायापोरांचा रडण्या-ओरडण्याचा गोंधळ झाला व ते सगळेच त्यांच्यामागें रडत-ओरडत चालले.

गंगाराम म्हतारा पोलिसांना चालता चालता पुढें होऊन हात जोडून म्हणाला,

" पोरं बिनदोषी ! काय म्हणून तेना नेताय् ?

एक आडदांड पोलीस गंगारामाच्या अंगावर धावला व त्याला धक्का देऊन म्हणाला, " म्हाताऱ्या चल तुला दावतो ! "

असें म्हणून ते पुढे चालले....

पिकानें मातलेली काळी पट्टी आली. सगळेंच पाहतात तो काळ्या पट्टींत हुरड्यांत आलेले कणीस ना कणीस कुणी खुडून नेलें होतें. आणि सगळा उभा जोंधळा मुडा दिसत होता.

धरलेल्या माकडवाल्यांना दरडावून हवालदारानें विचारलें,

" काय रे ! हीं कणसं तुमींच खुडलीं ना ? "

मध्येंच गंगाराम बोलला.

" सरकार ! त्यास्नीं काय इचारता. आमच्या पालांत मालमुद्दा हाय का बगा कीं ? "

पिकाच्या बांधावर बरेंच माणूस जमलें होतें. मळ्याचे मालक तोंडानें वटवट करीत होते, माकडमाल्यांच्या नांवानें ओरडत होते. सगला जोंधळा भुंडा केलेला बघून माणसें हळहळत होतीं.

" आम्हां गरिबालाच उगाउगी धरले ? " म्हणून माकडवाल्या बाया रडत-ओरडत होत्या,हाणून घेत होत्या.

पिकाचा, जागीं पंचनामा झाला आणि माकडवाल्यांना गांवच्या गेटावर पोलीस घेऊन माळरानांतून निघाले. वाटेनें चालता चालतां पाटील मध्येंच बोलला;

" अरं लेका ! भामट्याची पालं रातींच हालली कां ? "

——आणि पुढेंच सगळे जातात....तों त्यांना भामट्यांच्या पालांच्या जागीं बडवलेल्या कणसाच्या पिशाच पिशा विखुरलेल्या पडलेल्या दिसल्या.

——आणि अनेक उन्हाळे-पावसाळे काढलेल्या पाटलाच्या मनांत दाट शंका आली .... पोलिसांचीहि नजर मोकळ्या पिशावर खिळली .... व भामट्यांच्या पालाच्या मोकळ्या जागेवर तरंगूं लागली.

मालमुद्दा घावला...पण भामटे गेले....म्हणून पोलीस विचारांत पडले. ....त्या जागींच माकडवाल्यांना सोडले आणि पोलीस व पाटील भामट्यांच्या मागावर माग काढीत गेले....

माकडवाले पालांवर आले. हनुमंतानें दया दाखविली या भावनेनें त्यांनीं माकडाचे पाय पुजले.

आलेलें संकट गेलें...आणि पुन्हां ही पीडा नको म्हणून माकडवालेहि रातोरात माळं सोडून लांब लांब वणव्यांत घावलेल्या पक्ष्यासारखे निघून गेले.....

# बेलदार

कामतगांवीं सुगी संपली. माणूस कामांतून मोकळे झाले. तरणीं पोरं गांव--शिवेवरच्या उरूस-जत्रेला पळूं लागलीं. तमाशाच्या कनातींत गर्दी करूं लागलीं. कर्ते गडी मारुतीच्या देवळांत दुपारचे ऊन निवांतपणें उतरूं लागले....

आणि नेमके हे दिवस गांठून खंडा बेलदार गांवाला उतरला. बाजार-पटांगणांत त्याचें पाल पडलें. त्याचीं गाढवं पटांगणात सुटलेल्या गाडी-घोड्यापुढें पडलेल्या चिपाडाकडे धांव घेऊं लागलीं. गांवच्या गल्ली-बोळीं-तले उकीरडे फुंकूं लागलीं. ओढ्याच्या हिरव्या दरडावर दात आपटूं लागलीं. फुरफुर करूं लागलीं आणि त्याबरोबर गांवाला बेलदार आल्याची वर्दी लागली.

रिकामें माणूस देवळांतून बाजार-पटांगणांत येऊं लागले. मोकळ्या वेळीं बेलदाराच्या पालापुढें बसूं लागले. पान-तंबाकू चघळत गावोगांवच्या गप्पा-गोष्टी बेलदाराच्या तोंडांतून निर्मळपणें ऐकूं लागले व त्यांतच इकडच्या सांवल्या तिकडे उतरूं लागले.

खंडा बेलदार गांवाला येऊन चार दिवस पुरे होतात तोंच कामाचा ठेका त्याला मिळाला होता. शाळेकरतां ओढ्यांतील खाणीवर पडलेले दगड आणून टाकायचे होते. ते महिनाभर पुरेल एवढें काम होतें. म्हणूनच बेलदार गडी पुढच्या काळजींतून सुटला होता. त्यांतच दुसरें एक आप्पा शेंडग्याचें काम मिळालें होतें. तीन दिवस पुरेल एवढें. गांवठाण्यांतील पांढरीची माती आणून टाकावयाची होती. शेंडग्याला गोठ्याच्या भिंतीसाठीं

शेंड्याची जरूरी होती. कामांत काम घावलें आणि त्यानें खंडा बेलदाराला अधिकच हुशारी चढली.

आप्पा शेंडग्याची माती आणून टाकावी. त्यांतून पहिल्यांदा मोकळें व्हावें आणि मग शाळेचे दगड आणून टाकण्याच्या कामाला लागावें, असा खंडा बेलदाराचा बेत झाला व तसे नवरा-बायको कामाला लागलीं.

एक दिवस शेंडग्याची माती टाकली. दुसरा दिवसहि सरत आला. मातीची ठिकीच्या ठिकी गाढवावर लादून शेंडग्याच्या दारांत टाकली. ‘ आजचा दिवस सरला का एकच दिवस राहिला. तो झाला का शाळेच्या कामाला नेटानं लागावं. पत्करलेलं काम पुरं करावं. हातीं मिळालेल्या पैशांतून घर-प्रपंच वाढवावा, ’ असा एक विचार त्याच्या मनांत तरंगत राहिला.... आणि तसाच तो शेवटची खेप घेऊन निघाला.

सूर्य धरतीमातेच्या कुशींत पूर्ण विसांवला. रानांत चरायला गेलेलीं गुरं-ढोरं गावांत आलीं. पक्षी रात्रीच्या विसांव्याला झाडांत बसले आणि शेवटची खेप टाकून खंडानं गाढवं पालाकडे काढलीं.

खंडाचीं कळतीं-खेळतीं दोन पोरं, मोकळीं गाढवं पाहून त्यावर टणाटण उड्या मारून बसलीं. माकडाच्या पिल्लागत त्यांच्या पाठीला चिकटलीं आणि हातांतल्या फोकांचे सपकारे मारून गाढवं भूजवूं लागलीं. ताणूं लागलीं. खंडाहि त्यांच्या मागें दुडक्या चालीनें धांवूं लागला. पालापुढें गाढवं आलीं. पोरांनीं दणादण खालीं उड्या टाकल्या. भुकेलीं गाढवं वसा वसा करूं लागलीं. कुठेंहि तोंड घालूं लागलीं. खंडानें त्यांच्या पाठीवरील मोकळ्या गोण्या काढल्या. फावडे—पाटी काढली. आणि त्यांना नीट कळाव घालून बाजार पटांगणांत मोकळीं सोडलीं.

उभ्या उभ्याच खंडानें नेसल्या धोतराच्या सोग्यानें हात पाय झाडले. मातीनें भरलेलें तोंड पुसलें व पालापुढें तो टेकला. तोंच लहान पोरगें धांवत आलें. त्याच्या मांडीवर बसलें. तो मुलाच्या पाठीवर हात फिरवत निवांत बसला. खंडाच्या बायकोनें-धुरपानें कडेवरचें मूल खालीं ठेवलें. घागरींतल्या पाण्यानें हात धुतले. तोंडावरून पाण्याचा हात फिरवला. चुलीपुढें बसली. चुलीचे

दगड नीट मांडूं लागली आणि चुलींत काटक्या-कुटक्या घालून चूल पेटवूं लागली.

तोंवर दिवेलागण झाली. अंधार जोर करून आला. सगळें बाजार-पटांगण त्यानें पोटांत घेतलें. धुरपानें चूल पेटविली आणि चुलींतील जाळानें अंधारांत गडप झालेल्या पटांगणाला जाग आली. जाळाच्या उजेडांत चुलीवरच्या तव्याकडे टकाटका लागलेले पोरांचे डोळे अधिकच चमकूं लागले... चूल चांगली पेटली, तवा तापला, तव्यांत भाकरी पडूं लागल्या. लाल इंगळावर त्या टम् होऊं लागल्या. भाकरींनीं टोपलें भरलें. भगूल्यांत कोरड्यास शिजलें. आणि खंडा चुलीच्या उजेडांत पोरं घेऊन पुढेंच सरकला. धुरपानें त्याला थाळींत वाढलें आणि सगळीं पोरं त्याच्या ताटांतच जेवावयाला बसलीं. धुरपा झोंपेला आलेल्या किरकिरल्या पोराला घेऊन पाजीत बसली.

जेवतां जेवतां खंडा आपल्या बायकोला शांतपणें बोलला,

"बरं झालं! गांवाला आल्या आल्या चांगलं काम लागलं!"

"गांवाची मर्जी! तेवढंच चार दिस पुढं गेलं!"

पितांपितांच मांडीवर झोपलेल्या लहान मुलाला पटकरावर ठेवतां ठेवतां ती बोलली. तेवढ्यांत खंडानें आपल्या मनांतला विचार बायकोपुढें ठेवला,

"एवढं सगळं काम होईल! हातांत काय रक्कम पडंल, तवां मी म्हंतों एक नव्या तानाचं गाढावं तरी घ्याव."

"घ्या कीं! कवातरी एक जनावर ठकलंयच. ते कवा पटकन् वाटंत बसल सांगता येत न्हाय. तवा ठीक हाय, जनावरच चांगलं नेटाक बघून घ्या! त्यांत घरांत भांडं न्हाय! ती घियाला पायजे!"

"एक एक तरी बग! मग भांडीं बासणांचं पुढं बग! दारांत जनावर आलं का तेच्या मागं समदं येतंय!"

"तें बी खरं हाय! पण वडींत वड तीबी काढल्याली बरी! त्यांत पोरांच्या अंगावर नीट घडूत न्हाय!"

मी बोलतुया एक अन् त्यांत तुजं दुसरंच निघतंय! पोरास्नीं नीट अगराक न्हाय! तुझ्या अंगावर धड जुन्यार न्हाय! माझ्या धोतराचं कस

बी होईल! हें सगळं मला कळतं, पण जेच्या जीवावर हें करायचं तेंच दारांत आनूंया! मग पुढं आपोआप रांकेला लागंल!"

"बरं! तुमच्या का इचारानं कराना! पन् सवडीनं तेच्याबराबर हेऽबी बघितलं पाहिजे."

"तेला कोन न्हाय म्हणतया!" असें खंडा कबुलीच्या सुरांत बोलला.

असेंच घरप्रपंचाचं बोलत बोलत खंडा जेवला. धुरपा मागाहून जेवली. कळाव घालून सोडलेलीं गाढवं खंडानें हांकून आणलीं. पालापुढें बांधलीं. कुणाकुणाच्या दावणींतून आणलेलीं वाळलीं चिपाडं, सरमाड गाढवापुढं टाकलीं. तशी तीं कडाकड फोडूं लागलीं.

खंडा पालापुढेंच कलंडला आणि भुईवर अंग टाकल्या टाकल्या त्याला डोळा लागला. धुरपानं भांडीं-बासनं आवरलीं नीट पालांत ठेवलीं. खंडाजवळच वाकळ टाकून त्यावर बाजूला पडलेलीं पोरं उचलून ठेवलीं. लहान मुलाला घेऊन धुरपा पालांत झोंपलीं आणि जमिनीला अंग लागल्या लागल्या तिलाहि गडद झोंप लागली.

रात्र उजडत आली....फटफटीत झालें. निवांत झोंप खाऊन उठून बसलेल्या खंडाची नजर आपल्या दारांतल्या जनावरांवर गेली. पण त्याला सफेत वानाचं गाढव कांहीं दिसेना. तो चटकन् जागचा उठला. पुढंच गेला. पाहातो तों दावें तोडून गाढव पसार झाल्याचें दिसलें आणि त्याबरोबर त्याच्या काळजांत धस्स झालें, 'दारांतलं जनावर कुठं गेलं?' या काळजीनें तो तसाच उघडा बोडका हालला. मागें पुढें बाजार-पटांगणांत नजर फिरवली पण गाढव कांहीं दिसेना. तसाच तो घाईघाईत चावडीच्या मागच्या अंगणांत गेला. मारुतीच्या देवळामागे पाहिलें. पण गाढवाचा सुगावा लागेना. तेव्हां त्याच्या छातींत धडधड सुरू झाली. तो तसाच पुढें गांवच्या वेशीच्या तोंडाला निघाला व चालतां चालतां धोतराच्या निऱ्या फेडून उघड्या अंगावर घेतल्या तो वेशीच्या तोंडांतून बाहेर पडला व गांवदरीच्या वाटेनें लांब नजर सोडली. पण गाढव काय दृष्टीस पडेना. पुढें फुटलेल्या वाटेनें लांब खालच्या अंगाला मांगोड्याकडे वळाला. तेथून पुढें पांदीला लांब नजर टाकली, तरीहि काय

गाढवाचा ठावठिकाणा लागेना. तेव्हां खंडाचा जीव खालींवर होऊं लागला. तो तसाच तरातरा पुढें चालत डगरीवरून ओढ्यांत उतरला. खालच्या अंगाला पाण्याजवळ हिरव्या दरडावरहि तें दिसेना. मग मात्र त्याच्या अंगाला घाम सुटला आणि मनांत नाहीं त्या विचारानें कालवा केला, मग तो झपाट्यानें पुन्हां गांवांत शिरला. सुताराच्या मेटाजवळ गोठ्यांतील चिपाडावर बघितलें. लोहाराच्या दारांत पाहिलें, पण गाढव जसजसं डोळ्याला दिसेना तसतशी खंडा बेलदाराची छाती अधिकच धडधडूं लागली आणि त्याच्या पायांत कापरं शिरलं.

सूर्य उगवला. चांगलें ऊन पडलें. खंडानें तेथूनच माघारीं पाय वळवले. त्याला वाटलें, दिवस उन्हाळ्याचं ! चिपाड खाऊन जनावर पाण्यावांचून कावल असंल, तवाच ते दावं तोडून गेलं. आतां तें ओढ्याच्या पान्यावरनं पालाकडं फिरकलं असंल, म्हणून तो झपाट्यानें तसाच पालाकडे परत फिरला.

पण पालाजवळ येऊन पहातो तों तीनच गाढवं. चौथें गाढव खरंच बेपत्ता झालं. मग खंडाला अधिकच हादरा बसला. पालाजवळ येतां येतां पुन्हां बाजार--पटांगणांत नजर टाकली. त्याला कांहींच दिसेना. तो पालाजवळ आला. अंगांत दंडकी घातली. डोईला कसेंबसें मुंडासें गुंडाळलें आणि पाय मोडल्यागत तो मटकन खालीं बसला. गप्प गप्प होऊन, गुडघ्यांत मान घालून चिंतागती होऊन बसला.

तोंवर त्याच्या बायकोनें रागाच्या इसाळानें पितें पोर तोडलें अन् त्याला दणकन् बाजूला टाकून ओरडली.

“ आव ! गप्प कां बसलाय ! आपलं मोठं पांढरं गाढाव कुठाय ? ” असं मोठ्यांदा बोलून पुढं ताड्ताड बडबडली.

“ तुमाला दिवस उगवायच्या आंत ओढा दिसतो. दारांतलं जनावर बघायला नकु, का पोराकडे बघायला नकु ! उठ कीं वड्याला पळ ! ”

नवऱ्याला ती फडाफडा बोलली. तो आपला खालीं मान घालून गप्पच होता. पुन्हां ती दारांत चिपाड फोडणाऱ्या गाढवाकडं बघून बोलली.

" बया ! एकाएकी एवढं मोठं गाढाव कुठं गेलं ! आणि पुन्हा तोंडाला मिठी मारून बसलेल्या दादल्याकडे बघून कडाडली,

" आव ऽऽ ! कुनाला बोलती मी ! दारांतलं जनावर सुटून गेलं. तेची हाय काय काळजी ! "

वड्यानं आला;तसं बिनघोरी बसलाय ! काय जीवाला जरासी तरी काळजी !

धुरपा बोलली ती सरळ बोलली. खंडाची रोजची संवय. फटफटीत झाल्यावर उठावयाचं, अंगांत दंडकी न घालतांच धोतराच्या चार निऱ्या अंगावर घेऊन ओढ्याला पळायाचं ! आणि मग तसंच ओढ्यावरून चूळ भरून यायचं. पण गाढव गेल्याच्या घोरांत बसलेला खंडा बायकोच्या रिकाम्या बोलण्याच्या सपाट्यानें कावला व वर मान करून चिडक्या आवाजांत बोलला.

" उटसूट काय इचार न करतां गाढवाला बोलल्यागत बोलतीय ! जरा तरी जीवाला इचार करून बोल ! "

आणि मग खंडूच्या उलट्या बोलण्यानें धुरपाचा आवाज खालीं आला व ती पुन्हां हलक्या आवाजांत बोलली.

" आव ऽऽ ! दारांतलं गाढाव एकाएकीं कुटं गेलं म्हनूनशान् मी मगाधरणी वरडतीया ! तवा गांवांत, वड्याला, चार जागी हिंडून बगायचं सोडून बिनघोरी बसलाय !

या बायकोच्या बोलण्यानें खंडा पुन्हां अधिकच भडकला व आवाज चढवून म्हणाला,

" अग हें मानसाला का सांगावं लागतं ! जेची तेला कळतं कीं. येरवाळीच उठल्या उठल्या बघतो, तर दारांत एक गाढाव दिसेना ! तवा तसाच उघडा-बोडका हाललों. चारी वाटा धुंडाळल्या. रोजच्या चार जागा बघितल्या. पण गाढाव कुठं नजरं पडना, तवां तेच्याच घोरांत बसलुया मी ! तुजं मात्र उगच तोंड सुटलया !

नवऱ्याचं बोलणं ऐकून धुरपा शांत झाली व पुन्हां सरळपणानें म्हणाली,

" मला का माहीत तुमी गाढवापाय हिंडलाय् ! " आणि ती पुन्हां काळजीच्या सुरांत बोलली.

" आतावं ऽ ! मग एवढं मोठं जनावर कुठं जावं ! तें कुत्रं का कोंबडं हाय ! मोठच्या मोठं जनावर !

आणि मग तीहि मटकन् डोकं खालीं धरून बसली व दूचित झाली.

दिवस बराच वर आला. कोंवळं ऊन निबार झालं. रोजची कामाची वेळ झाली. पण धुरपानें चूल पेटवली नाहीं. भाकरी टाकल्या नाहींत. 'दारातलं जनावर कुठं जावं ?' याच काळजींत ती बसली. खंडानें चूळ भरली नाहीं. अन् न्याहारीचा तुकडा खाल्ला नाहीं. तोहि तसाच गुडघ्यांत मान घालून बसला. ऊन वर आलें तरी डालग्यांतली कोंबडी बाहेर सोडावयाचं कुणाला ध्यान राहिलं नाहीं. डाल-पाटीखालीं डाललेली करडं तशींच ओरडत होतीं. करडाच्या वडीनें शेळी ओरडत होती. लहान पोरें भाकरीसाटीं आईजवळ येत होतीं. पण ती त्यांच्या अंगावर खेकसत होती. असा सगळा घंगराघोळ झाला होता. दिवस वर कासराभर आला तरी बेलदाराच्या पालापुढें सगळे व्यवहार बंद होते. आणि बेलदार नवरा-बायको 'मोला-महागाचं जनावर कुठं जावं ? कुणी न्यावं ? याच काळजींत बसले होते.

दामा चौगुल्या न्याहारी करून मळ्याकडे निघाला होता. आजहि तो वाकडी वाट करून तंबाकूसाटीं बेलदाराच्या पालाकडे चार पावलं वळला आणि तंबाकू मागावयाला तोंड उघडणार तोंच त्याला चेहरा टाकून गप्पगार बसलेला खंडा दिसला. पालापुढें सगळेच थंडगार त्याला दिसलं. बेलदाराचं घर-दार आज गप्प कां ? म्हणून तो मनालाच बोलला, 'बेलदार का गप्प ! का काय अंगावर बिलामत आली ! म्हणून तो खंडाला मोठ्यांदा बोलला,

" लेका ! आज बेलदार का गप्प झालाय् ?"

त्यावर कुणीच काय बोललं नाहीं. खंडानें आपली गुडघ्यांतली मान काढली. एक उसासा टाकून पुन्हां चौंड्यावर बसला. पायाला हाताची मिठी मारून दारांतल्या गाढवाकडं टका-मका बघूं लागला. त्याला पाहून चौगुल्या गप्प झाला व पुन्हां विचारांत पडला आणि मनालाच म्हणाला.

'बायली ! बेलदार नवरा-बायकु गप्प ! हेच्या घरांत काय कुणी जायबंदी झालं कीं काय ?'

तोंवर चटाक-पटाक, चटाक-पटाक असा जोड्याचा आवाज आला व दामू चौगुल्यानें बाजूला बघितलें. तो आप्पा शेंडग्या बेलदाराच्या पालावर नीट आला आणि बेलदाराचें सगळें पाल त्याला सुतकांत पडल्यागत दिसलें आणि आप्पा शेंडग्या व दामा चौगुल्या एकमेकाच्या तोंडाकडें बघू लागले. त्यांत गांवचा पंच नाना देसाई पालावर सरळ आला व गांवच्या गड्यांना म्हणाला.

" बेलदाराकडं कां येणं केलं ? "

" आलुय कामापायं पण गडी गप्प का तेंच कळंना ! " असे आप्पा शेंडगे बोलला. त्यावर नाना देसाई आपोआप बोलला.

" शाळेचं दगड खाणीवरनं ओढून आणायचे हायतं तें काम बेलदाराला एकवट ठरवून दिलयं ! तवा आज कामाला जुपी करतुया कां न्हाय ते बघायला आलुंय ! पण हितं सगळाच थंड मामला ! काय झालंय ते इचारा तरी तेला. गप्प का उभा राहिलाय् ! "

" म्यां इचारलं पण गडी काय बोलंना ! " चौगुल्या म्हणाला.

तेवढ्यांत कामाचे बिन-कामाचे माणसानमाणूस बेलदाराच्या पालावर जमले. माणसाचा पालाजवळ घोळका का ? या वासानें आणखीन् कांहीं फालतूक माणसांची त्यांत भर पडली. पालावर माणसांचा घोळका जमला आणि त्यांत कुणाला कुणाचें कांहीं कळेना. जो तो उगीचच एकमेकांच्या तोंडाकडे बघूं लागला. मानेनें खूणवून ओटानें डिवचून काय झालं ? म्हणून चौकशी करूं लागला. त्यांत कुणीतर आवाज चढवून बोललें ' अरं नेटानं कुणीतरी त्या बेलदाराला इचारा कीं ! ' त्यासरशीं शेंडगे आप्पानें जोरानें विचारलें.

" लेका ! गप्प कारं ? आमाला कळूं दे कीं तुमी असं गप्प का ? "

आप्पा शेंडग्याच्या कडक बोलाबरोबर खंडा बेलदारानें मान वर केली. नुसतेच ओठ हालवून हलक्या आवाजांत म्हणाला,

" माझं गाढावच कुठं बेपत्ता झालं ? या उत्तरानें आप्पा शेंडग्याला आश्चर्य वाटलें व त्यावर तो पुन्हां म्हणाला,

" लेकांनों, गाढावंच गेलं ना! मग असं माणूस गेल्यागत घरा-दाराचा खोळांबा कसा करून बसलाय्! "

यावर जमलेल्या घोळक्यांत बेलदाराचें गाढव रात्रीं सुटून कुठें तरी गेलं. तें अजून सांपडत नाहीं हें सर्वांना कळलें आणि त्यावर 'हा तिच्या आयला. एवढ्या पाय ही गर्दी व्हय!' असे कुणी सहज म्हटलें व आपल्या कामाच्या वाटेला लागले, कुणी तेथून पाय काढता घेत होते आणि बेलदाराच्या पालावर गर्दी कां, म्हणून कुणी कुणी वाट सोडून पुन्हां पालावर येत होते. गर्दींत पुढें होऊन टांचा उचलून पालापुढें काय चाललंय हें बघत होतें.

दिवस लांब वर आला. अंगाला ऊन लागूं लागलें. पाटीखालीं डाललेलीं करडं ओरडूं लागलीं. त्यांचा आवाज ऐकून शेळी ओरडूं लागली. पालावरची गर्दी बघून डालग्यांतील कोंबड्यांचा सारखा कोऽऽकोकोऽऽकोऽ असा आवाज होऊं लागला. गर्दी बघून बेलदारांच्या कुत्र्यांनीं भुंकून भुंकून कालवा केला. माणसें त्यांच्या भुंकण्यानें कावलीं व त्यांच्यावर वदाबद दगड टाकूं लागलीं. त्यावर मध्येंच कुणीतरी बोललें,

" लेकाच्या या बेलदाराचं गाढाव गेलं म्हणून दारांतलीं कोंबडी, करडं कोंडून मारतुया की काय! "

आणि या बोलानें बेलदाराची बायको ध्यानावर आली. मांडीवरचें पोरगें तिनें खाली ठेवलें. थोडें बाजूला जाऊन पाटीखालीं डाललेलीं कोकरं मोकळीं केलीं. तशीं तीं तणावं देत, लेंड्या टाकून ओरडत, टणाटणा उड्या मारत आपल्या आईजवळ गेलीं. निवांतपणें कांसेला चिटूं लागलीं, ढुश्या मारू लागली. तोंडाला फेंस येईतों मचामचा आवाज करीत दूध पिऊं लागलीं.

कोंबड्याच्या डालग्याचं चरीनं बांधलेलें दार तिनें मोकळें केलें आणि त्याबरोबर पंख आंखडलेल्या कोंबड्या फडाडत पटांगणांत पळाल्या. सगळा कालवा बघून पुन्हां त्या अधिक जोरांत कोऽ कोऽऽ असा माना तनावून आवाज करूं लागल्या. दमादमानें पाय टाकून गर्दीला बुजून जाऊं लागल्या.

धुरपानें हे पाळलेले पक्षी व बारीक जनावरं सोडलीं व त्याबरोबर दारांतल्या पांढऱ्या सफेत, धूडच्या धूड सुटून गेलेल्या गाढवाची सय झाली. आणि दाटलेला हुंदका जोरांत येऊन ती रडूं लागली. तिच्या डोळ्याला अश्रूंची धार

लागली. तिला बघून बाजूला असलेलीं लहान पोरं कोंबड्याच्या पिलागत तिला बिलगलीं.

बेलदाराच्या बायकोचा गहिंवर बघून नाना देसाई मनांत कळवळला व हलकेंच बोलला,

" गरीब काम करून पोट भरतंय अन् तेच्याच मागं काय बी लागतंय !

मग त्यावर खंडाला गाढवाबद्दल कुणी काय विचारलें ! आणि हें काय ! तें काय ! असें दहाजणानं दहा तोंडांनीं विचारून विचारून त्याचा बुदबुदा पाडला व त्याला कावून सोडलें. त्यावर मूळ मुद्यावर येऊन आप्पा शेंडगे मध्येंच बोलला,

" लेका ! हा बेलदार गप्प झालाय ! गाढव गेलं म्हणून का धंदा बंद करतुंया ! हायती तीन गाढवं, त्यावर काम चालतं करावं ! " त्यावर लागलीच देसाई नाना बोलला,

खरं हाय तर काय ! गेलेलं गाढव आपुआप माघारी येईल तेचा का घोर करून उपाशी मरतोय काय ! " असें बोलून पुन्हां देसाई नाना खंडाला म्हणाला,

" ये बेलदारा ! माजं ऐक ! " असें म्हटल्याबरोबर खंडानें मान वर केली आणि त्याबरोबर त्याच्या गालफाडावर वाढलेल्या दाढीनं त्याचा काळवंडलेला चेहरा आधिक काळाठिक्कर पडलेला दिसला. त्याचे बारीक डोळे अधिकच्च खोल गेल्याचे दिसलें. त्याचा पडलेला चेहरा बघून कुणींतरी म्हटले, या लेकानं चांगलंच जिवारी लावून घेतलयं कीं !,

खंडानें देसाई नानाकडे आपली मिचमिचती बारीक नजर लावली व त्यावर नाना म्हणाले,

" हे बघ बेलदारा, इवीतवी तूं शाळेचं काम पतकरलयचं ! एक गाढव गेलं तरी बाकी तीन हायती ! त्यांत तुमी नवराबायको हाय ! तुमी आपलं दगड आणून टाकायला आज जुपी करा ! कामाचा खोळंबा नकु ! "

खंडानं देसाई नानाचा बोल ऐकला आणि त्याला कांहींच उत्तर न देतांना तोंडाला कुलूप लागल्यागत तो गप्प झाला व गुडघ्यावर मान टेकवून भूईकडं

टकटका बघूं लागला. त्यावर लागलीच आप्पा शेंडग्या बोलला, " ये बाबा तुज तूं शाळेचं काम करच ! पण आजच्या दिसाभरात तेवढी माती आणून टाक ! तीन गाढवं हायेत तेन चटकन् तें आवरंल ! "

ते ऐकून तर पुन्हां बेलदारानं गुडघ्यांत मान घातली व तो एकदम दगडा-सारखा गप्प झाला.

देसाई नानानें पुन्हां पुन्हां कामाचा तगादा लावला आणि आप्पा शेंडगे माती टाकण्याबद्दल पुन्हां पुन्हां बोलला. पण बेलदार आपला गप्पच होता. तो हुं का चूं करीत नव्हता. तें सगळं पाहून व ऐकून दामा चौगुल्याचं मन राहीना. तेव्हां तो बेलदाराच्या मनांतलं बोलला.

" देसाई नाना ! माजं ऐकतां कां ? "

" बोल तरी तूं ! "

" तेचं असं हाय बगा ! तुमी काय आतां कुणीच बेलदारभंवतीं वर्दळीवर येऊं नका ! तो आपल्या शाळेचं दगड आणून टाकीलच. त्याबद्दल बिनघोरी असा. पण तो पडला जातीनं बेलदार ! त्यांत तेचं आज गाढव कुठं गेलं. त्याचा जीव खालींवर होत असंल ! तेच्याबी मनाचा इचार करा ! "

" अरं त्यांत काय झालं ! गाढव गेलं म्हनून का काम पाडायचं ? "

" नाना ! आतां मीं पुढचं बोलूं का ! आपल्या सारख्यासनी तसं वाटतं हें खरं ! पण बेलदाराच्या जातीला गाढव गेल्याचं दुःख पोटचं पोरगं मेल्या-परास जास्त हाय ! तवा आज पालावर सुतकांतली कळा आली हें समजं-न कां ? "

आपल्याच मनांतील गोष्ट दामा चौगुल्या बोलला म्हणून खंडाला बरं वाटलें व गुडघ्यांतून मान वर करून तो म्हणाला, " मालक ! माझ्या दारां-तनं गाढव गेलं नसून माणूसच गेलंय ! आज काय मला कुणी कामाचं बोलूं नका ! तुमचं सगळं काम मी येऊन करून टाकीन ! तुमी बिनघोरी असा ! "

दामा चौगुल्याच्या बोलण्यांत खंडाच्या बोलण्याची भर पडली आणि मग देसाई नाना व आप्पा शेंडगे गप्प बसले आणि आपल्या घराकडे मुकाट्यानं निघाले. त्याबरोबर बेलदाराच्या पालावरून एक एक माणूस हाललें. आणि दामा चौगुल्याहि मळ्याच्या वाटेला लागला.

दुपार झाली, सूर्य माथ्यावरून ढळला. तरी बेलदाराच्या पालावर सगळे गपचिप होते. धुरपा पालांत पोराला पोटाशीं घेऊन पडली होती, खंडा झाडाच्या मुळीला उसं देऊन टका टका वर बघत पडला होता. बाकी गाढवं तशीच दावणीला बांधून पडली होतीं. शेळीं भकाळपोटी उभी होती. सगळेच गप्पगार होते. दिवस खालीं उतरूं लागला आणि झाडाच्या सांवल्या खालीं सरकूं लागल्या.

तेवढ्यांत वरच्या अंगाच्या फार्दीतून आवाज आला. मोठ्या मोठ्यांदा आवाज आला, "गाढाव धरा! गाढाव धरा!" आणि गाढव पुढें धांवत होतें. एक मळेकरी त्याच्यामागें काठी घेऊन धांवत होता. काठी फेकून मारत होता. गाढव नेटांत उधळत होतें. तुटलेला कासरा तसा गळ्यांत घेऊन बाजार-पटांगणाच्या वाटेनें पळत होतें. त्यानें सगळा धुराळा उडत होता. त्याच्या पाठीमागें मळेकरी जीव तोडून सुटला होता. तोंडानें मोठ्यानें ओरडत होता, 'गाढव धरा! गाढव धरा!'

स्वप्नांत घडल्यासारखे झालें आणि आवाजाच्या दिशेनें मान उचलून खंडानें सहज बघितलें. तो पुन्हा पुन्हां आवाज कानावर धडकला आणि पालाच्या दिशेनें आपलेंच पांढरें गाढव पळत सुटलंय हें पाहून खंडा चटकन् उठला व गाढवाच्या आडवा धांवला. पुढेंच गेला. गाढवाला बघून त्याच्या जिवांत जीव आला. त्यांचें काळीज मोठें झालें, त्या कालव्यानं धुरपा उठली, तीहि वाटेला लागली. त्याबरोबर बेलदाराचीं इतर पोरेंहि बापाच्यामागें पळालीं. आणि खंडा गाढवाच्या आडवा उभा राहिला व आपल्या धन्याला बघून गाढव फुरफुरत उभें राहिलें. तोंवर मळेकरी ओरडत ओरडत गाढव-जवळ येऊन टेकला आणि रागाच्या झटक्यांत दोन्ही हातानें नेटानें काठीची धोपटी गाढवाच्या पायावर घातली. पुन्हां पाठीपोटावर घांव घातले. त्याबरोबर खंडा मध्यें पडून कळवळून विनवूं लागला.

"मालक! मला चार रट्टे द्या! पण मुक्या जनावराला मारूं नका!" एवढ्या बार माझ्या पदरांत चुकी घाला!"

"थु तुझ्या आयला! बेलदार झालास म्हणून काय आमच्या पिकांत गाढव सोडून बिनघोरी बसायला तूं कोण!" मी हेला कोंडवाड्यांत घालीन तवाच माजा जीव थंड पडंल!"

त्यावर खंडा मळेकराच्या हातापायां पडायला लागला. गयावयां करून त्रिनवूं लागला. पण मळेकरी कांहीं ऐकेना. तो गाढवाला धरून कोंडवाड्याच्या वाटेनें दरादरा ओढूं लागला. खंडा त्याला सारखा हात पसरून आडवा होऊं लागला. तोंवर खंडाची बायको मुलाला कडेवर घेऊन तेथें आली. तीहि मळेकऱ्याच्या पाया पडूं लागली. लहान मुलें त्याच्या पायावर ठेवूं लागलीं व विनवूं लागलीं,

" मालक ! एवढं बार माफी करा. मुकं जनावर हाय तें. त्या पाय आमाला काय सजा द्या ! "

पण मळेकरी रागांतच होता. तो तसाच पुढें ओढत होता. ' मागं हाटा ' असें म्हणत होता. शेवटी खंडानें मळेकऱ्याचे पाय धरले व तो जीव तोडून बोलला,

" मालक ! झाली चूक आमच्या पदरांत घाला अन् तुमची काय नुकसानी झाली ते भरून द्या ! "

" लेकाच्यांनों ! माझी एवढी मका खाल्ली ! आतां बैलाम्होरं काय हातपाय मोडून घालूं ? नुसकानीचं तुमी बोलताय् ! "

त्यावर पुन्हां हात जोडून खंडा म्हणाला,

" मालक, मी जातीनं बेलदार हाय ! काय बी तुमचं काम सांगा तें मी पदरची भाकरी खाऊन वठवून देतों ! पण गरीबाचं गाढाव तेवढं सोडा ! "

त्यावर मळेकरी खालीं आला त्याला आशा सुटली. आणि बेलदार म्हणतुयाच तर तालीच दगड तरी हेच्याकडून टाकून घ्यावं, असा मनांत विचार येऊन तो बोलला,

" सांगिल तें काम केलंच तर गाढव सोडीन बग ! "

तेवढ्यांत खंडा बोलला,

" काय बी काम सांगा ! ते अगोदर करतों. तुमी बगा तर !

" बगा तर ! व्हय म्हणशील अन् रातीच चिंगीरा देशील ! "

" तसं कसं ! सालोसाल मी गावी येतु ! या गाढवापाय जीव गहाण टेवीन अन् तुमचं काम करीन ! "

मळेकऱ्याला खंडाच्या बोलाचा खरेपणा पटला. गाढव सोडून दिलें. धुरपा तेच्या पुन्हां पाया पडली. आणि तें बेलदाराचें सगळें घरदार गाढवाला घेऊन आनंदानें पालावर आले.

धुरपानें पाणी आणलें. चूल पेटविली. स्वैपाकाला बसली. तोंवर खंडानें बाकीची गाढवं व शेळी पाण्यावर सोडली व त्यांच्यामागें गेला. पोरं हारकून टम् झाली आणि पांढऱ्या गाढवांवर हौसेनें बसून ओढ्यावर गेलीं.

दुसरा दिवस उजाडला. सकाळपासूनच खंडानें मळेकऱ्याच्या तालीचे दगड ओढावयाचें काम सुरु केलें. तो चार तिथें आठ आठ दगड गाढवावर लादूं लागला. झपाट्यानें काम आवरूं लागला. एक दिवस गेला. दुसऱ्या दिवशीं कामाला येरवाळीच जुपी केली.

पण पांढरं गाढव मागच्या पायानें एकदम लंगू लागलें दगडाच्या ओझ्यानें व लंगत्या पायानें, त्याला जमीन चालवेना. एकाएकी चांगलें गाढव का लंगू लागलें ? म्हणून खंडानें गाढवाचा पाय नीट बघितला. सुजलेला पाय बघून त्याला एकदम धसकाच बसला. त्यांत गाढवानें नजर टाकली होती. त्याचा चेहरा आवकल्यासारखा दिसत होता. गाढवाला काय झालें ? म्हणून खंडा चिंतेंत पडला होता. पुन्हां पुन्हां त्यानं गाढवाचा पाय दाबून पाहिला आणि त्याला त्यांत काय घावेंना. पुन्हां गाढवावर दगड लादले. पण गाढव काय जागचं हलेना. वेडीवाकडी मान करून मरगळ्या खाऊं लागले. त्यावर खंडा त्याच्या अंगावर फोकाचे रट्टे मारूं लागला त्यासरशी गाढव चार पावलें मोठ्या जिकीरीनें पुढं गेलें व चालता चालतां एकदम खालीं कोसळलें आणि त्यानें खंडाच्या काळजाला धक्काच बसला व मनांत तो बोलला,

" बायली या मळेकऱ्याच्या मारानं गाढव पायांत अधू तर न्हाय ना झालं.

म्हणून त्यानें पुन्हां नीट गाढवाचा पाय बघितला. चाचपून पुन्हां पुन्हां पाहिला आणि पाय हाडांतच अधू झाल्याचं त्याला कळलें. आणि त्याबरोबर त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटला. त्याच्या मनांत काळजीनें घर केलें. आतां काय करावें असा त्याच्यापुढें प्रश्न पडला व दिवसाबरोबर तो पालावर आला.

खंडा पुन्हां लागलीच रानांत गेला. वारुळाची माती आणली. गाढवाची लीद आणली. निरगुंडीचा पाला आणला आणि सगळं एकत्रित करून पायावर बांधलें व त्यावर कामट्या चांगल्या बांधल्या. एक दिवस गेला आणि गाढवाचा पाय अधिकच सुजला तसा बेलदाराचा जीव अधिकच खालीवर होऊ लागला...

एक दिवस गेला. मळेकऱ्यानें बेलदाराची वाट पाहिली. पण बेलदार कामाकडे फिरकलाच नाहीं. तेव्हां मळेकरीच रागारागानं दुसऱ्या दिवशीं सकाळीं पालावर आला.

खंडा पुढें पाहून गाढवाचा पाय नीट बांधत होता. तो आपले भरलेले डोळे पुसत होता. धुरपा गाढवाच्या कंड्याला धरून गोंजारीत होती आणि आवकून गेलेलें गाढव बघून तिच्या डोळ्याला आंसवाची धार लागली होती.

मळेकऱ्यानें तें उभ्याउभ्याच पाहिले आणि त्याचा उसळलेला राग थंड आला. गाढवाचा पाय सुजला होता. मोठा झाला होता. त्यावर कामट्या बांधल्या होत्या. हें त्यानें नीट न्याहाळलें आणि त्याच्या मनांत दाट शंका आली व सहजच आपल्या मनाला बोलला.

" बायली ! माज्या काठीचा तडाखा तरी गाढवाच्या जिव्हारी लागला बिगला न्हाय ना ? "

त्याच्या मनांत या शंकेनें जोर केला आणि उगाउगी बेलदाराच्या गाढवाची बिलामत अंगावर येईल या भीतीनें तो मुकाट्याच पालावरून लगबगीनें हालला व बेलदार उगं हांक मारील म्हणून पुढें तोंड करून झपाट्यानें निघाला....

बेलदाराच्या गाढवानें चारा सोडला. पाणी सोडलें. त्याबरोबर खंडाची भाकरी सुटली. धुरपाची भाकरी सुटली. खंडाच्या डोळ्यांपुढें अंधारी आली. धुरपा गप्पगप झाली. रात्र झाली. अंधार दाटून आला आणि त्यांत सगळे बुडून गेले.

बेलदार नवराबायकोनें उभी रात्र बसून काढली. तांबडें फुटलें. डोळ्याला धुंदुक धुंदुक दिसू लागलें. रात्रींच खंडाचा विचार पक्का झाला. 'गाढवाचा

'पाय नीट बांधावा. त्याला सरळ करावं !' या आशेनें येरवाळीच दिवस उगवायच्या आंत खंडाचें पाल उठलें आणि गांव सोडून पुढच्या वाटेला लागलें.

शाळेच्या कामाकडे बघत बघतच त्यानें ओव्याची डबर उतरली आणि दमादमानें लंगडत लंगडत निघालेलें गाढव पुढें वाळूत रुतलें व एकदम कोसळलें. त्याला बघून खंडाची आशा पार गेली. पुन्हां त्याची नजर शाळेकडे गेली .... आणि डोळे झाकलेल्या गाढवाला बघून त्यानें आपली मान एकदम गुडघ्यांत घातली....

वाचनालय

# कैकाडी

दामा कैकाड्याचीं पालं नेमकी सुगी गाठून गाडेगांवला उतरलीं होतीं. गांवच्या खालच्या अंगाला मरिआईच्या देवळाच्या पटांगणांत पडलीं होतीं. अंगणांतील चिंच, लिंबाच्या झाडाचीं सांवली त्यांना मिळाली होती. झाडाच्या बुडख्यांतले ओटे, कट्टे दामाच्या बायका पोरांनीं नीट सारवले होते. केल्या वस्तीला जिवंतपणा आणला होता....

गाडेगांवला चांगला जिवंत पाण्याचा ओढा आहे. पावसाळ्या-हिंवाळ्या ओढयाला वहाती धार आहे. उन्हाळ्यांत पाण्याची धार आटली तरी जागजागीं सांठलेलें पाणी तग धरून रहातें. वाळूंत पाडलेल्या झऱ्याला हातोहात पाणी लागतें व झरा पाण्यानें डबडबतो. पाणस्थळ ओढयामुळें गांवाला चांगली झाडी मातली होती. करंज्याची दाट झाडी होती. ओढया-काठच्या दरडाच्या कडेनें मातलेले निरगुडीचे तुरेदार ताटवे होते. लिंबू घाणेरीच्या झुडपांनीं सगळा ओढाकांठ गारीगार दिसत होता.

—असा हा ओढयाकांटचा हिरवागार थाट-माट बघून जातिवंत दामा कैकाड्याचें मन पाघळत होतें. झाडाझुडपाचं रसरशीत, लांबार फोका बघून पोटाच्या उद्योगाच्या आशेनें गांवाला तो उतरत होता. रानांत हिरवा चारा खाऊन जनावर जोगावतें व निवांतपणें घरची वाट धरतें, तसेंच दामा कैकाडी या गांवीं मनासारखी सुगी करून आपल्या लेकरा-बाळांची पाटी घेऊन पुढच्या गांवीं जात होता.

गाडेगावानें दामा कैकाड्याला सालोसाल आश्रय दिलेला आहे. त्यानेंहि सुगीच्या हंगामांत गांवाला, गांवाखालच्या मळ्यावस्तीला फोंकांचा माल

तयार करून पुरविला आहे. सा-सूनांच्या, घर-मालकिणीच्या मनांत भरणारे कांतीव टोपलें, दुरडया विणून दिल्या आहेत. मळ्यांत, खळ्यावर जड-कामांत, आपटी-झपटींत टिकणाऱ्या पाट्या, डालपाट्या, चिवट-फोंकांच्या वळून दिल्या आहेत. खळ्यावर मळलेल्या धान्याच्या राशीच्या राशी सुरक्षित ठेवण्यासाठीं करंजाच्या निबार पण लवचिक फोंकांच्या लहानमोठ्या कणगी, कणगुली तयार करून दिलीं आहेत. त्यापायीं मळेकऱ्यांनीं, खळेकऱ्यांनीं दामा कैकाडयाला सुपानें पोटभर धान्य पदरांत वाढलें आहे. त्यावर दामाचें बिऱ्हाड सालभर जगलें आहे.

आतां दामा कैकाडयाचा संसार वाढला होता. मुलें कर्तुकीला आलीं होतीं. पालापुढें दारांत चार कोंबडया माती उकरीत, कणदाणा टिपत हिंडत होतीं. चांगल्या दोन लेकुरवाळ्या शेळ्या दारांत होत्या. पांढरी काळीकुळ-कुळीत बाळसेदार करडं टणाटण उडया मारीत होतीं. चिंचेच्या मुळीला चांगली खिलारी आवलादाची गाई, कालवड बांधलेली दिसत होती. चांगल्या बेन्याचं उंच लांब देखणं शिकारी कुत्रं पालापुढें बसलं होतं, आल्यागेल्या परक्या माणसाला टंवकारून बघत होतं, घशांतल्या घशांत गुरगुरत होतं.

पालांत मातीच्या गाडग्या–मडक्यांत आतां चार तांब्या–पितळेच्या भांड्यांची भर पडली होती. पोटाला रोज भाकरी मिळाल्यानें ते बिनघोरी राहत होते. आला दिवस सुखानें काढत होते.

...दामा कैकाडी दुपार करून ओढ्याच्या झाडींतून पालावर आला. दारांत फोंकांचा जडशील भारा टाकला. कोंडलेला दम सोडून, तोंडानें हाऽऽ हुशऽऽऽऽ केलें. उभ्या उभ्याच कंबरेचा कोयता खालीं टाकला. धोतराच्या पदरानें तोंडावरचे, पाठी–पोटावरचे घामाचे ओघळ पुसले आणि चिंचेच्या झाडाखालीं सारवलेल्या ओट्यावर गार सांवलींत विसावला. पटक्याच्या सोग्यानें वारा घेत घेत दारांत टाकलेल्या करंज, निरगुडी, टणटणीच्या फोंकांचे भारे टक लावून बघूं लागला, रसरशीत ओल्या, लांबार व लवचिक फोंका बघून दामाचें मन आशेनें फुललें व नकळत त्याच्या तोंडावर हास्य उमटलें...

तेवढयांत दामाच्या मागोमाग फोंकांचा भारा घेऊन मल्या आला. आणि भारा खालीं टाकून तोहि सांवलीला बसला...

मल्या दामा कैकाड्याचा थोरला ल्योक....टचटवीत आंब्याच्या बांडा-सारखा वाढला होता. त्याचे दंड–पिंड बापासारखेच मोठाड हाडाचे. रंग एकदम काळ्या कोळीसर रानपांखरासारखा. असा हा ऐन उमरींत आलेला गडी, एकट्या माणसानें आडरानांत बघितल्यावर माणसाच्या मनांत धसकाच भरत होता. अशी मल्याची सगळी काया होती.

झाडाच्या सांवलीला विसांवा घेत बसलेल्या आपल्या लेकाला बघून त्याच्या आईच्या मनांत पुन्हां विचार घोळूं लागला...

पोरगा गडी झाला. डोळ्यांत भरूं लागला. मल्याला आतां बायको बघावी. त्याला भाजून काढावा....त्याच्यावर तांदूळ टाकावेत. त्याला नीट दावणीला बांधावा. आणि डोळ्यांदेखत त्याचा संसार बघावा. पण आपल्या दाल्ल्याला ही गोष्ट कशी बोलावी, याचीच वाट ती बघत होती...

दिवस खालीं कलला. सांवल्या लांबल्या. उन्हाचा ताव कमी झाला. आणि लिंबाच्या झाडाखालीं बसून दामा आपल्या कामाला लागला....तो पाट्या वळीत होता. त्याची कारभारीन पुढें बघून कारी कोयत्यानें फोंकाला मधोमध चिरण्या घालीत होती. लवचिक फोंकांचे बारीक बारीक पदर काढून दामापुढें टाकीत होती. पुन्हां फोंकांचें फनगाडे तासत होती. त्या कोयत्यानें मधोमध चिरत होती.

पाणी दावायला मल्यानें गुरं-शेरडं सोडलीं. तो ओढयाच्या वाटेला लागला आणि त्याला बघून दामाच्या बायकोच्या मनांत पुन्हां तोच विचार आला...घोळूं लागला....तिला वाटलें आतांच नवऱ्याला मनातला बोल बोलावा; त्याचा काय तो विचार घ्यावा. म्हणून फोंका तासतां तासतां तिनें हातातला कोयता खालीं ठेवला; व तोंडावरच्या लोंबत्या झिंज्या मागें सारल्या. डोईवर सरळ पदर घेतला; व दाल्ल्याकडे बघून बोलली,

"जरा ऐकतां का! माज्या मनांतला विचार बोलूं का?" आपल्या बायकोच्या मनांत एकाएकी काय विचार आला. म्हणून पुढें बघून पाटी विणतां विणतां दामा बोलला,

" अग ! कामाच्या वर्डीत कसला विचार तुज्या मनांत आला ? " खालीं टाकलेला कोयता पुन्हां हातांत घेऊन फोंका चिरतां चिरतां ती बोलली,

" आवं ! दुसरा तिसरा कसला इचार न्हाय , "

" अग ! मग बोल कीं घडवडा, काय ते कलुंदी ! "

"आपला थोरला पोरगा आतां गडी झाला ! "

" झाला ! मग !! "

" मग पुढचं काय तुमाला सांगावं लागतं. जन-लोक करतं तेच मी म्हणतें.... तेला लवकर उजवून टाकूं या ! आपल्या डोळ्यादेखत तेचा परपंच बघु या ! "

बायकोचा बोल ऐकला व दामा पाटी वळतां वळतां. खिनभर थांबला. त्याला वाटलें, आपल्याच मनांतले विचार बायकोनें बोलून दावले. म्हणून त्याला बरें वाटलें व त्यावर तो लागलीच बोलला,

" माज्या मनांतलं तू बोललीच. लय दिस माज्या मनांत तेच घोळत होतं. पण आता सुगी आली. त्यांत कामाची धाई. सालाची चंदी पोटाला मिळायची. अशा घाईटींत हे बोलावं कसं म्हणूनशान मी आपली जीभ आखडून होती ! "

दामानें तिचें म्हणणें ऐकलें; व दोघांचे विचार जुळले म्हणून तिला बरें वाटलें. आतां पुढं कांहीहि करतां येईल, असें मनांत आणून ती पुन्हां बोलली,

" मी तुमच्या बाहेर न्हाय. येवढी सुगी करूं, सावकाश सवडीनं वैशाखात तिथ धरूं ! "

पोराच्या लग्नाचा विचार चालला. आणि दामानेंहि आपलें तोंड मोकळें सोडलें व पुढचा प्रश्न बायकोपुढें टाकला.

" तू म्हणतीच ते खरं ! पण पोराला नीट पोरगी बघितली पायजे ! का न्हाय ! "

त्यावर लागलीच तिनें उत्तर दिलें :

" आवं ! माझ्या लेकाला बघून मस्त पोरी मागं लागून येत्याल ! तुमी कशाला तेची काळजी धरतां ! "

" अग ! तसल्या पोरीसनी काय करती ! "

" मला का ते कळत न्हाय ! माझ्या लेकाला चांगली बायको बघीन नीट घर संभाळणारी. भाकरी–टुकड्याला चांगलं बघणारी. "

" तेच्यातलं मला काय कळत न्हाय ! तुजं तू बघ, पन ध्यान धरून बघ !"

तेची तुमी काळजी करूं नका. माज्या पै–पाहुन्यात मस्त मनासारख्या न्हात्याधुत्या पोरी हायत्या. त्या मी बघीन ! "

नवरा बायकोचा एक विचार झाला. आणि मल्याचा लग्नाचा बेत पक्का झाला....

सुगी आली....

कामाच्या घायटींत हां हां म्हणतां निघून गेली....रानं उघडीं पडलीं. खळीं मोकळीं झालीं. दामाच्या दारांत मळ्या-वस्तीवरची सुगी आली. त्यांत मुलाच्या लग्नाच्या ओढीनें आणखीन चार सलगीचे मळे, वस्त्या उकलून आणल्या. पुढें पुरें पडेल एवढें धान्य जमा केलें.

मोकळ्या वेळांत दामा व त्याच्या बायकोनें पाहुण्यांच्या चार गांवीं हेलपाटे टाकले....शेवटीं चांगली उपवर मुलगी पटली. तिला कुंकू लावलं. नवें लुगडें नेसविलें. मुलीच्या मामानें मुलीचें दान केलें. बापाच्या हातांत सव्वादोन रुपये ठेवले. सोयरीक पक्की ठरली. आणि वैशाखांत लग्नाच्या तिथी धरल्या.

चैत्र मागें पडला....आणि वैशाखानें तोंड दाखवलें. धरलेली तिथं पंधरा दिवसांवर आली. दामाच्या पालावर एकच घाई झाली. सगळे आपापलें वाटून काम करूं लागले. मल्या चांगला धडधाकट, चालायला नेटाक म्हणून पै-पाहुण्यांना; ' तांदूळ ' पोहोंचतें करावयाचें काम करूं लागला. लांब पल्ल्याच्या सग्या-सोयऱ्यांना तांदूळ-सुपारी पोहचती करूं लागला. तो जवळचीं गांवें करूं लागला. लांबच्या टप्प्यांतल्या गांवीं जाऊं लागला. पाहुण्यांच्या हातीं तांदूळ देऊन दिवस बुडालाच तर त्यांच्याच घरीं रात्र काढून दुसऱ्या दिवशीं आपल्या दारीं येऊं लागला.....

वस्तवडे गांव. गाडेगांवापासून बारा कोसावर. त्या गांवचे कैकाडी दामाचे जवळचे पै-पाहुणे. मल्यानें एवढा मोठा लांबचा टिपिरा मारला आणि

त्यांच्या घरीं तांदूळ पोहोंचते केले. रातच्या रात पाहुण्याघरीं मुक्काम केला. त्यांचा गोडधड पाहुणचार खाल्ला आणि आतां तांदूळ देण्याचे शेवटचे सोयरे झाले म्हणून मल्या निष्काळजी झाला.

सगळा कामाचा भार कमी झाला म्हणून मल्या मोकळेपणानें घरीं निघाला....ती ऐन दुपार होती. उनाचा रट झाला होता. माणूस सावलीला विश्रांतीसाठीं बसलें होतें. रानपाखरं झाडांत गप्प होतीं. पण मधूनच झाडांतून कावळ्याचा काव ऽ ऽ का ऽ ऽ आवाज कानांवर पडत होता. भक्ष्य धुंडाळण्यासाठीं उंच-आगराळीं घार तरळत, तरंगत होती. नजरेला कांहीं भिडल्यावर मुटका होऊन गोळीसारखी ती खालीं येत होती. झडपेचा झपाटा मारीत होती...

असल्या उन्हाच्या झटक्यांत मल्या बस्तवडे गांव सोडून निघाला होता. डोक्यावर धोतराची घडी टाकली होती. आणि पुढें बघून घरची वाट धरली होती. लांब लांब ढेंगा टाकीत तो झपाट्यानें चालला होता.

बस्तावडे गांव मागें पडलें. रेवणगांव जवळ आलें. गांवचा ओढा ओलांडला आणि थेट सडक धरून चालण्याचा झपाटा मारला. गांवच्या मावळतीला असलेलें पोलीसगेट ओलांडून जरा पुढें निघाला. तोंडावर आडवें ऊन आलें म्हणून धोतराच्या घडीचा पदर तोंडांवर पुढेंच ओढून चालला. तेवढ्यांत मल्याच्या जडशीळ वहाणाच्या नालाच्या आवाजानें गेटांतले पोलीस जागावले आणि सडकेवर झपाझपा चाललेल्या मल्याला बघून पोलीस हवालदाराला काय वाटलें...काय मनांत आलें....आणि त्यानें एकदम आवाज देऊन मल्याला हांटकलें, थांबविलें. कुणाचा आवाज आला....कुणीं हांक मारली म्हणून मल्या चालतां चालतां गप्पकन थांबला. व मागें मान वळवून बघितलें तोंच पुन्हां हवालदारानें वर हात केलेला बघून, तो माघारीं फिरला. वांकडी वाट करून पाऊल वाटेनें सरळ गेटावर गेला. पोलीस हवालदार बघून त्यांना ‘ रामराम ’ घातला. त्याबरोबर हवाल्दारानें मल्याला पायाच्या नखापासून ते डोक्याच्या केंसापर्यंत न्याहाळला. त्याचें रंग, रूप व पेहराव बघून हवालदाराच्या मनांत संशयाचा कालवा झाला. आणि मनांतली शंका दुर करण्यासाठीं त्यानें सहज मल्याला विचारलें,

" कोण रं तूं ? "

हवालदारानें विचारल्या, विचारल्या मल्यानें डोईवरचें धोतर खांद्यावर टाकलें. व पुन्हा नमस्कार करून बोलला,

" मी कैकाडी ! "

' कैकाडी ' हा शब्द ऐकल्या ऐकल्या हवालदार उभ्या जागींच जरा दचकला, हालला आणि आपल्या मनांतल्या कयास बरोबर ठरला म्हणून मनांतल्या मनांत स्वतःलाच ' भले बहाद्दर ' म्हणून शाबासकी घेतली.

' कैकाडी ' हें नांव कांनावर पडल्या पडल्या गेटांत जवळच बसलेला एक पोलीस झटकन उभा राहिला व मल्याला उभा-आडवा निरखून बघूं लागला. हवालदारानेंहि मल्याला पुन्हां पुन्हां खालीं वर बघितलें व मनांत म्हटले, ' बायली ! हेच्या रंगारूपावरून अन् पेहरावावरून, ही अस्सल कैकाड्याची अवलाद दिसतीया ! ' आणि हवालदाराच्या पुढें प्रश्न पडला, ' ही अवलाद कुठं गेली हुती ? अन् एवढ्या दुपारा एकटाच कुठं निघाला ? ' असा मनांत विचार येऊन त्याची खात्री करून घ्यावी, म्हणून जरा आवाज चढवून हवालदारानें पुसलें,

" का रं ! कोण गांवचा तूं कैकाडी ? " मल्यानें सहज उत्तर दिलें,

" लांब, गाडेगांवचा ! "

मल्याच्या गांवचें नांव ऐकून, हवालदाराच्या मनांत शंकांनीं अधिकच दाटी केली आणि एवढ्या लांबचं हें ' बेनं ' गांव सोडून इकडं कुठं ? म्हणून एकदम पुसलें,

" का रं ! तूं इकडं कुठं गेला हुतास ? "

" पाव्हण्याच्या गांवाला. "

" आरं, गांवाला नांव हाय का न्हाय ! "

" हाय कीं, बस्तावडं ! "

' बस्तावडं ' हें गांवाचें नांव हवालदाराच्या पुढें येतांच हवालदार मनांत चमकला—चरकला.... ! आणि आपली शंका खरीं ठरत चालली म्हणून मल्याला तावडींत धरण्यासाठीं पुढचा प्रश्न विचारला,

" लेका ! बस्तावड्यांत कोण कैकाडी तुजा पावणा रं ? "

" धोंडीबा अन् पांडूबा. "

' धोंड्या आणि पांड्या ' कैकाड्यांचीं नांव ऐकल्या ऐकल्या हवालदाराला धसकाच बसल्यागत झालें....

....बस्तावड्याचे कैकाडी, धोंड्या व पांड्या, भाऊभाऊ. अट्टल दरवडेखोर, फरारी आणि त्यांत काळाढोण मोठाच्या मोठा मल्या भर दुपारचा गेटापुढें त्यामुळें हवालदार चांगलाच मनांत घाबरला. त्याला दरदरून घाम सुटला व त्याच्या मनांत आठवणींचा कालवा झाला....

बस्तावड्याचे मूळ कैकाडी जिगरबाज, जबरदस्त, त्यांत धोंड्या-पांड्याचा त्या उभ्या पटक्यांत भलतांच दबदबा होता. ते चिठ्ठी पाठवून दरवडा घालणार आणि फरारी होणार, मग रान-वन धरणार. मळ्यावस्तीवाले त्यांना भीतीनें भाकरी पुरवणार. गांवोगांवच्या टग्यांचा त्यांना आश्रय मिळणार. दोघे भाऊ-भाऊ खाऊन पिऊन गांवच्या धुळीगत मस्त माजलेले असा त्यांचा लोकांत बोलबाला होता....ही धोंड्या-पांड्यांची जोडी उभी भिंत चढतात. तशी वेळ आली तर ढाण्या वाघागत किरणें टाकीत पसार होतात. पुढें पळत सुटले तर उडत्या पांखरावाणीं हां हां म्हणतां नजरेच्या बाहेर जातात...

या भागांत डाके पडूं लागले. मोठे मोठे गुन्हे घडूं लागले. धोंड्या-पांड्याला पकडण्यासाठीं सगळ्या जिल्ह्यांतील पोलीस पार्टी या भागांत उतरली होती. त्यांचा घाटांत सुगावा लागला. पोलिसांचा त्यांना वेढा पडला. त्यांची व पोलिसांची झटापट झाली. त्यांत पांड्या पोलिसांच्या गोळींत घावला. पळतां पळतां रानडुकरागत मोठ्या ओघळींत घायाळ होऊन पडला....

पोलिसांच्या तसल्याहि कड्यांतून धोंड्या पसार झाला. हरणासारख्या उड्या हाणत रानजनावरागत कुठें झाडाच्या ऐचणींत गडप झाला. त्याचा अजून पोलिसांना ठावठिकाणा लागेना....

असले हे दणकेबाज, दगडकाळजाचे कैकाडी हवालदाराच्या नजरेपुढें उभे राहिले. आणि त्याचे पाय न कळत लटपटले. त्यांत मल्याला बघून वाटलें

कीं, ' त्यांतला तर हा गडी नाहीं ना ?' म्हणून मनांत धीर धरून, जोर करून मल्याला विचारलें,

" कशाला रं धोंडयापांडयाच्या घरीं आला हुतास ? " जें हुतें तें सरळ मल्यानें सांगितलें,

" लग्नाचे तांदूळ दियाला ! "

आतां मात्र मल्याचें उत्तर ऐकून हवालदाराची शंका पक्की झाली आणि त्याला वाटलें, 'ही ऐती शिकार आपल्या जाळ्यांत पडली. ' हवालदाराला गुन्हेगाराची ' फसवी भाषा ' चांगली अवगत होती.

' तांदूळ द्यावयास निघालों ! ' असा गुन्हेगार बोलला कीं, तो दरवडा घालण्याचें निमंत्रण साथीदारांना देण्यासाठीं निघाला, असा अनुभवाने हवालदाराचा अर्थ तयार होता. ' सोयरीक बघायला निघालोंय ' असें उत्तर आलें कीं, दरवडा घालण्याचा वाडामाडी बघून ठेवावयास निघाला, असाहि त्यांतून अर्थाचा धागा बऱ्याच वेळां घावला होता.

—त्यामुळें ' हा कैकाडी ऐन दुपारीं बस्तावडयांत तांदूळ देऊन परत फिरला ' या बोलांतील अर्थानें हवालदाराची पूर्ण खात्री झाली कीं, ' कैकाडयांचा दरवडयांचा बेत ठरलेला दिसतो. ' त्याचा आयताच सुगावा लागला. मनांतील या पक्क्या विचारानें बाकीच्या पोलिसांना हवालदारानें खुणवलें आणि त्याबरोबर त्यांनीं मल्याभोंवतीं उभा गराडा टाकला व त्याला पुढेंच गेटांत घेऊन हवालदार म्हणाला,

" का रं पाहुण्यांना तांदूळ दिलं हें पटलं, पण लग्नाच्या तिथि कवाच्या टरल्यात ? "

आपल्याला हवालदार गेटाबाहेर असं विचारीत होता त्याचें मल्याला कांहीं वाटलें नाहीं, पण आतां गेटांत का आपल्याला आणलें याचा त्याला चांगलाच धक्का बसला....आणि तो आपल्या मनाशीं बोलला, ' बायली, यांत काय पोलिसी कावा तर न्हाय ! ' म्हणून गप्प झाला.

मल्याला गप्प झाल्याचें पाहून हवालदारानें पुन्हां पुसलें,

" काय रं कवाच्या तिथि धरल्यात ? आमाला कळूं दे ! " त्यांत आडपडदा ठेवावयाचें कांहींच कारण नव्हतें, म्हणून मल्या सरळ बोलला,

" वैशाखी बारसीला ! "

हवालदाराला पाहिजे तें उत्तर मिळालें. आणि तो खद्खद् मोठ्यांदां हांसला. आपल्याला मोठ्या गुन्ह्याचा शोध लागला याचा मोठा आनंद त्याला झाला व पुन्हां डोळे वटारून मोठा आवाज चढवून बोलला,

" काय रं कैकाडया ! वैशाखी द्वादशीला दरवडा घालण्यासाठीं बस्तावडयाच्या कैकाडयांना तूं आमंत्रण देण्यासाठीं आलास का नाहीं ! तें खरें बोल ! नाहींतर तुझ्या हाडाचें पीठ करूं ! समजलास ! "

आणि लागलीच हवालदाराच्या या बोलाचा इशारा घेऊन बाकीच्या पोलिसांनीं मल्यावर झडप घातली, त्याच्या दंडाला काडण्या बांधल्या, हातांत बेडया घातल्या.

मग काय विचारतां ! मल्याची गाळण उडाली. ' न करतां न धरतां हें काय आपल्या कपाळाला आलं ! ' म्हणून त्याच्या पोटांत भीतीचा गोळा उठला. त्याची बोबडी वळली आणि हात जोडून म्हणाला,

" न्हाय ! न्हाय ! हवालदारसाब ! मी खरंच सांगतुं. माझ्या लग्नाचं तांदूळ दियाला आलूं हुतू. माझ्या आईच्या रक्ताशिपत सांगतों."

मल्याच्या बोलानें हवालदार अधिकच भडकला, आणि बोलला,

" आरं मला का तुमची बोली कळत न्हाय ! तू साध्या बोलानं वठणीवर येणार नाहींस. तुला आमचा इंगा दावतू तवां कळंल ! "

आपल्यावर हें उगाउगी संकट आलं या विचारानें घायाळ होऊन हवालदाराचे पाय धरून मल्या कळवळून म्हणाला,

" सरकार ! मी सांगतो त्यांत काडीभर लबाडी न्हाय ! माज्या घरीं जावून त्याचा खरेपत्ता बघा ! "

" तुझं एकदम पटलं ! धरल्या तिथीलाच तुज्या गांवीं लग्नाला येऊं हं ! काळजी करूं नकोस ! "

त्यावर मल्या पुन्हां विनवूं लागला,

" मालक ! गरिबाला सोडा ! माजं आय—बा लय वाट बघत्याल ! "

"तें आमाला कळलं !" असा हवालदार बोलला.

मल्या सारखा कळवळून बोलत होता. हवालदाराचे पाय सारखे धरत होता. 'मला सोडा !' असें सारखा विनवत होता. त्याचा कांहींच परिणाम हवालदारावर होत नव्हता. उलट मल्याला माराची भीति बसत होती. सारखी धमकी मिळत होती. हवालदार पुन्हां बारीक–सारीक प्रश्न विचारून मल्याची चौकशी करीत होता.

मल्याला वाटलें, 'आता आपलं पांच खडं भिजलं ! आपण आलं कशाला, अन् झालं काय ?' त्याचा धीर खचला. अंगाला घाम सुटला....

सडकेनें सर्व्हिस मोटार आली आणि त्यांत मल्याला घालून हवालदार पोलीस पार्टीसह तालुक्याला रवाना झाले.

मल्या पोलिसांच्या कचाट्यांत घावला होता. त्याची रोज चौकशी होत होती. खरं तेंच तो पुन्हां पुन्हां सांगत होता. पोलिसांनीं त्याला तपासाच्या सर्व मार्गांतून बाहेर काढला होता....पण –– तो आहे तेंच खरें सांगत होता...

दिवसानं दिवस चालला होता...मल्या कच्च्या तुरंगांत एक एक दिवस मोजत होता. लग्नाच्या तिथीचा दिवस उद्यांवर आला. त्या रात्रीं त्याच्या मनांत कालवाकालव झाली...लग्नाला पै-पाहुणे येणार. सगे-सोयरे जमणार, पण नवऱ्या मुलाचाच पत्या नाहीं, म्हणून आय–बा काळजींत पडणार ! या जाणीवेनें त्याच्या विचाराला अधिकच गति मिळाली. तो अस्वस्थ झाला. लग्नाचा दिवस उजाडला....

मल्याच्या मनांत अधिकच कालवाकालव झाली. सूर्य उगवून वर आला. हळदी लागण्याची वेळ झाली. मल्याच्या पुढें नवरी उभी राहिली. करंजाच्या डाहाळ्यानीं सजवलेला मांडव त्याच्या डोळ्यापुढें आला. मांडवांत घोंगडें टाकून, पान खात बसलेले पै-पाहुणे, सगे-सोयरे त्याला दिसूं लागले. लग्न घाईंत ...चाललेली त्याच्या आईबापांची धांवपळ त्याच्या पुढें उभी राहिली.... त्याचें मन सुंद झालें. "पण मला इथं आडकवून पाडलं. देवा कायरे परसंग आणलास........" असें कळवळून शब्द त्याच्या तोंडांतून बाहेर पडले.

—आणि मल्याचा जीव तुटूं लागला.......त्याच्या जिवाची घालमेल अधिकच उडाली. एकदम जागचा उठला आणि मोठ्या चेवानें तुरुंगाच्या गजाला हातानें घट्ट मिठी मारली आणि गज वैतागानें, चिडीनें गदागदा हालवूं लागला आणि ओरडला, "हावलदार आज माझ्या लग्नाच्या तिथि.... आणि त्याच्या पोटांतून जोराचा उमाळा आला. आणि पुन्हां 'हावलदार....' असें मोठ्यानें ओरडून तुरुंगाच्या गजाला पुन्हां पुन्हां धडका मारूं लागला...आणि त्याच्या डोळ्यांतून अश्रुच्या धारा ओघळूं लागल्या....

# डोंबारी

वैशाख महिना. ऐन उन्हाळ्याचा भर. रानें शेकाटतात. झाडें-झुडपें रखरख उन्हांत तळतात. तीं सुकून अंग टाकल्यागत दिसतात. उघड्या माळरानांत उन्हाच्या झळ्या मारतात. त्याचवेळीं पांढरीच्या माळावर दोन-तीन पालं मृगजळांत डुबल्यागत दिसतात; तर कधीं तीं तरंगल्यागत वाटतात. वैशाखी पुनीव गाठूनच पांढरीच्या माळावर पालं उतरतात. सालोसाल येतात. तीं चिमा डोंबाऱ्याची असतात.

पांढरीच्या माळाच्या खालच्या लवणांत मळा आहे. मळ्यांत विहिरीचें चांगलें पागरथळ आहे. बारा-मास विहिरीला मोटा चालतात. अशा पाण्याचा आधार पाहून चिमाचीं पालं या माळावर उतरतात.

माझ्या गांवीं वैशाखी पुनवेला उरूस भरतो. तो गाठूनच चिमा डोंबारी गांवीं येतो. चिमा आठ-दहा दिवस माझ्या गांवीं राहाणार. गांव, वाड्या, मळे येथें डोंबाऱ्यांचा खेळ करणार! सुगीचें धान्य उकळणार! चांगली मिळकत घावली कीं आणखी चार दिवस राहाणार! दाण्याची ठीकी, वैरणीचे भारे गोळा करणार. वैशाखीचा उरूस करूनच पालें उठवणार. मग तो गांवो-गांव मुक्काम करीत बरोबर नाथाच्या जत्रेला खरसुंडी गांवाला उतरणार.

वाडवडलांपासून चिमा आमच्या सगळ्या महालांत डोंबाऱ्यांचा खेळ करतो. वतनी हक्कानें गांवें उकळतो. सुगी-सराई, जत्रा उरूस चिमाच्या मिळकतीचे दिवस. मग पावसाळा सुरू झाला कीं, रानपाखरागत कुठं तरी लांब जाणार. गडप होणार.

वैशाखी-उरुसाला चिमा कधीं चुकला नाहीं. मला कळतें आहे तेव्हां-पासून मी चिमाचा खेळ गांवच्या देवळापूढें बघतों. चिमा आमच्या सगळ्या

कारभारी गड्यांना ओळखतो. तुका, पांडू, येताळा, धोंडी अशीं पटपट त्यांचीं नांवें घेतो.

चिमा डोंबाऱ्याचें ढोलकें देवळापुढें वाजलें तर पांडा कारभारी बोलणार,

" अरं लेका हो ! पुनवेचा उरूस आला वाटतं ! चिमा डोंबारी आला नव्हं का ! "

आमचे गांवकरी चिमाचा खेळ आवडीनें बघणार ! त्याचे पाठीवर भलेबहाद्दर म्हणून थाप मारणार ! त्याला शाबासकी देणार ! गांव त्याला सालाचा मानाचा मंदिल बांधणार ! मंदिल बांधून चिमा सगळ्यांना मोठ्या अदबीनें राम राम करणार ! कारभाऱ्यांच्या पायाला हात लावणार व आशीर्वाद घेणार !

चिमा डोंबाऱ्याचा खेळ पाहून कारभारी गडी चिमाला चार गोष्टी सांगणार, " ये गड्या चिमा ! तूं खेळ कर ! पण तुझ्या लेकराचा व बायकोचा खेळ दावून, त्यांची आबदा करूं नकू ! अशानें त्यास्नी जायबंदी करून टाकशील ! "

कारभाऱ्याचा बोल ऐकून चिमा पुढें येईल, पोटावर हात मारून बोलेल,

कारभारी पाटील ! हे पोट हाय ! या पोटासाठीं उड्या मारतों ! "

चिमा पोटच्या पोराच्या घड्या करणार, त्याला खालींवर फेकणार. तसेंच त्याची बायको पुरुष-दीड पुरुष उंचावर बांधलेल्या तारेवर—दोरावर चालणार ! वर झोके घेणार ! हे खेळ पाहून गावकऱ्यांचें मन खालीवर होतें. ! " बायली ! हे पॉर आन् बाय मोडून टाकतोय का हा डोंबारी ! " अशा शंकांनीं हेलकावतें. म्हणून कारभारी गडी चिमाला बोलतात. चिमाहि पोटावर हात हाणून दाखवी ! ' हें पोटासाठीं करतोंय ! '

शिवारांतलीं पिकं निघालीं. खळ्यांत धान्याची मळणी बडवणी झाली. खळ्यांतलें धान्य घरांत आलें. कडबा—वैरणीच्या गंजी रचल्या. सुगी संपली. गांवकरी सुगींतून पार पडले. घरा—दारांत कष्टाचें फळ बघून शेतकरी समाधानी झाला. बिनघोरी झाला; म्हणून उरसाला—जत्रेला गाड्या जुंपून जावूं लागला. चावडींत देवळांत शिरवाळचं व सायंकाळचं बसून इकडच्या तिकडच्या गप्पा करू लागला. पानतंबाकू चघळत निवांत वेळ घालवू लागला.

वैशाखी पौर्णिमा पांच-सहा दिवस राहिली होती....ती वेळ सकाळची होती. सूर्य उगवून वर आला. उन्हें निबर झालीं. गांवच्या महादेवाच्या देवळापुढें डब ऽ ऽ डब ऽ ऽ ऽ डब ऽ ऽ असा ढोलक्याचा आवाज येऊं लागला. आवाज ऐकून मी देवळापुढें गेलों. देवळापुढें पिंपळाच्या झाडाखालीं पारावर मंडळीं बसली होती. कुणी देवळाच्या जोत्यावर तर कुणी पायरीवर होतें. च्मिा डोंबाऱ्याच्या हाळीनें व ढोलक्याच्या आवाजानें जागचीं कुत्रीं चाळवलीं. डोंबाच्या दिशेनें भुंकूं लागलीं. च्मिा जोरजोरानें ढोलकें वाजवीत होता. ढोलक्याच्या आवाजानें गांवांतलीं पोरं–ठोरं देवळापुढें धावलीं. माणसांची गर्दी झाली.

चिमानें आपल्या गळ्यांतलें ढोलके दुसऱ्या गड्याच्या गळ्यांत दिलें, अंगांतली पैरण काढली. दंड थोपटले. पटापट बैठकी मारल्या. पळत जाऊन पारावर व जोत्यावर बसलेल्या कारभारी मंडळीच्या पायावर मस्तक ठेवलें व म्हणाला,

" या आय–पांढरीच्या जीवावर जगतों. सालाची फेरी मारतो. तुमचा अशिर्वाद माझ्या लेकराबाळाला द्या ! "

अंगांतली पैरण काढल्यावर चिमाचें शरीर वादाटीसारखें दिसलें, अजूनहि घोटीव व भरीव वाटलें ! किरताक घातल्यानें त्याच्या मांडीचे पट उठून दिसत. हाता–पायाचे मजबूत गोळे दिसत. त्याची भरदार छाती त्याच्या ऐटदार बांध्याला शोभत होती. चिमा अजूनहि अंग राखून होता. वयानें पुढें गेलेला गडी, पण मूळचा बांधा राखून होता. अंगावर त्यानें तांबूस-पिवळसर घेरू लावला होता. त्याच्या शरीराची हालचाल तलवारीच्या पात्या-सारखी हालत होती.

चिमाचा अजून भरीव व पिळदार बांधा न्याहळून माझ्याजवळ बसलेला गडी बोलला,

" लेका ! हेला बघतुया तसा असाच हाय कीं ! अजून चांगल्याची खात्री करील ! "

गावकऱ्यांचें दर्शन घेऊन चिमा कबूतरागत उलटी किरणं घेतच मागें सरला. पुन्हां सुलटीं किरणं मारत पुढें आला व दंड ठोकूं लागला. शड्डू मारूं लागला.

चिमानें लहान मुलीला हांक मारली. तशी ती चार वर्षांची मुलगी अंतरावरून हातावर उडया मारत भिंगरी फिरल्यागत फिरत आली. चिमा मुलीला खेळवूं लागला. तिची कमान केली. तिच्या अंगाची घडी करून तिच्या पोटावर पाय देऊन चिमा उभा राहिला. हें पाहून लोक तोडांत चुकचुकले. हलकेच पांडू कारभारी बोलला,

" बायली ! हा डोंबारी पोटच्या पोराला मोडून मारतुया वाटतं ! " मुलीचा खेळ झाला. लागलीच चिमानें बायकोला हांक मारली.

चिमाची बायको गिरजा बाजूला एका कोपऱ्यांत भिंतीकडे तोंड करून बसली होती. खाली बघून लहान मुलाला मांडीवर घेऊन पाजत होती. त्याचे अंगावरून हात फिरवत होती. ती चिमाच्या पहिल्या हांकेला उठली नाहीं, पण पुन्हां ती मोठ्या जोजारानं उठली. पाण्यानें भरलेले डोळे पुसले. लहान मुलाला तिथंच लुगडयाचे पदरावर टाकलें. डोळे पुसत ती पुढें आली.

पदरावर टाकलेल्या मुलावर माझी नजर स्थिर झाली. तें दीड-दोन वर्षांचें मूल. त्याची काया वाळली होती. सुकली होती. त्याच्या डोक्याला फडकें बांधलेलें दिसलें, फडकें रक्ताळलेलें होतें. त्याची किरकिर चालली होती. तोंड-डोळे सुजले होते.

गिरजा दोन्ही टांगेवर चापून-चोपून लुगडं नेसली होती. पदर नीट आळपून घेऊन कंबरेला घट्ट खोवला होता. ती फोकेसारखी लवचिक होती. हातावर उडया घेत फिरकीसारखी फिरत आली. तिनेंहि आपल्या अंगाची कमान केली. उलट्या पालट्या उडया हाणल्या. अंगाचा मुटका केला.

शेवटीं गिरजाचें दोरावर चालण्याचें काम सुरू झालें. ती मांजरासारखी चटकन उभ्या बांबूवरून दोरावर आली. हातांत वेळूची काठी घेतली. चिमानें पुन्हां ढोलगं गळ्यांत अडकवलें व तालांत वाजवूं लागला. ढोलग्याचे तालांत गिरजा दोरावर चालूं लागली. दोराला झोके देऊं लागली. लोकांनीं टाळ्या वाजवल्या. सरसर ती दोरावर चालली. काम झालें. ती पटकन उडी टाकून खालीं आली.

गिरजाचा खेळ बघून येताळा कारभारी चिमाला म्हणाला,

" अरं चिमा ! दोरावर चालायचं जीवावरचं काम ! वाय वरनं नजर चळून निसटली तर हातापाचं हाड मोडून जायचंदी हुईल कीं ! लेकराबाळाची आय ! "

चिमा म्हणाला,

" वापा ! जल्माला आल्यापसनं आमची जात खेळ करती. ती माकडागत चिकट ! हरएक कामावर पक्की नजर वसलेली असती. ! "

चिमानं गळ्यातलें ढोलगें काढलें. सगळ्यांना हात जोडून तो म्हणाला, " मायवाप आतां लहान-मुलाचा खेळ तुमाला दावला असता, तर तुम्ही तेला शाबसकी दिली असती. पण त्या बहाद्दराचं टकूरं फुटल्यापासून ते निजून हाय ! " असें बोलून गिरजाच्या मांडीवरून मुलाला चिमाने दोन्ही हातांत घेतलें व त्याला कारभारी मंडळीच्या पायांवर ठेवले. तो बोलला.

" तुमाला माज्या माघारी हाच बहाद्दर खेळ करून दावील. तेला तुमच्या आय पांढरीचा आशिर्वाद द्या ! असल्याही भारी दुखण्यांतून हे निभल."

मुलाचे डोळे मिटलेले होते. मुलाला पाहुन माझा जीव खालीवर झाला. भावनेच्या भरांत मीं चिमाला विचारलें,

" मुलाला काय झालें ? "

चिमानें माझ्याकडे वर पाहून म्हटलें " मालक तुमाला दडवूं कशाला पण माज्या लेकराचं भारी काम बघून वैऱ्यानं घात केला. मुलाला ' मूठ ' मारली. " खेडोपाडी देवर्षीपणा करणारे, जवळ पित्र-चेटकी बाळगणारे लोक बाळसेदार मुलाला, तरण्याताठ्या बाईला, गड्याला मूठ मारतात असें मीहि ऐकलें होते." मनांत विचार आला म्हणून मीं पुन्हां चिमाला विचारलें.

" लहान मुलानं असं काय केलं, त्याला मूठ मारली ? "

" बापा ! माझं मूल चांगला खेळ करी ! तेला या लांब वेळूच्या काठीचे टोकांवर घडी करून उताणा ठेवत असे. ती काठी माझ्या हाताच्या तळातात उभी करी. असा खेळ मागच्या झरेगावांत चालला होता. कुणा वाद्याची नजर बसली. त्यानें मुठ मारली. तसं पोराचा तोल गेला, खालीं जमिनीवर

डोक्यावर आदळलं. माथ्यावर खोक पडली. एवढाच मुलगा ! पण त्याला-ही वैऱ्यानं मूठ मारून जायबंदी केलं, डाव साधला."

चिमाचं उत्तर ऐकून मी चकीत झालों! पुन्हां विचार करून मी चिमाला विचारलें,

" मुलाला मूठ मारली हें मला पटत नाहीं ! पण तुझ्या खेळानं धोका झाला ! "

" अरे बापा ! आमच्या खेळवाल्याचं तुला डाव कळाचं नाहींत ! लहान-पंचानं मी खेळतों. पण कुणी वाद्यानं मूठ मारल्याबिगार असा धोका होत नाहीं ! "

चिमाचा मूठ मारण्यावर विश्वास होता, म्हणून माझें त्याला पटेना. शेवटीं मी चिमाला बोललों, ' चार दिवस खेळ बंद कर व मुलाला चांगलं औषधपाणी कर ! "

तेवढ्यांत चिमानं पैरण घालून मला म्हटलें,

" बाबा ! रानचा झाडपाला केला ! तुझ्या आयपांढरीचा आशिर्वाद आहे ! " असं म्हणून चिमानं मुलाला मारुतीचे देवळाचे पायरीवर ठेवला. आणि मला तो पुन्हां म्हणाला,

" हे दिवस आमच्या मिळकतीचे. आतां खेळ बंद करून पुढं काय खावं. हां हां म्हणता पावसकाळ येईल ; "

खेळ झाला. पांडा कारभारी जागचा उठला व सगळ्या जमलेल्या गड्यांना व कळत्या पोरांना म्हणाला,

" अरं आतां उठा ! तेच्या पदरांत काय शेर-मापट दानं घाला. तेला आणखीन मळ्यावस्तीवर जायाचं असेल."

पांडाच्या बोलाबरोबर चिमानें सगळ्यांना हात जोडले व तो बोलला, " तुमचं लेकरूं तुमच्या दारांत आलाय ! तेच्या पोटाला पोटभर वाढा ! लोक हालले. आपापल्या घरीं गेले. कुणी मापटें ! कुणी शेर ! असे धोतराचें खोच्यांत दाणे आणले. चिमानें पायरीजवळ पसरलेल्या धोतरांत ओतले. चिमाला पोटाला घेऊन आलें माणूस परत गेलें. चिमाला मानाचा पांढरा पटका गांवकऱ्यांनीं बांधला.

मी देवळाजवळ तसाच थांबलों होतों, बारकाईनें सगळें बघत होतों.

चिमाची बायको भिंतीच्या आडोशाला लहान मुलाला पाजत होती. मुलाला हालवत होती. मूल हालत नव्हतें. डोळे उघडत नव्हते ! तिच्या डोळ्यांतून अश्रु गळत होते. ती पुन्हां पुन्हां डोळे पुसत होती. तिचा सगळा जीव मुलाभोंवतीं गुंतला होता.

चिमाच्या पदरांत तीन-चार पायली दाणे जमले होते. अजून उरलें सुरलें माणूस येत होतें. कुणीं ताज्या भाकरी-दोन भाकरी पदरांत टाकत होते. चिमा भुईवर बसून बोटानें मातींत रेघोट्या ओढत होता. चिमाला निर्मळ बघून मी चिमाजवळ पायरीवर जाऊन बसलो व चिमाला बोललों.

" चिमा ! ! असला जीव घेणारा खेळ सोडून दुसरा बांधला धंदा करावा ! "

चिमा मान वर करून मला बोलला,

" बापा ! आमचा डोंबाऱ्याचा खेळ वाडवडलाचा. सोडून कसं चालंल ! सोडला तर पोराला बायको दियाची न्हाय जात ! पोरीला नवरा मिळायचा न्हाय ! "

चिमा डोंबाऱ्याचें उत्तर ऐकून सर्दच झालो व पुन्हां मी त्याला बोललो,

" अरे बाबा ! नवं जग आलं ! नवं धंदे आलं ! आतां वाडवाडांचा सुटत चालला ! "

" तुझं पटतं ! कुणी वाड-वडलांचा धंदा सोडतं ! कुणी करतं ! मी माझ्या जातीचा पंच ! मला खेळ सोडायचा न्हाय ! जात सोडायची न्हाय ! "

मीं पुन्हां शेवटीं माझ्या मनांतली गोष्ट चिमाला विचारली,

' चिमा ! तूं तरी तुझ्या मुलामुलीला शाळेंत घाल ! त्यांना तरी शहाणं कर ! "

" बापा ! हें मला कळतं ! पण आमी आज इथं तर उद्या दुसरीकडं ! मग कसली साळा ! त्याना साळा शिकवून डोंबाऱ्याचं काम कुणी करावं ! आमाला जातींत वागायचं असतं ! "

तोंवर सूर्य लांब वर आला. अंगाला ऊन चाटूं लागलें. चिमानें दाणे पदरांत बांधले. दुसऱ्या पदरांत भाकरीची चवड बांधली. ते आपल्या डोक्या-वर घेतलें. जोडीदारांनी कुणी बांबूकाठ्या घेतल्या; कुणी ढोलगे कांखेला

अडकविलें. गिरजानें लुगड्याचे पदरांत पुढें पोटाशीं लहान मुलाला बांधले. ते पांढरीच्या माळाच्या वाटेनें, पालावर निघाले.

.... हा हा म्हणतां तीन–चार दिवस गेले. गांवचा वैशाखी पौर्णिमेचा उरूस भरला. मेवा-मिठाईचीं दुकानें आली. गांवकऱ्यानें सुपारी देऊन तमाशा आणला. उरूस चिक्कार भरला. माणसांची गर्दी उसळली. गजी-लेझ-माचे आखाडे गाजूं लागले. उरसाचा भर. पण चिमा डोंबाऱ्याचा खेळ उरसांत दिसला नाही. झाला नाहीं. सालोसाल हौसेनें उरसाला येणारा चिमा ——पण गांवांत येऊनहि त्यानें उरसांत कां खेळ केला नाहीं! हीच माझ्या मनांत पुन्हां पुन्हां शंका येऊं लागली.

...सूर्य खालीं गेला होता. सांवल्या लांबल्या होत्या. ऊन्ह उतरलें होतें. माझ्या मनांत आलें कीं, चिमा डोंबाऱ्याच्या पालावर तरी जावें! म्हणून मी सोनबा लोणाऱ्याला बरोबर घेतलें व पांढरीच्या माळावर निघालों.

पांढरीचा माळ, गांवचा ओढा ओलांडून गेला कीं लागतो. अर्ध्या मैलाचे अंतर. आम्हीं ओढ्याची वाळू तुडवून ओढा ओलांडला. शेरताटीच्या पांदीला लागलों. पांदीच्या बाहेर पडून, पाऊलवाटेनें पांढरीच्या माळावर आलों.

डोंबाऱ्याचीं पालं उठलीं होतीं. पालाचे बांबू काठ्या उपटून काढण्याचे काम चाललें होतें. सामान-सुमान गुंडाळून चऱ्यादोऱ्यांनीं बांधलें होतें. आपापले बिऱ्हाड गाई-घोड्यावर लादलें होतें. जागा सोडून ते पुढच्या वाटेनें निघाले होते.

चिमाची बायको पुन्हां पुन्हां मागें फिरून बघत होती....डोळ्याला पदर लावत होती.

डोंबाऱ्याला गाठावा म्हणून आम्ही नेटानें पाय उचलून चाललों होतों.... त्यांतच भिरभिर वारा सुटला होता. पाला-पाचोळा उडवीत...तो उधळत पुढें चालला होता.

आम्ही पुढेंच गेलों. उकरलेल्या मातीचा ढीग वाटेच्या कडेलाच मला दिसला. त्या मातींत उभा दगड रोवला होता.

तें दृश्य बघून माझ्या काळजांत चर्र ऽ ऽ र झालें....

राजे ग्रंथ संग्रहालय

# फांसेपारधी

मोठी शिकार झाली......

फांसेपारध्यांनीं काळवीट घुलवत घुलवत आणला आणि वाघरत पाडला. तसा एकदम पारध्यांच्या खोऱ्यांत मोठा आरूड झाला. त्यांचा आवाज खोऱ्यांच्या घनदाट जंगलांत घुमला.

फांसेपारध्यांत अत्यानंदाची उकळी फुटली आणि ते शिकारीच्या धुंदींत नाचूं लागले. उड्या मारूं लागले. त्यांत त्यांच्या ओरडण्याबोलण्याच्या कलकलाटाचा अधिकच कालवा झाला.

उंच टेकडावर गिधाडासारखी टप धरून बसलेले पोलीस व जंगलचा शिपाई, फांसेपारध्यांच्या कालव्याच्या वासावर मार्ग काढीत निघाले, जंगलाच्या लहानमोठ्या झाडाझुडपाच्या ऐचनींतून फांसेपारध्यांच्या आवाजावर चालले, दाटदडणीच्या झाडींतून चालतांना पाला-पाचोळ्याची खसपस होई व त्याबरोबर भुजरीं पांखरें भराभर उडून जात.

जंगलचा शिपाई व पोलीस पारध्याच्या अगदीं जवळ आले आणि त्या रानमाणसांना घाबरविण्यासाठीं त्यांनीं बंदुकीचा वांझोटा बार काढला व एकदम ते फांसेपारध्यांच्या मागे उभे राहिले. बंदुकीच्या आवाजानें बावरलेले व पोलीसांना पाहून भुजलेलीं फासेपारध्यांचीं लहान मुलें पाडसा सारखीं उड्या हाणत पळत सुटलीं तीं लांब नजरेच्या आड झालीं.

पोलिसांनीं चिऱ्या, लव्हज्या व मौज्या या फासेपारध्यांना धरलें. त्या वेळीं पारध्यांच्या कुत्र्यांनीं भुंकून सगळें रान उठवलें व पोलिसांच्या अंगावर तीं धांवूं लागलीं. त्यांचीं कोसी कालवड ठिसकारूं लागली व मारक्या नजरेनें पोलिसांना रोखूं लागली.

फांसेपारध्यांनीं पोलिसांबरोबर बरीच झटापट केली, पण पोलीस गोळी घालून, भाला मारून आपली शिकार करतील म्हणून ते नरम पडले व पोलिसांच्या पुढें निघाले.

फांसेपारध्यांना पुढें घालून ते बंदुकधारी—भालाधारी पोलीस जंगलांतून बाहेर वाट काढूं लागले. झाडाझुडपांतून, गवत-काट्यांतून ते निघाले होते. चालतां चालतां पोलीस-हवालदार चिन्याला भाल्याच्या टोंकानें टोचून दटावत होता. तरसासारखा ताटत वसकन् बोलून चिन्याला विचारीत होता.

" भडव्या ! तुझीं पालं कुठं आहेत ? " वाघावानी डोळ्याचा चिन्या गुरगुरत अडखळत्या जिभेनें सांगत होता.

" तुमाला माजीं पालं कशाला पाइजे ? "

" लेका ! पंचनामा करायचा आहे ! "

" म्यां काय सरकारचा गुन्हा केला ? "

हवालदार कायदा समजून सांगण्याचे भावेंत म्हणाला, " अरे ! सरकारनं नवा कायदा करून, जंगलांतील पशु—पक्ष्यांची शिकार बंद केली आहे.

चिन्या, वाघाच्या नजरेनें हवालदाराकडे बघून बोलला, " आमचा वाड-वडलांचा धंदा तुमीं काय म्हणून बंद करते ? मग आम्हीं जगावं कसं ? "

" लेका ! सरकारचा हा कायदा ! मग तुमी मरा किंवा जगा ! "

" कायदा तुझ्या कचेरींत ठेव ! हें पारध्याचं खोरं हाय !"

या राना-वनाचं आमी जुनं मालक ! तुजं सरकार नवं हाय. आमच्याजवळ जुनं दाखलं हायेत ! "

चिन्याच्या उलट्या बोलानें हवालदार चिडला आणि त्याबरोबर दुसऱ्या आडदांड पोलिसानें चिन्याला धक्का दिला व म्हणाला,

" तुझीं पालं या जंगलाच्या बाहेर आजच्या आज नेलीं नाहींत, तर तुला—बायापोरांना उचलून पाच वर्षं तुरुंगांत घालूं ! "

रानचें पाखरूं पिंजऱ्यांत कसें जाणार ? रानावनांत मुक्त मनानें हिंडणारा पारधी तुरुंगात कसा राहणार ? म्हणून तुरुंगाचें नांव काढतांच फांसे-पारधी गोंधळून गेले होते.

पोलीस फांसे-पारध्यांना घेऊन पालाच्या दिशेनें जंगलांतून चालले होते.

तरीहि चालतां चालतां चिऱ्याची नजर शिकारीच्या शोधांत झाडाझुडपांत घुसत होतीच. लव्हड्याची तळपत्या घारीसारखी धुंडाळती नजर आजूबाजूला शोध घेत होती. मौज्या अंगावर वाल टाकणाऱ्या आपल्या लाडक्या कुत्र्याच्या पाठीवरून हात फिरवीत होता. पोलिसांना पाहून मधून मधून बावऱ्या नजरेनें कालवड ठिसकारीत होती; पळून जाण्यासाठीं ओढ खात होती. कुत्र्यांनीं भुंकून व पोलिसांच्या अंगावर चाल करून, त्यांना बेजार केलें होतें.

पारध्याची पालं कधीं येणार म्हणून पोलीस आपल्या जिवाच्या शंका-कुशंकांनीं मनांतून गांगरून गेले होते. म्हणून हवालदार पुन्हां पुन्हां चिऱ्याला विचारी—

" तुझीं पालं कुठं आहेत ? "

पण " या कटनावर जवळ हायती ! " एवढंच त्याचं ठरीव उत्तर मिळे.

त्यांनीं ओघळी ओलांडल्या. ' हितं ! या हितं ! ' करीत फांसेपारधी पोलीसांना, दरीच्या तोंडाकडे नेऊं लागले त्यामुळें पोलिसांना अधिकच शंका येऊं लागली.

शेवटी, " हितं ! या हितं ! " करीत करीत पालाजवळ येतां येतां पोलीस दमछॅक झाले, पार थकून गेले. आतां ते पालापासून हाकेच्या अंतरावर आले. कुत्र्यांना आपल्या धन्याच्या पालाचा वास लागला अन् ती थेट पालाच्या दिशेनें पळत सुटलीं. त्यांत कालवड हिसका देऊन निसटली, ती सरळ कुत्र्याच्या मागें पालाच्या दिशेनें उधळली.

' ती बघ आमा तिघां भावांचीं पालं ! ' असें बोलून चिऱ्यानें पालांकडे हात करून पोलिसांना दाखविलें. तरीहि तीं पोलिसांना झाटा-झुडपाच्या आडून दिसेनात. पण कुत्र्यांनीं भूंकून कालवा केला होता. त्यावरून खरेंच पारध्यांचीं पालें तेथें असावींत असें वाटून पोलिसांचा जीव खालीं पडला.

कुत्र्यांना पालांचा आधार घावला आणि पुन्हा जोरजोरानें भुंकत, झेंपा घेत, धांवत तीं पोलिसांना आडवीं आलीं. पायाच्या नखांनीं माती उकरीत अंगावर तुटून पडण्याच्या तयारींत उभीं राहिलीं. पालाजवळचीं गाईवांसरें, कालवडी, भुजून कान टवकारीत ठिसकारूं लागलीं. मागें सरत सरत, उभीं

राहून शिपायाकडे बघत कान हालवूं लागली. पालावर असलेल्या बाया-पोरांचा एकच रडण्या-ओरडण्याचा आवाज उठला.

कंबरेला मळकट-मातकट तांबडा-पांढरा घडपा गुंडाळलेला, अंगांत सैल पैरणीसारखं कापड व कडेवर तान्हीं मुलें घेऊन बोलण्याचा कलकलाट करीत बाया पुढें आल्या. त्या काळ्या-चेंद्र्या होत्या. गळ्यांत हरतऱ्हेच्या रंगांच्या लहान मोठ्या, काचेच्या मण्यांच्या लडी, कानांत कथलाचे पांढरे झुबे, डोईवरच्या कोरड्या झिपऱ्या, आणि त्यांत दातवनानें काळे ठिक्कर झालेले दांत रडण्या ओरडण्यानें दिसत होते. उगाउगी आपल्या माणसांना पोलिसांनीं पकडलें, म्हणून बायाहि पोलिसांच्या अंगावर कुत्र्यासारख्या धावत आल्या. त्याचा ओरडा त्या दरीच्या तोंडाला सगळ्या जंगल काटवानांत घुमूं लागला.

सगळे पोलिस-पारधी पालाजवळ आले. चिंऱ्या पुन्हां म्हणाला,

‘ हीं बघ माझीं पालं ! ”

खरेंच पालाजवळ आलों, या गोष्टीनें पोलिसांच्या जिवांत जीव आला.

चिंऱ्या त्याच्या बोलींत बोलला, अन् उघड्या बोडक्या लंगोटीवाल्या पोऱ्यानें गवताची ओबड धोबड चटई आणून पुढें टाकली. सगळेच पोलीस त्यावर बसले....तोंवर कुत्र्यांचा कालवा, माणसांचा कलकलाट चाललाच होता.

...पालावरचा आवाज ऐकला नि वाघरू आलं कीं काय, म्हणून चिंऱ्याच्या पालापासून हांकेच्या अंतरावर असलेले सात-आठ फांसेपारधी कोयते-काठी घेऊन धांवतच आले. त्यांतले कुणी गाईवर स्वार होऊन जोरांत होते. त्यांच्यामागें उघडींनागडीं पोरें-बायकाहि धावल्या. पण ते पाहतात तों चिंऱ्याल्या पालाजवळ पोलीस ! त्यांना पाहून त्यांची गाळण उडाली, हरणागत उड्या मारीत ते पार झाडींत पसार झाले.

पोलिसांना पालांचा पंचनामा करावयाचा होता. पारध्यांनीं केलेली पारध जप्त करावयाची होती. पारध्यांच्या विरुद्ध त्यांना पुरावा जमा करावयाचा होता. हा पंचनामा करून या पारध-खोऱ्यांतून कधीं निसटूं, असें त्या पोलिसांना झालें होतें.

तेवढ्यांत मध्येंच चिंऱ्या उठला....चिंऱ्या पारधी मोठा चिकट गडी. लाव्ह्या पक्ष्यासारखा अंगानें भरलेला, पण तलवारीच्या पात्यागत हालणारा.

रान-जनावराच्या पाठीमागें कुत्र्याच्या चालीनें धांवणारा त्याच्या अंगांत अर्धी मळकट दंडकी. कंबरेला लंगोटी, डोईच्या वाळल्या झिपऱ्यावर गडद चॉकलेटी रंगाचें पागोटें. गळ्यांत रंगी-बेरंगी मण्यांच्या लडी. त्यांत त्याचे वठलेल्या झाडाच्या फाट्यागत हात-पाय, त्याचा दगडासारखा कणखर पिंड, काट्या-कुट्याच्या व झाडा-झुडपाच्या फनगड्यानें हातापायांवर उठलेले ओरखाडे, त्यानें वहिरी ससाण्यासारखीं आपली नजर आजूबाजूला फिरवली व पालांतली एक एक गोष्ट हवालदाराला सांगूं लागला. पोलिसांनीं पंचनामा लिहावयास सुरवात केली...

पारध्याचीं पालें जंगलांत कठणार होतीं. तीं पटकार, गोधड्या-जुन्या धोतर लुगड्यांची शिवून तयार केली होती. पालें उभीं होतीं, पण चोहों-बाजूंना हात हात उंच मोकळ्या जागेंतून वारा भकाभका आंत शिरत होता. पालाच्या मेढीला जागजागीं पक्षांचीं पंख बांधलेलीं होतीं. पालापुढें पंखांचें जागजागीं अंथरूण पडलें होतें.....

त्या पंखांत चित्तुराचीं पंखें होती. लांब बाळसेदार पंखें होल्याच्या शेपटाची होतीं. बारीक बारीक पिसं पिटुकल्या लाव्हा पक्षाचीं होतीं. पालाच्या मेढीला बांधलेली घारी-गिधाडाची लांब मोठी पंखें दिसत होती.

पंख बघून चित्र्याच्या तोंडाला पाणी सुटलें व मध्येंच पोलिसाला बोलला,

" हवालदारा व्हल्याचं मास सगळ्या पक्षांत चवीदार असतं बग ! तुला एकदां आणून दिन. खाऊन बग, अन् मग मला सांग ! " असें म्हणतांच पंचनामा लिहितां लिहितां पोलीस एकमेकांकडे बघून हसले. तोंवर हवालदार दुसऱ्या पालाजवळ गेला व त्यानें आंत डोकावून बघितलें....

त्या पालाच्या पुढच्या तोंडालाच मेढीला लहान पिंजरा टांगला होता. त्यांत बारीक बारीक लाव्हे पक्षी होते. आंत पालांत ससे, हरणें पकडण्याची वाघर होती. पालाच्या आंत एका कोपऱ्यांत मोठा पिंजरा होता. त्यांत कोंबडीच्या खैऱ्या तलंगेएवढीं चितुराची जोडी होती.

चित्र्याला मध्येंच काय हुकी येई. तो गळ्यांतल्या मण्यांतून चित्रा-सारखा आवाज काढूं लागला. त्याबरोबर पिंजऱ्यांतले चित्तूर पक्षीहि बावरे होऊन मान उंचावून ओरडूं लागले. त्यांची घालमेल झाली; पिंजऱ्यांत

मागेंपुढें तरातरा ते धावूं लागले. बाहेर आशाळभूत नजरेनें बघूं लागले. आणि मग चिऱ्या हवालदाराला बोलला, " बग कालवडीच्या आड दडून अशी मण्यानें शीळ घालतों अन् चित्तूर पक्षी हिकमतीनें फाशांत धरतो! हवालदार त्या पक्षाकडे वेड्यागत बघतच राहिला.

हवालदार तिसऱ्या पालापुढें गेला...पालांत मेंढीला आडकवलेलें कोल्ह्याचें हरणाचें कातडें होतें. तेथेंच व्यालेली बांडी कुत्री हवालदाराला बघून गुरगुरली. तसा तो दोन पावलें मागें सरला...हवालदारानें पालांतली मोडकी पेटी पाहिली. त्यांत गोऱ्यासाहेब व मराठेसरदार यांनीं फासेपारध्यांना दिलेले दाखले, शिफारसपत्रें होतीं. हवालदार तीं बारकाईनें वाचूं लागला....तेवढ्यांत चिऱ्याच्या बायकोनें कडेवरच्या पोराला दणकण भुईवर टाकलं व तेंहि गोटीसारखें पोरगं गप्प बसलें. आणि तिनें पुढें धावून ते कागद मोठ्या जिवाभावाचे म्हणून आपल्याजवळ घेतले.

त्यानंतर फासेपारध्यांनीं आपली नांवें सांगितलीं. भोंसले, पवार, जाधव व चव्हाण अशीं आडनांवें सांगितलीं. आडनांवें ऐकून हवालदार पारध्यांच्या तोंडाकडे आश्चर्यानें बघूं लागला व आपल्या मनाशींच बोलला, ' आपलंहि आडनांव चव्हाणच... ! '

त्यांतच हवालदारापुढें दुसराच प्रश्न आला....फासेपारधी, हरणपारधी, लंगोटी-पारधी, शिकारीपारधी, राजपारधी, भिल्लपारधी यांपैकीं आपली कोणती जातकुळी...? तो आपल्या मनाशींच हासला व बारीक नजरेनें, पारध्यांचे गडी, बाया व पोरें उगीचच तो बघूं लागला....

—शेवटीं चिऱ्या हवालदारापुढें ताठ उभा राहिला व छातीवर हात मारून बोलला,

" राजा शिकारीला निघाला तर आमी पुढं असूं! आमच्या वाडवडलांना राजदरबारीं मान होता. राजवाड्यांत पक्षी....जानवरं आमीच धरून पोहोचते केले. मग आमाला राजानं इनाम दिलं. तुमचं कायदं आतां निघालं...."

पंचनामा चालला होता. तिघां भावांची उघडीं नागडीं मुलें, बोरं-कारं चावत, भूजलेल्या पक्ष्यासारखे लांबलांबनें तरंगत होते. बाया कडेवर तान्ही मुलें घेऊन चवताळलेल्या नजरेनें बघत होत्या.

पंचनामा पुरा झाला. आणि....

बिगरपरवान्यानें पारधी सरकारच्या जंगलांतील पशु-पक्ष्यांची हत्या करतात. या करितां जिवंत प्राणी, पंख हाडें यांचा पुरावा तयार करून इतर मालहि पोलिसांनीं जप्त केला. आणि चिन्या, लाव्हया, भौज्या यांना चांगल्या सुताच्या काढणीनें बांधून ते पुढें निघाले.... तोंच बायकापोरांचा पुन्हां गोंधळ, कालवा, कलकलाट झाला. कुत्रीं भुंकूं लागलीं. गाई ठिसकारूं लागल्या.

—आणि शेवटीं चिन्या हवालदाराला म्हणाला, "हवालदार! गरिबाला विनगुन्ह्याचे कशाला पकडता! तुमाला आमी आमची शिकार देतुं! आमाला तुरुंगांत टाकूं नको! आमचीं मुलं-बाळं कुठं टाकूं? आमी रान सोडून जातों. आमाला सोड!"

सगळीं बाया-पोरें पोलिसांच्या आडवीं झालीं व हाणून घेऊन, कडेवरचीं पोरें आपटून त्यांनीं गोंधळ केला. मग पोलीस व हवालदार यांनीं आपआपसांत कानगोष्टी केल्या. आणि "आम्ही शिकार करणार नाहीं! जंगल सोडून जाऊं" असें त्यांच्याकडून लिहून घेतलें व त्यांना मोकळे केले.

पारध्यांना आनंद झाला. त्या भरांत त्यांनीं पोलिसांना चित्तूर लाव्हे, ताज्या शिकारीचा मोठा काळवीट दिला. त्यावर चिन्या हवालदाराला म्हणाला, "हवालदारा! तुला आज तोंडांतला घास काढून दिला बग!"

आणि एकदांचें निसटलों....म्हणून पोलीस आपल्या वाटेला लागले.

फासेपारध्यांनीं तुरुंगाची भीति घेतली आणि दुसऱ्याच दिवशीं सकाळीं आपलीं पालें उठवलीं. आपला पालांतला संसार गाई-कालवडीवर चढविला. लहान मुलें त्यावर बसविलीं व पारध्यांचीं बिऱ्हाडें पारधी खोरा सोडून वाटेला निघालीं. लहान पोरें पंख गोळा करीत हातांत घेऊन चाललीं. चिन्या मागें पुन्हां पुन्हां वळून पाहत होता. सगळ्या दऱ्याखोऱ्यांत, झाडा-झुडपांत जिव्हाळ्याची नजर फेंकत होता. त्याच्या पावलांतली नेहमींची चपळता जाऊन जडपणा आला होता. पालांची जागा डोळ्याआड झाली; आणि त्याच्या डोळ्यांतून अश्रु ओघळले...

चिऱ्या आपलें रान, आपलें जंगल सोडून कुठें चालला होता, त्यालाच माहीत नव्हतें. त्याच्या भावांना माहीत नव्हतें. बायका-मुलांना माहीत नव्हतें.—पण ती तुरुंगाच्या भीतीनें निघालीं होतीं खरी. ते कधीं वाटेनें कधीं आडवाटेनें चालले होते. कुत्रीं झाडा-झुडपांत शिरत होतीं. उघडीं बोडकीं पोरें दगड-धोंडे भिरकावत पक्ष्यांच्या, खारोटीच्या मागें धांवत होतीं.

दुपार झाली. दिवस माथ्यावर कलला. पारध्यांचीं बिऱ्हाडें डोंगर ओलांडून दुसऱ्या बाजूला आलीं आणि सगळा खोरा नजरेआड झाला.

माळरानांत, आडरानांत मुक्काम करीत करीत पारधी-खोरा सोडून फांसेपारधी लांब लांब, देशावर आले.

गोरेगांवचे पीक-पाणी, हिरवींगार उभ्या उंसाचीं रानेंच रानें, पिकांनीं भरलेले मळे पाहून पारध्यांचीं पालें उगवतीच्या टेकाडाच्या लवणांत उतरलीं.

गोरेगांवचा सगळा हिरवागार पाण्याखालचा शिवार. जागजागीं भरल्या घरचे मळे-वस्त्या. मोठमोठीं बागायतीं शेतेंच्या शेतें. आवतींच पारध्याचीं मुलें कुत्रीं घेऊन उंसाच्या भोंवती बांधा-बांधानें, खारोटी, पांखरांच्या मागें लागत. पिकांत काकडी सांपडली, मक्याचें कणीस सांपडलें, तर ते पळवीत आणि दिवसभर उंसाच्या गचपनांत बसून, उंस मोडून खात व दिवस काढीत.

फांसे-पारध्यांच्या बाया मळ्या-वस्तीवर मागावयाला जात. झांजड पडली कीं पदरांत ओली-वाळली मिळेल तीं भाकर-तुकडा घेऊन वस्तीला येत. कधीं वस्तीवर वाळत पडलेलें धोतर, लुगडें डोळा चुकवून उचलावयाला त्या मागेंपुढें पाहत नसत.

पारधी लांब गाई—कालवडीवर स्वार होऊन जात व रात्र करून येत; येतांना मक्याचीं कणसें, जोंधळ्याचा लुंगा खुडून आण, फडांतले ऊंस मोडून आण, असें ते करीत.

फांसे-पारधी मोकळ्या रानांतून आले व माणसांच्या पिंजऱ्यांत येऊन पडले. त्यामुळें त्यांचें मूळचें अंगावरचें तेज कमी झालें. गडी अंगानें उतरले. गोटीसारखीं पोरें वाळून गेलीं. कुत्र्यांच्या बरगडया उठून दिसूं लागल्या. गाईची ढोपरीं निघालीं. पण ते आल्या वेळेला तोंड देऊन दिवस काढीत होते.

दिवसन् दिवस गेले...

चिन्यांच्या ओळखी झाल्या. जाधवाच्या मळ्यांत पिकाची राखण करावयाची चाकरी त्याला मिळाली आणि त्याला धीर आला. रात्रंदिवस चिन्या इमानानें राखणीचें काम करीत होता. त्यांत तो उंसाच्या फडांत, जोंधळ्याचे पिकांत हिंडत ससा हेरत होता. कोल्हींखोकडीं यांवर कुत्रीं सोडत होता. ती त्यांचा तानपट्टा काढत होतीं. त्यांना पकडून धोळसत होतीं. त्यांचा आनंद चिन्याला होत होता. पालांत त्यांची सागुती आठा-पंधरादिवसांनीं शिजत होती. कधीं तरी असे चवीनें जेव्हां जेवत असत. राखण्याच्या जागीं पोरे गाई हिंडवत असे. दिवसभर कुत्रीं घेऊन पिकांत फिरत, भुकेनें हापापल्यासारखीं करीत.

–पण लाव्ह्या व मौज्याला कोणी नोकरीवर ठेवीना. मळेकरी बोलत, "हें बोलून चालून फांसे–पारधी, राखणीला ठेवले तर, कुंपणच पीक खाईल."

मग लाव्ह्या, मौज्या काय करणार। दिवसभर राना-मळ्यांत फिरणार! रात्रीं येतांना कणसें खुडून आणणार! पीक कापून आणणार! वांगीं, वाळकें तोडून आणणार. अशा भुरट्या चोऱ्या करीत.

...आणि नको तें झालें आणि जाधवाच्या घरावर रात्रीं डाका पडला. सगळ्या मळ्यावस्तीवर बोलवा झाला. पारध्यांच्या नांवानें डंका झाला.... चिन्या या गोष्टीनें बांधावर दुचित बसूं लागला.

पारध्यांच्या पालावर कडूस पडतांना पोलीस येत. पालांत दिवा का नाहीं म्हणून जबर शंका घेत....

त्यांवर चिन्या पोलिसांना सांगे.

" सरकार ! आमच्या पालांत दिवा नसतो. वाघर-फांशानं दिव्याचं तोंड बघितलं कीं शिकार होत न्हाय !"

पण चिन्याचें कोण एकतो...पोलिसांचा डोळा लाव्ह्या–मौज्यावर होता. पण ते पोलिसांला घावले नाहींत....ते पालावर दोन दिवस भीतीनें आलेच नाहींत.....

पोलीस पारध्यांच्या पालावर पुन्हां पुन्हां येऊं लागले....मौज्या, लाव्ह्याचा तपास करूं लागले.

चिऱ्या पुन्हां चिंतागती झाला. विचार करूं लागला. आतां माझ्या मौज्या, लाव्हयाला पोलीस पकडावयाला येणार ! आपल्या सगळ्यांना धरून नेणार ! तुरुंगांत पांच वर्षे बसविणार...! मग आपल्या बायका-पोरांचें कसें ?

चिऱ्या तुरुंगाला पुन्हां घाबरला ! त्यानें रातोरात पालें उठविलीं. गाईवर चढविलीं. आल्या वाटेनें परत निघाला.

ते सर्व रात्रभर चालले. दिवसभर चालले. माळावर, आडरानांत मुक्काम करीत करीत पुन्हां पारध्यांच्या खोऱ्यांत आले.

आपल्या रानाचा वास कुत्र्यांना लागला. खोऱ्याचा वारा पोरांना लागला आणि तीं धांवत पळत पारधी-दरीच्या दिशेनें चाललीं.

चिऱ्यानें पारधी-दरा डोळे भरून पाहिला. तो हारकून गेला. त्याच्या भावना हेलावल्या व त्याच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले.

पिंजऱ्यांतून पक्षी सुटावेत तसें पोरं, कुत्रीं रानोमाळ पळूं लागलीं.

—आणि कोठून तरी चित्तुराचा आवाज येऊं लागला. त्याबरोबर चिऱ्यानें आपल्या गळ्यांतील मण्यानें आवाज काढला. या आवाजानें दोन्हीं चित्तुराचे आवाज जवळजवळ दडत दडत झुडपाआड आले. आणि झुडपाच्या जवळ गाईआडून चिऱ्या पुढें आला आणि पकडावयाचा फांसा लावणार तोंच मौज्या व लाव्हयाच झुडपाच्या आडून पुढें आले.

——आणि ते तिघे बंधू दाटलेल्या अंतःकरणानें, गहिंवरलेल्या नजरेनें एकमेकांच्या गळीं पडले....

# वडार

भल्या पहाटे कोंबड्यानें बांग दिली........

आणि वडारांच्या पालांत चुली पेटल्या. दाट अंधारांत भुतांच्या दिवट्या पेटाव्यात तसें माळावर दृश्य दिसूं लागलें...

ती भरली पहाट होती. साळगाव झोपेंत रेंगाळत होतें. माणसास अजून जाग आली नव्हती. ओढ्याची टिटवी लांब कोठेतरी आवाज काढत होती. मांगवाड्यांत कुठेंतरी कुत्र्यांचा आवाज येई अन् शांततेच्या पोकळीला चाटून जाई.

...गडद अंधारांतून घाट्यांचा किण किण आवाज येत होता. त्यानें अंधाराला जाग येत होती. घाट्यांचा आवाज जवळ जवळ येऊं लागला. कुंभाराच्या आव्याजवळ पुढें आला आणि एकदम कुत्र्यांचा कालवा झाला. बुरडाच्या घरापुढील कुत्री कुईऽऽ कुईऽऽ करीत झटक्यानें मागें पळाली अन् त्याच्या मागाहून वाघाच्या डरकाळीसारखा मोठ्या कुत्र्याचा आवाज कानावर आला. त्यांतच एका गड्याचा भसाडा, खडबडीत आवाज आला अन् तो कुत्र्याला हाक मारूं लागला.

मरीआईच्या देवळासमोरील कट्ट्यावर झोपलेला दामा येसकर ह्या आवाजानें जागा झाला. झोपल्या जागीं उठून बसला, तोंडावरून हात फिरवून, डोळे चोळले आणि डोळ्यावरची झोप त्यानें घालविली. घाट्यांच्या किण किण आवाजाच्या दिशेनें अंधारांत डोळ्यांचे तीर फेकले. कान एकवटून आवाज हेरूं लागला. कट्ट्याखालीं तोंडातली थुंकी टाकली व मनाशींच तो बोलला,

" बायली, पहाट झाली वाटतं ! हणमा वडाराचा गाडा खाणीवर निघाला. "

तो पहाटेचा भर. अंधारी रात्र. शीतल शांतता. आणि मंदसा गार वारा. त्यांतच हणमा वडाराचा गाडा पुढें पुढें येत होता; घुंगर-घाटयांचा मंजुळ आवाज सगळ्या वातावरणांत संगीत निर्माण करीत होता. बैलगाडयांत बसलेल्या गडयांचे राठ, आडदांड अपरिचित बोल त्या शांततेंत घुमत होते.

घाटयांचा आवाज एकदम जवळ आला. आणि त्याबरोबर दामा येसकर बसल्या जागीं उठून उभा राहिला. उघडया अंगावर त्यानें धोतराच्या निऱ्या फेडून घेतल्या. गाडयापुढें गेला अन् म्हणाला,

" हाणमा वडार का ? " उत्तराची वाट न पाहातां तो पुढें म्हणाला, " मी दाम्या येसकर हाय्. "

दामा येसकर हें नांव हाणमाच्या कानावर पडलें. एकदम गाडा थांबला. बैलाला ओढणी लागली. आणि घुंगर-घाटयांचा ' खळाळ्कन ' दाट आवाज झाला. देवळापुढची कुत्रीं भुकूं लागलीं. आणि हाणमाच्या वाघ्या कुत्र्याच्या भसाडया आवाजानें शांत वातावरणाला हादरा बसला. तसाच कुत्र्याच्या कालव्यांत दामा येसकर त्या अंधारांत काळा हात पुढें करीत म्हणाला,

" गडया तंबाकू दे ! "

हाणमा वडारानं दामा आडवा झाल्या झालाच त्याचा हेतु ओळखला. खिशांतली चंची काढून अगोदरच तिचें तोंड सैल करून ठेवली होती.

" नीट हात कर. न्हायतर खाली सांडशील. "

पुढें हात करून तंबाकू घेण्याचा दामाचा रोजचाच सराव. त्यांत नेमकाच त्यानें हात पुढें केला आणि हातावर तंबाकू पडल्यावर त्याचा जीव खाली पडला, अन् त्यानें सहज पुसलें,

" गाडयांत दुसरा गडी कोण ? का तुजा थोरला ल्योक ? "

" हा ! यल्लापा हाय्. " हाणमानें उत्तर दिलें. पुन्हा आपले उगं कांहींतरी बोलायचें म्हणून दामा बोलला आणि विचारलें,

" धाकटी पहांट का थोरली ? "

" अर, पहिलंच पहांट हाय ! कळत न्हाय का गाव अजून झोपत हाय ! "

'न्हाय आपलं तेच इचारलं!' असें म्हणून तंबाकू हातांत चोळत दामा सरला आणि हाणमा वडाराचा गाडा गांवच्या पांदींतून पुढें खडीच्या ओढयाच्या दिशेनें चालला. पार अंधारांत बुडून गेला.

न्याहारीची वेळ टळून गेली....

'आतां पालावर वडारं कशीं काय धावणार? त्याच्याऐवजीं थेट ओढ्याला दगडी खाणीवरचं गेलेलं बरं.' असा मनाशीं बेत करून मेंडके-वाडींचा काळू चौगुल्या खडीच्या ओढ्याला दगडी खाणीवर पाऊलवाट धरून पुढें बघत निघाला.

त्यांतच सुगी झाली होती. रानांतलीं पिकें निघाली होतीं. साळगांवचा शिवार मोकळा झाला होता. मोकळ्या रानांत गांवची माळ्यावस्तीवरचीं गुरें, शेरडें हिंडत होतीं. जोंधळ्याचा पालापाचोळा उचलत होतीं. झाडा-झुडुपांत तोंड घालून चरत होतीं. गुराखी पोरें ओढ्याकांठच्या करंजाच्या दाट सांवलींत निवांतपणें सूरपारंबा खेळत होतीं.

काळू चौगुला झपाट्यानें खडीच्या ओढ्यांत आला. ओढ्याची डगर चढून वर कटनावर आला, उभा राहिला व दगडीखाणीच्या बाजूला डोळ्यावर आडवा हात धरून बारीक नजरेनें वडारांच्या कामाचा आवाज कानावर घेऊ लागला.

....तोंच एका हाकेच्या अंतरावर एकदम धडऽऽड असा आवाज झाला. त्या शांत वातावरणाच्या पोकळीला या आवाजानें भोसका पडला अन् आजूबाजूला तडे गेले.

खाणींतून निघालेल्या दगडांच्या चिळकांड्या सटक्यांत आभाळांत घुसल्या, सगळ्या गगनांत गेल्या. त्याच्या मागोमाग धुराळ्याचा लोट व धूर वर चढूं लागला.

एकाएकी धाडकन् आवाज झाला आणि काळू चौगुला उभ्या जागीं हादरला. बराच वेळ त्याच्या छातींत धड् धड् झालें. त्याच्या छातींचे ठोके स्थिर झाले व तो मनाशींच बोलला,

दगडाच्या खाणींत सुरुंग उडला!'

तो धुराच्या सुगाव्यानें पुढें आडवाटेनें निघाला. एकाएकी धाडकन् आवाजानें रानांतलीं शेरडं करडं बुजलीं, रानोमाळ पळालीं. लांब कोठेंतरी उभी राहून कान टवकारून बघूं लागलीं.

सुरुंगाचा बार झाला. आणि लांब लांब पांगलेले गडी-बाया खाणीकडे जोरांत पळत सुटले. थोड्याच वेळांत त्यांनीं एक गडी खाणींतून अच्ऱ्यांत उचलून मर आणला. खाणीवर एकदम कालवा झाला. एका बाईनें हांबरडा फोडला. रडण्या-ओरडण्याचा गोंधळ झाला.

काळु चौगुल्या नेटानें पाय उचलून खाणीवर पोहोंचला. त्या कालव्यांत घुसून घाबऱ्या घाबऱ्या पाहूं लागला...

हाणमा वडार सुरुंगाच्या धडाक्यांत सांपडला होता. तो रक्तबंबाळ झाला होता. धरणीवर गप्प पडला होता. त्याच्या कपाळाला खोक पडली होती. त्यांतून रक्त येत होतें. त्याच्या मांडींत दंडांत बारीक बारीक कपऱ्या शिरल्या-होत्या. त्यांतून रक्त ओघळत होतें. तो गपचिप पडलेला होता. त्याची बायको त्याच्या तोंडांत पाणी सोडत होती. गहिंवर घालून आपल्या डोळ्याचें पाणी पदरानें पुसत होती. थोरला मुलगा यल्लाप्पा दगडीपाला गुंड्यानें दगडावर चेचत होता. अशांतच गौरा यल्लापाकडे तोंड करून त्याच्या भाषेंत बडबडली. आणि ऐकल्या बोलाला यल्लाप्पा सपाट्यानें टेकडाखलच्या वस्ती-कडे धांवत निघाला. दुसरा गडी चटकन् उठला व वाटलेल्या पाल्याचा रस हाणमाच्या अंगावरील जखमांवर लावूं लागला.

हाणमाच्या तोंडांत पाण्याचा एक एक घोट गेला. अन् घटकाभरांतच त्याची हालचाल झाली. डोळ्याच्या पापण्या उघडल्या. भोंवतालचा कालवा बघून तो तसाच कण्हत उठून बसला, हलकेंच बोलला,

" बरच लागलय् की–? "

" बरं कसलं ! जीव गेला असता ! " गौरा डोळे पुसतच बोलली. हाणमानें आपल्या हातापायाकडे नजर टाकली. हातावरचे रक्ताचे ओघळ पुसले. त्यानें कपाळाला हात लावला. सगळा तळवा रक्तानें भरलेला बघून बोलला,

" मी कायम सुरुंग भरणारा आणि उडविणारा, पण आज फसलों. वाटलं, पेटलेली वात विझलीं, सुरुंग आता दबला. पुन्हां वात पटवावी म्हणून

जवळ गेलों. पण काय नशीब बगा, चार-पांच हातांवर असेल तोंच धडाका उडला. मग काय ? एकदम डोळेच झाकले. ”

हाणमाच्या हातपायांवरील जखमांवर पाल्याचा रस लावतां लावतां दुसरा गडी खालीं बघतच म्हणाला, ‘ एवढं कसं कळलं न्हाय तुला । ’

हाणमानें आपलें बूड जरा मागेंच घेतलें. जखमांतून वेदना झाल्या. ‘ आईऽऽगऽ ’ असे आपोआपच त्याच्या तोंडांतून शब्द बाहेर पडले आणि तो पुढें म्हणाला,

‘ त्यांत कळायचं काय ! मी जुना सुरंग्या पण आज काय झालं कळालंच न्हाय ! मग दारू कच्ची का वात कच्ची होती, का सुरुंगच चांगला ठासला न्हाय । माझ्या हातातला सुरुंग पण मी घोटाळलों खरा—’

असें सांगून तो गप्प झाला. जखमांवर साकळलेलें रक्त पुसत पुन्हां स्वतःशींच बोलला,

‘ तायआईचा आशीरवाद हुता म्हणून वांचलो. न्हायतर तुमाला कुठला दिसायला ! दगड पाडायचं काम कंधीं जीवाला घात करील तेचा नेम न्हाय ! ’

शेरडंराख्या गुरंराख्या पोरांनींहि भोंवतीं घोळका केला होता. त्यांत काळु चौगुल्या ओलावलेल्या भावनेनें सगळे टक लावून बघत होता. कान देऊन ऐकत होता. ते सगळं पाहून, ऐकून चौगुल्या मनाशींच बोलला,

‘ गडी चिवाट जनावरासारखा म्हणून जीव वांचला. न्हायतर दुसरा किरकोळ गडी सुरंगाच्या हापक्यांत पाला-पाचोळ्यासारखा उडाला असता. पण गड्याचं नशीबच जोरावर म्हणून बरं ! ’

....इतक्यांत यल्लाप्पा दाणदाण पळतच आला. उन्हातान्हांत पळत आल्यानें तो घामाधूम झाला होता. पाटीवर पैरण ओली झाली होती. जवळ आला. पैरणीच्या खिशांतून कोंबडाचें काळें पिल्लूं काढलें. गौरानें तें पिल्लूं हातांत घेऊन तोंडांतल्या तोंडांत ती कांहीं पुटपुटली. हाणमावरून ओवाळून तें ओढ्याकाठीं उतरून टाकलें आणि तिच्या मनांतली शंका फिटली. तिचा जीव थंड झाला !

झाला प्रकार पाहून चौगुल्या चितागती झाला. मन सुंद झालें. त्याच्या मनांत नाहीं ते विचार शिरले. हाणमावरून त्याची नजर फिरली व मनांत दाटलेले विचार कळवळ्यानें आपोआप बाहेर पडले,

‘ एवढा गडी जायबंद झालाय ! तेला दवाखान्यांत तरी उचला. न्हायतर भलतंच करून बसाल ! ’

चौगुल्याचा बोल गौराबाईनं हेरला व ती आतां निर्धास्त बसलेली बाई मोठ्या आत्मविश्वासानें चौगुल्याकडे वर तोंड उचलून म्हणाली,

“ येळ आली, पण गेली ! ज्याचा त्याला खाना दिला. आतां काय हेंच्या जीवाची काळजी न्हाय....! ” ओढ्याच्या काठांकडे बघून तिनें हात जोडले.

चौगुल्याच्या मनाला तिचं बोलणं पटेना; अन् पुन्हां ओढ्याकडं बघून हात जोडलेले कळेना. पण तोच मनाशीं, ‘ नको ती कशाला मनांत शंका आणा ? आपण आपलं गप्प बसलेलं बरं. आलेल्या कामाला पुन्हां चांगल्या-वेळीं यावं ’ असं मनांत ठरवून तो उठला.

हां हां म्हणतां आठ दिवस गेले, आणि काळू चौगुल्याच्या मनानं हाणमा वडाराला भेटण्याच्या विचारानें पुन्हां उचल खाल्ली. सुगी आटोपली कीं घर बांधण्याचा विचार चौगुल्याच्या डोक्यांत शिरावयाचा. पुन्हां पुढच्या कामाच्या वर्दीत मनांतल्या मनांत विरावयाचा. पण यंदाची सुगी झाली आणि त्याच्या मनांत घर बांधण्याच्या विचारानें पुन्हां उचल खाल्ली. खेरंच, या विचारानें त्याच्या मनांत जोर केला अन् पाऊसकाळाच्या आंत घर उभें करावयाचा त्याचा बेत पक्का झाला.

ह्या विचाराच्या झटक्यांतच तो छपरांतून उठला. दिवसाकडे तोंड करून पाहिलं. तो दिवस लांब खालीं कलला होता. तें पाहून त्याला वाटलें, आतां वडारं खाणीवरून पालावर आलीं असतील. आपल्याला ते निवांतपणें भेटतील. निघाव आतां.

त्यानें अंगांत पैरण घातली. पटका बांधला. खांद्यावर धोतर टाकलें व हातांत काठी घेऊन तो निघाला. झपाझपा पावलें टाकूं लागला. चालतां चालतां त्याच्या मनांत शंकेची पाल कुचकुचली, रक्तबंबाळ झालेला हाणमा त्याच्या डोळ्यांपुढें उभा राहिला आणि त्याला वाटलें, ‘ गडी बरा झाला, का न्हाय कुणास ठावं ? का उगीचच हेलपाटा पडायचा ? ’

चौगुल्या चालतां चालतां मध्येंच घोटाळला. पण चांगल्या कामाला निघालोय्, माघारीं पाय कशाला घ्या, असा पुन्हां विचार करून तो गांवा-कडे झपाट्यानें निघाला.

वाडीची वाट मागें टाकली आणि गांव जवळ केलें. गांवच्या पांदींतच हाणमाचा बैलगाडा चौगुल्याला पुढेंच दिसला. गाडा पुढं निवांतपणें चांगला होता. मस्तावलेलें धूडच्या धूड गाड्याचे बैल सहजपणें गाडा ओढत होते. पाटीवर पन्हाळ पडलेलीं रुबाबदार वशिंडांचीं तीं जनावरं, दुसरें जनावर बघून डरकाळी फोडीत. त्याबरोबर घाट्यांचा आवाज होई. ठिसकारीत, डरकाळीं फोडीत बैल चालले होते. गाड्याबरोबर वाघासारखा मोठा कुत्रा चालला होता. तो वाटेच्या झाडा–झुडपावरच्या सरड––खारोट्यावर आपली रोखली नजर फेंकत होता. गाड्यांत पुढं यल्लापा बसला होता. मागें दांड्याला टेकून हाणमा होता.

काळू चौगुल्या अगदींच हाणमाच्या गाड्यामागें आला. त्याला वाटलें, हाणमाच्या कपाळाला पट्टी बांधलेली असेल. हातापायाच्या पट्या सोडल्या नसतील; पण त्याला दिसलें तें सगळे उलटेंच ! हाणमाच्या चेहऱ्यावर त्याची नजर खिळली. आणि जणू कांहीं आपल्याला कांहींच झालें गेलें नव्हतें, असेच भाव त्याच्या तोंडावर त्याला दिसले. असल्या जीवघेण्या जखमांतून हा गडी कसा काय पुन्हां आहे तसाच झाला, असा विचार मनांत येऊन तो स्वतःशींच चकित झाला.

चौगुल्याच्या पायांतला जोडा चटाक्–पटाक् वाजला आणि आपल्याच तंद्रींत असलेला हाणमा जागा झाला. तोंच चौगुल्याहि गाड्यामागें जाऊन टेकला. त्यानें हाणमाला रामराम घातला,

"काय रं हाणमा, आतां बरं हाय का ?"

"पाटील, तें झालं गेलं ? तायआईची आपल्यावर चांगलीं सांवली हाय !" असें म्हणून तो हासला आणि त्या काळ्याझार गड्याचे पांढरेफेक दांत दिसलें. रेड्यासारखी माजलेली मान पुन्हां चौगुल्याकडे वळवून तो म्हणाला,

"कुटं निघाला चौगुले–पाटील ?"

"अरं तुज्याकडंच !"

"का बा ?"

"आरं ! औंदा घर उभं करायचं हाय ! तवा दगड पाडून पाहिजेत."

"असं काय ! मग गाड्यांत तरी बसा ! बोलायचं तें निवांत पालावरच बोलूं !"

असं बोलून तो उभा आडवा फुटलेला मोठा--लाट गडी पुढेंच सरला, दगड फोडायची सुतकी बाजूला सरकवलीं. पाहारी एका बाजूला सारल्या. चालू गाड्यांत चौगुल्याच्या हाताला धरून सहज त्याला गाड्यांत घेतलें. तो मांडी घालून नीट बसतोय् तोंच त्याची नजर एकदम गाड्याच्या दांड्याला बांधलेल्या घोरपडीकडे गेली व चौगुल्या गडी जरा बिचकून मागें सरत म्हणाला,

" अरं, हें काय जनावर ! जिवंत हाय की काय ? "

आणि बिचकलेल्या चौगुल्याला बघून हाणमा खो खो हासला व हात आवरून ' थांब सांगतों ' असें म्हणून पैरणीच्या खिशांतली तंबाकूची चंची काढली. तळहातांत तंबाकू घेऊन तो म्हणाला,

" आमची जात वडाराची ! आमचं काम जिवावरचं ! आमाला लागती सागुती अन् दारू—" पुढचं बोलणार तोंच चौगुला म्हणाला,

" लेकांनो, हें असलं खातां कीं काय ? "

" तेला काय झालं ? घोरपडींत बारा बैलांचं बळ असतं ! घोरपडीचं सोड्ढनच दे ! " असें म्हणून तो पुढं सांगू लागला;

" आम्ही खडक फोडतो ना ? "

" होय ! "

" मग काळ्या खडकांत जितीं जितीं बेंडकुळीची पिल्ली निघतात. मग ती इंगळावर भाजून बग कशीं लुसलुसीत चवीदार लागतात ! "

हाणमाचे, बेडकाचीं कोंवळीं पिल्लं भाजून खातात हें बोलणें ऐकून चौगुल्यानें कसें तरी तोंड केलें आणि आपल्याच तोंडांत हा ओंगळ पदार्थ गेला कीं काय म्हणून त्यानें पुढें तोंड करून तोंडांतली थुंकी बाहेर टाकली व मध्येंच हाणमाला थांबवून म्हणाला,

" लेकांनो ! तुमचं काम गुरा-ढोरांसारखं. कबूल ! पण एवढा पैका मिळवितां तो दारू-मटनांत घालवितां की ! काय तरी पैक्यांतून घरदार करा."

" चौगुल्या-पाटला, तुझा बोल पडला. पण काम तसं खाणं लागतं, नाहींतर पटकन् पाकोळीसारखा जीव जाईल ! हे बघ हाताला घट्टे ! "

आणि खरेंच हाणमाच्या हाताला दगडासारखे घट्टे पडलेले दिसले.

हाणमाच्या हातावरचे घट्टे चौगुल्यानें पाहिले व समोरची सुतकी व पहार हीं हत्यारं बघितलीं आणि घोरपडीकडे टक लावून बघूं लागला.

चौगुल्याला हाणमाचें बोलणें पटत होतें.

दगड फोडावयाचें काम भारी अघोरी. त्यांत अगांत ताकद पाहिजे. मनगटांत जोर पाहिजे. त्यासाठीं मांस-मांसकांड खाल्लें पाहिजे. त्यांत पैशाचा चुराडा होणारच. तरी देखील चौगुल्या पुन्हां हाणमाला म्हणाला,

" हाणमा, तुझं बोलणं पटलं पण लेकांनों, खाण्यावरच सगळं घालवून कसं भागेल ? पुढच्या वेळ--काळाचा इचार केला पाहिजे. "

" पाटला, तुमीं तो विचार करावा. आमी काम करणार, पोटाला पोटभर खाणार ! आमचं काय, आज हिथं तर उद्यां दुसरीकडं ! "

हाणमाचे एकदम निष्काळजी विचार ऐकून चौगुल्या गप्पच झाला व मनाशीं विचार करूं लागला, ' काय ही वडाराची जात ! गुरांढोसारखं काम करावयाचं, पण मागचा पुढचा मात्र विचार करावयाचा नाहीं ! अशानं यांचें होणार कसं ? "

तोंच वडारांचीं पालं जवळ आलीं—तीं पाहून चटकन् चौगुल्याच्या मनांत विचार आला व तो पटकन बोलून गेला,

" कारं हाणमा, सगळ्या दुनयेला घरासाठीं दगड द्याल. दुसऱ्यांचीं घरं उभीं कराल. पण हीं तुमचीं पालं कवा सुटणार ? "

त्यांवर हणमानें मान डोलावली व तो म्हणाला,

" तेवढं तुझं पटलं बग ! दुसऱ्याचीं घरं उभीं करण्यासाठीं आमी राबतो अन् उभा जल्म पालांत काढतों. तुझ्यासारख्याचा बोल पटला म्हणूनच तें बग बांधलं ! " असें म्हणून जरा अंतरावर बोटाची खूण करून दाखविलें. तों नवं माळवादी घर चौगुल्याला दिसलं ! अन् तो चटकन् म्हणाला,

" तुझं का तें ? "

" म्याच बांधलं ! "

" मग अजून पालांत ? "

त्याची एका बगलेची भिंत चढवायची हाय! अन् त्यांत ताईआईची जत्रा केल्याविना नव्या घरांत शिरायचं नसतं!"

"ठीक केलस!" असें म्हणून चौगुल्याची नजर त्या घरावर खिळली.... माळरानाची मोकळी हवा. ओढ्याचें पाणस्थळ, गुरां-ढोरांना हिंडायला मुबलक मोकळें रान. हें सगळें पाहून त्याला बरें वाटलें. त्यावर तो हलकेंच बोलला,

"ठीक केलं! एकदाची तुमी कायम वस्तीला लागला." तोंच गाडा पालापुढें आला. हाणमाची उघडीं बोडकीं मुलं धांवत पुडें आलीं, पटापट गाड्यांत उड्या टाकून कुणी हाणमाच्या मांडीवर बसले. कुणीं बैलाची काडणी धरली, एकाची घोरपडीकडे नजर जातांच ते चेकाळले. ती त्यानें सोडून आपल्या हातांत घेतली. गाडा पालापुढें थांबला. अन् बैलांच्या घाट्यांचा खळाळकन् आवाज आला, हाणमा व काळु चौगुला गाड्यांतून उतरले व पालापुढें शेणानें सारवलेल्या स्वच्छ अंगणांत घोंगडें टाकून बसले....

सूर्य बुडायला चालला होता. तांबूस किरणांत माळरान लाल दिसूं लागलें, त्यांत वडारांचीं पालं उठून दिसूं लागलीं,

तंबाकूचे गाडगे आणावयाला हाणमा पालांत शिरला आणि चौगुल्याची नजर बाजूच्या पालाकडील जाळाकडे गेली....मोठा जाळ झाला होता. जाळाच्या भोंवतीं, दंडक्या घातलेले काळपट वानाचे दणकट गडी फिरत होते. उघडीबंब पोरें उड्या मारत होतीं. चेकळत होती, टाळ्या वाजवत होतीं व सुटलेल्या खमंग वासांत गुंग होतीं. वास सगळ्या पालावर पसरला. चौगुल्यानें नाकाला पदर लावला. हाणमा घोंगड्यावर बसत त्याच्याकडे पाहून हासला.

"पाटला, नाक काय धरतोय! जाळांत डुक्कार भाजतात. तेच्या सागुतीची चव तुला काय माहीत! अन् ती आमीच पचवावी!"

"खरं हाय हाणमा!" असें बोलून नाकाला पदर लावून चौगुलाहि हासला, आणि 'थू' करून थुंकी टाकली.

हाणमानें तंबाकू पुढें ठेवली, चौगुल्यानेंहि पानाची पिशवी मोकळी केली. इकडच्या तिकडच्या गप्पा-गोष्टी झाल्या. मूळ विषयाला चौगुल्यानें हात घातला.

" हाणमा, आपल्याला दगड पाडून पाहिजेत ! "

" किती ! "

" माझ्या घरापुरते ! "

" फाडी का रेजगी ? "

" फाडी कशाला ? रेजगीच दे ! "

" पाटला, माझ्या घराची भिंत मागें ठेवतो, पण तुझं घर पहिल्यांदा उभं करून देतो. मगनं माझं घर पुरं करितो. पटलं ! "

त्यावर चौगुल्यानें मान डोलावली. त्यांत खर्च किती येईल, वेळ किती लागेल. ह्यावर तपशीलवार बोलणं झाले. सगळा व्यवहार ठरला.

तेवढ्यांत डोईवर बाभुळ-बोराट्याच्या काट्या-फेसाट्याचा भला मोठा भारा गौरानें पाटलामागें टाकला व उभ्याउभ्याच कपाळावरचा घाम निरपून कंबरेचें फडकें सोडलें. ती खालीं बसली व तिनें लहान पोराला मांडीवर घेतलं.

झांजड पडली. अंधार दाटूं लागला. दिवेलागण झाली. वडारांच्या पालांत चुली पेटल्या. चुलीभोंवतीं पोरें गोळा झालीं. बापई गडी गोळा-मोळानें बसूं लागले. पांढऱ्या पाण्याच्या घोटानें धुंद होऊं लागले. बडबडूं लागले....

रात्र झाली. अंधार अधिकच दाटूं लागला आणि काळू चौगुल्यानें आपल्या मेंडकेवाडीची वाट धरली.

दिवसामागें दिवस चालले. हाणमा वडार रोजच काळू चौगुल्याच्या घराचे दगड पाडूं लागला. दगडाचें काम महिन्याभरांत पुरें झालें. पुढें घराचा पाया खोदला. पायाभरणी झाली. रोज रोज भिंतीचे थर चढूं लागले. चार महिन्यांतच घर उभें केलें.

आणि हाणमा नेटानें आपलें घर पुरें करण्याच्या तयारीला लागला ! ! खाणींवर दगड पाडावयाला जाऊं लागला.

" खाणींत.... सुरुंग का दबला ? " म्हणून हणमा पुढें बघत बघत गेला, सुरंगाजवळच एक-दोन पावलें जपून टाकीत गेला. बघण्यासाठीं खाली तोंड केलें.... अन् तोंच सुरुंगाचा अचानक भयंकर स्फोट झाला....

झपाट्यानें आभाळांत दगड शिरले. धुराचा लोट झाला. सगळी खाण धुराळा–मातींत झाकून गेली. माणसाची नजर आंत घुसेना. अन् पुढें गेलेला हाणमा कुणाच्या डोळ्यांना दिसेना.

धूर आभाळांत तरंगत गेला!! वर उडालेले दगड बदाबद खालीं पडले. उडालेला धुराळा निवळला अन् बाजूला पांगून बसलेले गडी खाणीकडे धावले. हाणमाला धुंडाळूं लागले.

––ते पुढेंच गेले. अगदीं खाणीच्या डबऱ्याजवळ गेले आणि सुरुंगाच्या तोंडाजवळच गडी गपगार होऊन पडलेला बघून सगळे घाबरले. धडाधड उड्या टाकून खालीं उतरले. हाणमाचा बेशुद्ध देह चौघांनीं उचलून बाहेर काढला.

हाणमाच्या डोक्याची कवटीच फुटली होती. हाता-पायाला मार बसला. होता. तो रक्तानें भिजून ओलाचिंब झाला होता, वर्मी मार लागल्यानें तो थंडगार झाला होता.

खाणीवर एकदम कालवा झाला. रडारड व गोंधळानें कुणाला काय सुचेना. तेवढ्यांत काळी तलंग हाणमावरून उतरून टाकली...पण गड्याच्या पापण्या कांहीं उघडेनांत म्हणून लागलीच त्याला गाड्यांत घालून गांवाकडे चालविला.

यल्लाप्पा गाडी हाकीत मधून मधून मागें मान फिरवून बाच्या तोंडाकडे बघत होता. हाणमाच्या उशाशेजारीं बसलेली गौरा सारखें डोळ्यांतून पाणी गाळीत होती, कपाळावर हाणून घेत होती. मध्येंच गहिंवर घालून रडत होती. वाघ्या कुत्रा थंडपणें चालला होता. गाड्याबरोबर खाणीवरच्या वडारांचें सगळें लोंबाळ चाललें होतें. कुणी कुणाशीं बोलत नव्हतें, सगळ्यांच्या तोंडावर अंधुकी चढलेली होती.

–मध्येंच एकदम गौरानें बोंब मारली–आणि हत्तीसारखा हाणमा एकदम गार पडला....

गाडा पालावर आला. पोराबाळांचा रडण्या-ओरडण्याचा एकदम आकांत सुरु झाला, गौराबाई आक्रोश करूं लागली. धडाधड कपाळ बडवून घेऊं

लागली. जमलेल्या आयाबायांनीं डोळ्याला पदर लावले. वडारगडी गुडघ्यांत माना घालून गप्प बसले.

—मध्येंच कुणींतरी मोठ्यानें किंचाळले आणि खालीं मुंडया घालून बसलेल्या वडारांनीं वर बघितलें, त्यांच्या नजरा गरकन् बाजूला वळल्या, तोंच मोठ्यांदा किंचाळ्या पुन्हां आल्या. तसे लोक तिकडे धांवले.

तो म्हातारा गुंडया वडार होता. देवीचा भक्त होता तोच किंचाळत होता. ओरडत होता. हाताला मिठी मारून जमिनीवर आपटत होता. त्याचें सगळें अंग झुलत होतें. त्याला दोघांनीं धरलें होते. तो लटालटा उडत होता तोंच कुणीतरी बोललें.

" अरं, भक्ताच्या अंगांत देवी आली. " त्याबरोबर त्याच्याभोंवती माणसांचा घोळका जमला. कर्त्या गड्यानें माणसें बाजूला हटविलीं. " सगळे शांत व्हा ! देवीचा काय बोल ऐका ! " असें ओरडून त्यानें माणसांचा कालवा थंड केला. सगळ्यांचें डोळे भक्तांच्या बोलाकडे लागले. त्यांचे हात आपोआप जुळले आणि त्या गड्यानें देवीला विचारलें.

" आई ! तुझा काय बोल हाय ? सांग ! " तो भक्त झुलत होता. त्यानें मोठ्यानें किंचाळी मारली. जमिनीवर हात आपटून म्हणाला,

" तूं नव घर बांधलंस ! पण माझी जत्रा केली न्हाय ! माझ्या दारांत रक्त कां शिंपडलं न्हाय ? बोल ! बोल ! ! "

आणि मग गडी-बायांची नजर हाणमाच्या नव्या घराकडे गेली. आपापसांत हळूं हळूं ते बोलूं लागले. देवीचा कौल पटला. म्हणून एकमेकांकडे बघून माना डोलवूं लागले.

देवीचा बोल गौराला एकदम पटला, तिनें आपल्या झिंज्या मागें सारल्या. डोळ्याचीं आसवं पुसलीं. आणि देवीपुढें पदर पसरून कळवळून बोलली,

" आय ! तुझा बोल पटला. आमची चूक झाली. पदरांत घाल. अन् माझ्या लेंकरांबाळांवर तुझी सावली असूं दे ! "

देवीपुढें गौरानं चूक कबूल केली, अन् तिच्या डोळ्यांतून पुन्हां घळाघळीं अश्रू ओघळूं लागले.

गड्यांत बोलाचाल सुरू झाली आणि एकजणानें विचारलें,

" लेकाचा, कुणाचं दगड फोडीत होता. ! " कुणीतरी जड आवाजांत बोललें,

" आपल्या नव्या घराचे ! "

तोंच चटकन् मागाहून कुणीतरी बोललें,

" हाणमाला का कळत नव्हतं ! आपल्या जातीला घरचं धार्जिण न्हाय ! " आणि दम खाऊन पुन्हा तो गडी हळूच म्हणाला,

" ऐकला का देवीचा बोल ! देवीच्या दारांत रक्त शिंपडल्याबिगार रातच्या पाऊस-वाऱ्यांत नव्या घरांत काय म्हणून वस्तीला जायाचं ? "

——सगळ्यांच्या ध्यानांत हाणमाची चूक आली....रात्रींच झालेल्या वळवाच्या जोरदार पावसांत एकाएकी त्यानें नव्या माळींत वस्ती नेली. आणि देवीचा कोप अंगावर ओढवून घेतला

हाणमा वडार सुरुंगांत घावला. अन् एकाएकीं मेला, ही वार्ता मेंडके-वाडींत गेली. आणि लागलींच काळू चौगुल्या पालावर आला.

——पण हाणमा वडाराचें पाल जाग्यावर नव्हतें पुन्हां त्याची नजर हाणमाच्या नव्या घराकडे गेली. पण घरहि रिकामेंच पडलें होतें.

——पुन्हां चौगुल्यानें पालाच्या मोकळ्या जागेकडे पाहिले. भकास दिसणाऱ्या त्या रिकाम्या नव्या घराकडे पाहात पाहात डोक्यांत उसळ-लेल्या विचारांत बुडत बुडत तो वाडीच्या वाटेला.....

जुनें साल संपतें. नवें येतें....

सालोसाल वडारांचीं पालें साळगांवच्या ह्या माळरानावर येतात, पुन्हां जातात...

——पण हाणमा वडाराचें नवें घर जुनें होत चाललें आहे. त्याचा एक एक दगड निसटत आहे. तें रिकामेंच भकास पडून आहे.

वडाराचीं पालें माळावर उतरतात.

——पण त्यांचीं कुत्रीं डबरीं करून ह्या घरांत दिवस-रात्रीं वस्तीला असतात....

ग्रंथसंग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 30152
विभाग कादं
क्रमांक 2322

# भामटा

अंधारी रात्र संपली...

मुक्तीदिन उजाडला...

गुन्हेगार वसाहतीच्या अंगाभोंवतालचें दीड पुरुष उंचीचें कांटेरी तारेचें कुंपण तुटलें. क्रिमिनल सेटलमेंटचें ऑफिस उठलें, चार फाटकांवरचे 'गुन्हेगार वसाहत' नांवाचें बोर्ड आपोआप निघाले. खाकी पोशाखांतील भरदार मिश्यांचे दांडगे शिपाईगडी रात्रींच कुठें गडप झाले. गुन्हेगार वसाहतीच्या चारी दिशांन्या चारी वाटा मोकळ्या झाल्या....

गुंड्या भामटा आज रात्रीं निवांत झोंपला होता....झोंपेंतच त्याला धसका बसला. दचकून एकदम उठला. कावऱ्या बावऱ्या नजरेनें त्यानें दिवसाकडे बघितलें. कोंवळ्या उन्हांतून त्याची नजर स्वैरपणें उधळली. लागलीच त्याच्या ध्यानीं आलं....रात्रींच आपली तार तुटली. आपण आतां मोकळे झालों. त्यानें निर्धास्तपणें निश्वास सोडला आणि तसाच निर्मळपणें भुईवर पुन्हां कलंडला.

आज गुंड्याला मोकळें मोकळें वाटत होतें....आज त्याच्या कानांवर आसुडाच्या फटकाऱ्यांचा आवाज आला नाहीं.......बंदूकधारी शिपायांच्या बुटांचा खाड खाड असा सारखा आवाज आला नाहीं. घारीप्रमाणें आजूबाजूला सतत तरंगणाऱ्या आडदांड शिपायांच्या निब्बार हाळ्या कानावर आल्या नाहींत. त्याच्या व शिपायांच्या तांबरलेल्या नजरांची आज चकमक झाली नाहीं. हजेरीचा आवाज आला नाहीं. त्याला 'हजर हाय!' असा उलट प्रतिसाद उठला नाहीं.

गुन्हेगार गडी-बायांची रोजच्या कामाला निघालेली रांग दिसली नाहीं. त्यावेळी तातातूट झालेल्या लहान मुलांचा रडण्या-ओरडण्याचा कालवा आज झाला नाहीं. सगळें शांत होतें, मोकळें होतें. आणि गुंड्या भामटाहि बिनघोरी पडला होता.......

दिवस कासरा-दीड कासरा वर आला...

गुंड्याच्या हातांत पगाराची शिल्लकबाकी पडली होती. सगळ्याच गुन्हे-गारांना शिल्लकी पगार-बाकी मिळाली होती. त्याची मोड झाली होती, त्यांतून वसाहतींत आज सणाचें वारें वाहत होतें. झोपड्या झोपड्यांतून सणाचा वास सुटला होता, कुठें कुठें तव्यांत तेलच्या तळत होत्या तर कुठें कुठें चुलीवर सागुती शिजत होती.

गुंड्याच्या झोंपडीपुढें सगळें आनंदाचें वातावरण पसरलें होतें. निवांत-पणें चूळ भरून गुंड्या दारांत बसला होता. आपल्या लहान मुलाला मांडीवर घेऊन खेळवत होता. त्याच्या झोंपडीपुढें येरवाळीच चूल पेटली होती. त्याची बायको रक्मी चुलीपुढें बसली होती.

चपात्या टाकून झाल्या होत्या. त्याचीं कळती–बिनकळती पोरें कोरका कोरका चपाती हातांत घेऊन मोठ्या चवीनें खात होती. तीं स्वैरपणानें हुंदडत होतीं. दंगामस्ती करीत खेळत होतीं. गुंड्या त्यांना पोट भरून बघत होता.

—झोंपडया–मागें, डोळ्याआड, कुठें कुठें बाटल्या फुटल्या होत्या. कुठें चिलमीचा आळी-पाळीनें धूर निघत होता. पान तंबाकूच्या थुंकीचे जाग-जागीं सडे पडले होते. त्यांत गुंड्याहि गुंग झाला होता. तो पोटभर जेवला, मन मानेल तसा गांवांतून भटकून आला.

—बायका–मुलांत खुशाल बसला होता.

× × ×

दिवसामागे दिवस उलटूं लागले.......

गुन्हेगार वसाहतीची तार तुटली, त्याबरोबर गुन्हेगारांचें काम सुटलें....

—त्यांत गुंड्याच्या घरांत मिळवते कमी पण खाणाऱ्या मुला-बाळांचा अधिक भरणा. अशांत सडकेचें काम बंद झालें. तलावाचें काम तसेंच पडलें.

आणि खडक फोडावयाचे काम कमीं केलें. तरीहि गुंड्या येरवाळीच कामाच्या आशेनें गांवात जात होता. सांचापारी मोकळ्या पदरानें खालीं मुंडी घालून मंद मंद पावलें टाकीत झोंपडीकडे येत होता. गुडग्यांत मान घालून झोपडीपुढें चिंतागती होऊन बसत होता.......

आला दिवस असाच चालला...

महिन्यामागें महिने उलटले. गुंड्या हातपाय मोडल्यागत चार महिने बसून राहिला. घरांतले सारे किडूक-मिडूक, दागिनें मोडून पोराबाळांना घातलें. तांब्यापितळेचीं भांडीं, हांडा, तपेलं, पितळ्या, तांबे घाणवट पडले. त्याची सगळी झोपडी मोकळी झाली....तरीहि नवरा-बायको रोजच्या रोज कामाच्या आशेनें गांवांत जात होतीं. काम मिळेना म्हणून ती मोकळ्या हातानें परत येत होतीं. आला दिवस वाईट आला आणि तो खायाला उठूं लागला. झोंपडींत उपास शिरला....लहान मुलें भाकरीपाय किर किर करीत होतीं व ते ऐकून गुंड्या व रकमी तोंड शिवल्यागत खालीं मान घालून बसत होती.

रात्र झाली....अंधारानें सगळी वसाहत आपल्या पोटांत गडप केली....

गुंड्या गांवांतून आला होता. आपल्या झोपडीपुढें काळजींत पडला होता. आभाळाच्या पोकळींत आरपार नजर भिडवत होता....त्याची चूल बंद झाली होती. भाकरीवांचून पोरें सुकलीं होतीं. भाकरी ! भाकरी ! ! हे त्याचे शब्द ऐकून त्याच्या काळजाला घरें पडत होतीं. त्यामुळें तो अधिकच चिंतेंत पडत होता. त्यांतच तो बुडून जात होता......सारखा विचार करीत होता. गत-आयुष्यांतील प्रसंग त्याच्या नजरेपुढून विजेसारखे चकाकून जात होते....त्यानें गुंड्याच्या विचाराला अधिकच गति मिळत होती. पडल्या जागीं त्याच्या अंगाची हालचाल होत होती. हातपाय वळवळत होते. अंधारांतून त्याच्या नजरेचे तीर लांब....लांब....सुटत होते.

गुंड्या बेचैन झाला होता. विचाराच्या वावटळींत तो घावला होता. तो तसाच उठून बसला. झोपडीच्या तोंडाला हांक मारली.

'रकमे ! ये रकमे ! !'

बायकोचा कांहींच उलट आवाज येईना, तेव्हां तो सहजच पुटपुटला,

" बायली, हिला झॉप लागली का काय ! "

पोटाच्या आबळीनें रकमीच्या अंगावरचें दूध आटलें होतें; आणि तान्हें मूल सारखें कोरडें स्तन तोंडांत धरून चिटत होतें. पोटांत कांहीं नसल्यानें तीं तशींच अंधाराकडे टकाटका बघत पडली होती. त्यांत तिनें नवऱ्याची हांक ऐकली व तिनें मुलाला तोडलें. तसेंच किरकिरत त्याला टाकलें. ती उठून बसली व बोलली,

" का जी ! "

बायको जागीच आहे. या गोष्टीनें गुंड्याला धीर आला व तो बोलला,

" अगं ! बाहीर येती का ? "

" का वं ! "

" मला एक गोष्ट बोलायची हाय ! "

आपला दाल्ला एकदम का असं बोलला ! काय तरी मग हाय ! या विचारानें तिच्या मनांत नवी आशा फुलली. तिनें आपल्या झिपऱ्या मागे सारल्या. पदर नीट घेतला. तशीच किरकिरत्या तान्ह्या पोराला घेऊन बाहेर आली व शेजारीं बसली. त्यावर पुन्हां गुंड्या बोलला,

" अग ! त्या आपल्या थोरल्या पोराला उठव ! "

" तेला वं कशाला ? पडूं द्या कीं पडलाय तर ! "

" अगं मी उठव म्हणतुंया तर !' असें बोलून आपणच थोरल्या लेकाला उठविण्यासाठीं हांक मारली.

" ये धन्या ! लेका झोपलास का जागा हायेस ! "

त्याबरोबर मोकळ्या पोटाचा धन्या पडल्या पडल्याच बोलला,

" का गा ! मीं जागाच हाय कीं ! कुठली झॉप लागतीय !—पण मी कशाला उगच उठूं ! "

त्यावर पुन्हां गुंड्या बोलला,

" तुला उठ म्हणतुंया तर ! "

त्याबरोबर धन्या ढिल्यापणानें सावकाश उठला व एक कडक जांभळी देऊन बसला. ते तिघे झोपडीच्या कुडाआड कोंपऱ्यांत बसले. गुडूप अंधारांत.

ते पहिलेच बिन–भाकरीचे थकलेले. वाकलेले. त्यांत बसल्या बसल्या त्यांच्या माना खालीं लवल्या. घटकाभर ते गप्पच बसले.

तेवढ्यांत धन्या मान वर करून खोल आवाजांत बोलला,

" बा ! येवढ्या अंधारचं कशाला उठवलं ? असें विचारून त्यानें गुढग्यावर हानवटी टेकली, व तो अंधारांत टकाटका ' बा ' च्या तोंडाकडे बघूं लागला. गुंड्या घशांतले घशांत खाकरला. त्यानें कोरडी जीभ पुन्हां लाळेनें ओली केली व दम खाऊन म्हणाला,

" सरकारनं तार तोडली. आपल्याला मोकळं केलं ! पण त्याबरोबर भाकरी तुटली. घरदार पोटपाण्यानं मरायला लागलं ! हेचा काय तरी इचार करा अन् शेवट लावा ! "

धन्याला वाटलें, आज ' बा 'च्या मनांत एकाएकीं काय आलंय ! सगळं चिडीचिप् झाल्यावर आमांला उठवलंय ! याचा सुगावा काय धन्याला घावेना. म्हणून तो तावातावांत बोलला,

" बा कशाचा गा इचार करायचा ! काम द्या म्हणून रोज दारोदार हिंडतों. जातीचं नांव ऐकल्या ऐकल्या माणूस माज्याकडं खालींवर बघतं, अन् 'पुढच्या दारीं जा' म्हणतं ! मग आतां पुढं कुठं जावं....! "

बापलेकाचं बोलणं ऐकून रकमालाहि आपोआप बोलण्याची उबळ आली वा किरकिरत्या पोराला मांडीवर हालवीत वैतागानें म्हणाली,

" कशाचं काय ! सरकारनं आपल्याला मोकळं केलं अन् उपाशीं ठेवलं ! ती तारच बरी हुती ! पोटाला रोज भाकरी तरी घावत हुती ! "

असे तिघे एकमेकाला बोलत बसले व पोटाचा मार्ग धुंडाळूं लागले. त्यांत गुंड्याच्या घरचें बोलणें कानावर पडलें आणि आपल्याच पोटांतला बोल निघालाय म्हणून जवळच्या झोपडींतल कोण कोण जवळ येऊन टेकलें; पुढच्या बोलाकडे ध्यान देऊन बसले. शेजारच्याच झोंपडींतला संत्या बेरड आभाळाकडे वर बघतां बघतां उठला. अन् उघड्या अंगावर धोतराच्या चार निऱ्या घेऊन तसाच पुढें आला व गुंड्याला लागून बसला. त्यांची मोकळी सुटलेलीं तोंडं, कान देऊन ऐकूं लागला. त्याचेंहि मन राहीना. उरांत सांठलेलें मोकळें करून टाकावें, म्हणून तो मध्येंच बोलला,

“ गुंड्याप्पा तुमी बघतांय आता —! तार तुटली अन् भाकरी गेली हें खरंच —! पण तार तुटल्या तुटल्या महिन्याभरांतच पोलीस सेटलमेंटवर तळपूं लागले....!”

संत्याच्या बोलण्यानें गुंड्याला उभारी आली व तो त्याच्याकडे तोंड फिरवून म्हणाला,

“ अगा संतू ! लांबचं कशाला....! कालचं सांगतुं ऐका ! अन् तें बी माजंच—” असं बोलून गुंड्या घडली घटना सांगूं लागला....

—दिवस बुडला. कहूसं पडलं...काम काय मिळालं न्हाय, तवा मी मोकळ्या हातानं सेटलमेंटवर निघालों. दमादमानं. मग काय. फाटकाच्या जवळच्या गेटावर मला पोलिसांनीं हटकलं. जवळ बोलावून माजा सगळा झाडा घेतला. अन् मला गेटांत बसवून फौजदारनं न्हाय न्हाय ते इचारलं !

फौजदार म्हणतो,

“ काय रं ! साल्यानुं ! आतां तुमी जगतां कसं ? तुमांला ना काम ना धाम !”

आतां त्यांत मला काय फौजदाराची चुकी दिसना. त्याचं बोलणं सरळ होतं. तवा मी आपला तेला खरंच बोल्लूं,

“ आमच्यावर उपाशी मरायची पाळी आली खरी !” मग काय फौजदाराच्या मनातलंच मी बोल्लुं. अन् माज्यावर डोळा वटारत हातांतला दंडुका टेबलावर आपटत तो म्हणतो,

“ तरंऽ रंऽऽ ! तुमची अवलाद उपाशीं मरंल ! तशी येळ आली तर तुमी माणसाला सरळ जगूं द्याल का ?”

मग मी दुसरं कशाला काय बोल्लूं ! आपलं हाय ते सांगितलं,

“ आवं आमी आपल्या मरणानं मरायला लागलुं ! दुसऱ्याला कशाला हात लावतुंया !”

मग काय इचारतां ? बाकीचं पोलिस माजा बोल ऐकून एकमेकाला डोळ्यानं पालवूं लागलं. माज्या बोलण्याचा उलट अर्थ लावूं लागलं. अन् एकमेकाला दंडूक्यानं ठोसू लागलं. तवा फौजदार पुन्यांदा बोलला,

" का रं भामट्या हें खरं बोलतुंयच का ? "

" यांत खोटं असंल तर लेकराच्या टाळूवर हात मारीन ! हें मी खरं सांगतुं ! "

मग फौजदार काय म्हणतो,

" भडव्यांनो ! तुमांला काय लेकरा-बाळाच्या आना-शिपता घियाला ! तुमच्या जिभाच उलट्या ! "

त्यावर मींच इचार केला, कशाला फौजदाराला उलट बोला. आपल्या पुढं वाढून आलंय, तेला तोंड देतां देतां जीव जायाची पाळी आलीय. तवा मी आपला सहज बोलत उठलों;

" तुमचीं तशीं आमची लेकरं—! "

आन मग काय ! फौजदार आवाज चढवून म्हणाला,

" असं काय ! बर बघूं ! ! आमची तुमची गाट हाय ! "

" हाय ! पहिल्या पसनच हाय ! " असं म्हणून मी आपला गेटावरनं काढता पाय घेतला. तवर फौजदारानें एकदम पोलीसाकडे नजर टाकून कडक शब्दांत बोलला,

" सेटलमेंटवर आतां जागती नजर ठेवा ! "

—गुंड्या आपली गोष्ट सांगून थांबला.

—तोंवर जवळच गप्प बसलेला संत्या बेरड पुन्हां म्हणाला,

" गुंड्याप्पा आपली तार तुटली...पण आपल्या भोंवतीं पोलीसाचं कडंच पडलंय खरं ! "

प्रत्येकजण आपल्या पोटांत सांठलेलं बोलले व अंधारात टका टका बघत बसले....

त्यावर मूळ मुद्याला हात घालून रकमी मध्येंच बोलली,

" असं झालं हे खरं ! पण आतां कुठवर पोरबाळं उपाशी मारायचीं ! पोटाला भाकरी कशी मिळेल, याची काय इगत काढा ! "

आपल्याच बायकोनें मूळ मुद्दा सुचवला म्हणून विचार करीत...गप्प बसलेला गुंड्या चटकन् बोलला,

" त्यांत कसली इगत हुडकताय ! हाय आपल पहिलं तेंच खरं ! उपासी काय म्हणून मरायचं ! आपल्याला आपली झोपडीबी सारखी अन् तुरुंग बी सारखाच ! कुठंबी खायचं अन् जगायचं ! "

पहिलंच आपलं खरं....! हे गुंड्याचें बोल ऐकतां ऐकतां बाकीच्या गड्यांच्या तोंडाला पाणी सुटलें....या बोलावर सगळे गप्प झाले....

—मग बापाच्या बोलावर ध्यान देऊन ऐकत बसलेला धन्या विचार करून बोलला,

" तुमीं पहिलं तेंच खरं म्हणताय खरं....! पण तेचा शेवट काय भोगावा लागंल याचा इचार करा ! का उचलली जीभ लावली टाळ्याला ! "

आपलं पोरगच आपल्याला उलट बोल करावयाला लागलं म्हणून गुंड्या मनांत चिडला व लागलीच रागानं बोलला,

" लेका ! तुला त्यांत काय कळतंय ! जे हुयाचं ते हुईल...! न्हायतर कुठवर मरत बसता ? "

गुंड्याच्या बोलानें पुन्हां सगळे गप्प झाले. कुणीच पुढें बोलेना. त्यांतून कांहींच सरळ वाट घावेना....म्हणून एक एक जण आपापल्या झोंपडीकडे चालला. रकमा पोराला घेऊन उठली. धन्या उठला. सगळ्यांच्या मागून गुंड्या उठला व जवळच पुन्हां विचार करीत पडला...

× × ×

पुन्हां पुन्हां अंधाऱ्या रात्रीं बैठकी बसत होत्या. एकमेकाचे बोल शांतपणे ऐकत होते. गुंड्या त्यांना आपले विचार सरळ सांगत होता—पण त्यांतून नीट मार्ग घावत नव्हता.

आला दिवस जड जात होता...

वसाहतींतील गडी-बाया पोटासाठीं रानोमाळ हिंडू लागले. त्यांत गुंड्याची बायको-पोरंहि वण वण भटकूं लागली. पोलीस त्यांना जागजागीं हटकूं लागले झाडा घेण्यासाठीं गेटावर नेवून बसवूं लागले.

बघता बघता गुन्हेगार वसाहतीच्या मूळ कचेरीच्या जागीं पोलीस ठाणें आलें. पोलीसांच्या बंदुकीचा पहारा बसला. गुंड्या व त्यांच्या नजरांच्या रोजच चकमकी होऊं लागल्या. वसाहतभोंवती पोलीसांचे जाळें पडलें आणि रातनध्या गस्त सुरूं झाली.

रोजच एका एका गड्याला गाठून पोलीस ठाण्यांत फौजदार त्यांची जबानी घेऊं लागला. रोजच कुणा ना कुणाच्यातरी झोपडीची झडती होऊं लागली. रोजच पंचनामा होऊं लागला. पोलीसांच्या या कारवाईनं सगळ्या सेटलमेंटमध्यें कालवा झाला. आणि गुंड्या पुन्हां त्याचा विचार करूं लागला.

गुंड्या वसाहतींतील गड्यांच्या कानीं लागू लागला. त्यांच्या मनातले बोल बोलूं लागला. पुन्हा अंधाऱ्या रात्रीं त्यांना घेऊन लांब कोपऱ्यांत गोळामेळ्यानें बसूं लागला. त्यांना आपले विचार सांगूं लागला....

--आपल्या बायका-मुलांना पोटाला भाकरी दिली पाहिजे. त्यांना जगवलं पाहिजे....गुंड्या त्यांच्यापुढें मनांतला बोल ठेवूं लागला. त्यावर गळ्यांत गळा घालून, मनाला मन खल होऊं लागला. त्यांतून बेत बनूं लागले ....बसल्या बैठकीला गुंड्याचे बाहू स्फुरण पावूं लागले. बोलतांना ते चेकाळूं लागले. त्यांच्या डोळ्यांत नवें तेज चमकूं लागलें. तोंडावर टवटवी उतरूं लागली.

...त्यांना डागिन्यांचे ढीग दिसूं लागले. जरीचे, रेशमाचे कपडे त्यांच्या पुढे येऊं लागले. कोंबड्या-बकऱ्याच्या चविदार सागुतीचा खमंग वास त्यांच्या नाकांत घुसूं लागला. त्यांच्या तोंडाला पाणी सुटूं लागलें...

—आणि गडद अंधाऱ्या रात्रीं बेत पक्का झाला. गुंड्याच्या बोलावर सगळ्यांनीं माना डोलावल्या. त्यानें सगळ्या जुन्या खाणाखुणा उजळून सांगितल्या. प्रत्येकाच्या ध्यानांत त्या पटापट बसल्या.

रात्र झाली....जेवण वेळ टळली. काळोख दाटला.

—आणि गुंड्या साथीदारांची टोळी घेऊन त्या घनदाट अंधारांत आरपार शिरला....

कोंबड्यानं बाग दिली. पहिली पहाट झाली. गुंड्या दमछॅक होऊन, पहांटे पहांटे टोळीसकट झोंपड्यांत येऊन पडला. चार-आठ दिवसांचा दम खावून, पुन्हां पुन्हां ते अंधारांत गडप होऊं लागले. पहाटे पहाटे घामाघूम होऊन भिजल्या अंगानें येऊं लागले.

झोंपड्या-झोंपड्यांत चुली पेटल्या. गुंड्याच्या झोंपडींत चूल पेटली. तव्यांत भाकरी पडूं लागल्या. भाकरीनें टोपलें भरूं लागलें. चुलीवर सागुती

शिजूं लागली. घरदार पोटभर जेवूं लागले. गडीबायांच्या अंगावर धड धडूत आलें. मुलांच्या अंगावर नवें आंगडे–टोपडें आलें.

—आणि या वासावर पोलिस गिधाडासारखें वसाहतीवर तरंगूं लागले. रोजच वाऱ्यावर सुटलेल्या बातम्यांचा सुगावा घेऊं लागले.

—आणि पाण्यांत माशाला जाळें लावून बसतात, तसेच ते सेटलमेंट-भोंवतीं दबा धरून बसूं लागले....

पहाटेला जाग आली....

कोंबड्यानें बांग दिली. त्याचा आवाज पोलिसांच्या शिट्यासारखा झोप-ड्यांत घुसला; आणि गुंड्याची रकमी चटकन उठली. ती झोपडीच्या तोंडाला आली. आपले पेटते डोळे आंधारी वाटेला लावून तटस्थ बसली.

पुन्हां कोंबड्यानें बांग दिली...

ती सगळ्या झोपड्यावर घारीसारखी तरंगू लागली आणि त्याबरोबर धन्या, मल्या, संत्या व इतर गड्याच्या झोपड्याला जाग आली. जागत्या बाया झटाझट उठल्या. दाट अंधारात त्यांच्या नजरेचे धुंडाळते तीर लांब लांब धावूं लागले.

पुन्हां पुन्हां कोंबड्यानें बांग दिली....आणि रकमीचा जीव खालीवर होऊं लागला. तिचे शिकारी डोळे दाट अंधारांत रानोमाळ वाटनावाट धुंडाळूं लागले व अस्वस्थ होऊन पुन्हां झोपडीच्या दाराशीं येऊन थांबूं लागले. इतर गड्यांच्या झोपड्यांत डोळ्यांच्या मिणमिणत्या चिमण्या वाऱ्यांत फडाडाव्यात तशा फडाडूं लागल्या व अंधाराशीं धडपडूं लागल्या. झोप-ड्यातले कळते डोळे चितागती झाले आणि दूचित होऊन अंधारांतून वाटे-कडे टक लावून बसले.

काळा अंधार...पहाट शांत. कोंबड्याचे पुन्हां पुन्हां आरवणें कानावर येत होते. प्रत्येक झोपडीतील अंधारांत अधिकच हालचाल वाढत होती. अस्वस्थता वाढत होती.

झाडावरील कावळे एकदम उठले. त्याचा फडफडाट झाला. त्यांनीं काव ऽ काव ऽ ऽ चा कालवा केला. जागत्या कुत्र्यांनीं कान टवकारलें. ती कावळ्याच्या आवाजावर भुंकू लागली. त्या दिशेनें ती धावत सुटली—त्याबरोबर रकमीच्या काळजांत धडधड होऊं लागली. आवाजाच्या दिशेवर ती कान देऊन बसली

अंधारांत, त्या वाटेकडे पुन्हां पुन्हां डोळे घुसवू लागली. इतर झोपड्यांतल्या बाया घाबऱ्या घाबऱ्या दाराच्या तोंडाशी येऊन उभ्या राहिल्या.

कावळ्याचा अधिकच 'काव ऽ काव ऽऽ' सुरूं झाला. कुत्र्यांनीं भुंकून कालवा केला...

आणि त्या दिशेला अंधारांत उलट-पालट बंदुकीचे बार उडाले. अंधाराला हादरा बसला. त्यानें रकमीच्या काळजांत चर्र ऽऽर झाले आणि त्या भावनेच्या भरांत तिनें लहान पोरगे चटकन भुईवरून उचलून घेऊन पोटाशीं घट्ट धरलें व हुंदके देत बोलली,

" देवा कायरं ही येळ तेंच्यावर आणलीच ! " तिचा थरकांप झाला होता. तिनें तसेंच डोळ्याचें पाणी पुसत पुसत लहान पोर जागी केली. थरथरत घाबऱ्या जिवानें कोंबडी पिलाला घेऊन बसते तशी ती लहान पोरांना जवळ घेऊन झोपडीपुढें दारांत बसली. बंदुकीच्या बारानें अजूनहि अंधाराचा थरकांप संपला नव्हता. कावळ्याचा काव ऽ काव ऽऽ चालूच होता. कुत्र्याचें भुंकणें जोरांत होतें.

रकमी कपाळाला हात लावून दारांत बसली होती.

पहाट हळहळू आपलें पाय काढते घेऊं लागली. आणि रकमी उठली. तिनें जिवांत धीर आणला व ती मनालाच बोलली,

" आपला नवरा गेला तो गेला....ह्या पोरांचा तरी या धाडींतून जीव वांचवा " असे बोलून तिनें मनांत पक्का बेत केला. झोपडींत भारी किंमतीचं होतं नव्हतं तें एका गट्ठ्यांत बांधलें. आणि ती दिसेल त्या वाटेनें पोरां-सकट अंधारांत घुसली. तिला बघून इतर बायकांच्या मनांत अधिकच कालवा-कालव झाला.

× × ×

गुंड्या व त्याच्या टोळीनें अंधारांतून एका बगलेनें झोपड्याकडे दुसरी वाट धरली होती. तो इतर गड्यांना आपल्या बोलाचा सारखा धीर देत होता. गोळीबाराचं समजावून सांगत होता....

" गड्यांनो आपून वाचलों ....! आपल्या बायकांचं कुक्कुच घट्ट ! दोन्ही बाजूनं आपल्या सुगाव्यावर पोलीस पार्ट्या होत्या. त्यांनीं आपली ही

टोळी समजून एकमेकांवरच गोळीबार केलं. आपापलं पोलिस गडीच जायबंदी करून बसलं....आता नेटांत निघा...."

गुंड्यानें असें सांगून, गड्यांचीं पुरी समजूत घालून सगळी टोळी उलट्याच वाटेनें, पांगून, पांगून अंधारांतून झोपडीवर आणली. ते गडी आपापल्या झोपडीकडे वेगांत धावले.

घामाघूम, ओलाचिंब झालेला गुंड्या आपल्या झोपडीपुढें आला व हलकेंच बायकोला बोलला,

"रकमे ! उठ ! ! मी आलु ! पोरं घेऊन लागलीच बाहेर निघ !"

त्याला रकमीचा उलट आवाज आला नाहीं. म्हणून तो तिला शिवी हासडीतच रागानें झोपडींत घुसतां घुसतां म्हणाला,

"अगं ये रांडं उठ कीं, काळ मागं आलाय... !"

—पण त्याला झोपडी गप्प दिसली. झोपडींत त्याच्या हातापायाला कांहींच लागेना. तो डोळे फाडून बघूं लागला, पण त्याला अंधारांत कोणीच दिसेना. त्यामुळें त्याच्या मनांत अधिकच कालवा झाला....तो झटक्यानें शेजारीं संत्याच्या झोपडींत शिरला आणि पुढचें पुसणार तोंच संत्याची बायको हलकेंच गुंड्याच्या कानाला लागली,

"दादा ! पोलिसाच्या गोळींत तूंच घावलास असं रकमीच्या मनानं पक्कं घेतलं. तिनं आपल्या कपाळावर हाणून घेऊन, पोरांचा तरी जीव या घटकला वाचवावा म्हणूनशान् ती बग आता घटका झालं अशीच पोरं घेऊन अंधारांत पसार झाली.... !"

तेवढंच ऐकून गुंड्याच्या काळजांत धस्स झालें. आणि तो कळवळला,

"आरं ! आरं ऽऽ ! आमी सुटून, तीच पोरासकट त्या भुताळीच्या फाशांत घावतीय वाटतं.... !"

असें बडबडून तो झटक्यानें उठला. झोपडीच्या दाराशीं टाकलेली फरशी कुऱ्हाड त्यानें घेतली आणि लागलीच रकमीच्या पाठोपाठ धांवतच अंधारांत घुसला ... !

वाचनालय

# कोल्हाटी

पावसाळा वसरत येतो....

शिवार हिरवागार बसलेला असतो...

बाजरीच्या कणसाचा लिंबूर झडतो. अन् कणसांत कोंवळ्या दुधाचा दाणा भरतो...आणि रानपांखरांचा भुकेला थवा पिकावर तरंगतो, भरारतो.

पालेदार मुग–मटकी भरांत येते अन् कोवळ्या लुसलुशीत शेंगांनीं गजबजून जाते....आणि वर्दिळीच्या वाटेचं लहानमोठं जनावर हावऱ्या नजरेनें तिकडे ओढ घेतें. धांवतें. पाला ओरबडतें.

ओढ्या–ओहळीचें निर्मळ पाणी, खडकदगडांतून खळाळत फेंसाळत पळतें, अन् रुपेरी चंदेरी बारीक चिंगळ्या, मासे कोवळ्या उन्हांत सळसळतात....आणि बगळ्याची–खंड्याची बारीक, हावरी नजर त्याच्यामागें धावते. टप्प्यांत आलेला मासा चटकन् उचलते.

सगळाच सौंदर्याचा भर. सगळेंच उन्मादक, सगळेंच प्रसन्न होतें....

दसरा जवळ आला आणि जेजुरीच्या माळावर पक्ष्याच्या थव्यासारखी कोल्हाट्याचीं पालं उतरलीं. हिरव्यागार माळावर तीं अधिकच खुलून दिसूं लागलीं. दसरा गांठूनच तीं लांबलांबहून आलीं होतीं.

दसऱ्याचा दिवस उगवला....

कोल्हाट्याच्या पालांपुढें चुली पेटल्या. चुलींवर पत्र्याच्या डब्यांत पाणी तापूं लागलें. म्हाताऱ्या बायांनीं चार-तांबे पाणी अंगावर घेतलें. उमललेल्या फुलागत जवानीनें उफाळलेल्या तरुणी न्हाल्या, आणि पाठीवर काळेभोर केस सोडून पालापुढें कोवळ्या उन्हांत बसल्या. समोर आयन्यांत बघून

आपल्या चेहऱ्यावरच्या सौंदर्याच्या कडा उजळूं लागल्या आणि माणसाच्या वाऱ्यानें त्यांचे भुजारलेला नेत्र रानोमाळ उधळूं लागले.

सुंद्राची लेक इंद्रा न्हाली व चुलीपुढें बसली. त्या काटक्या–चिपाडांच्या धुरांत तोंड घालून फुंकारा मारूं लागली. तिचा मोहक मुखडा दिसला. अग्नींतून तापवून काढलेल्या सोन्यावानी. चुलीला जाळ लागला. धुरानें भरलेले डोळे तिनें पुसले. ती जागची उठली–पुढें आली. आणि तिच्या त्या ऐटदार भरीव बांध्यांत मुसमुसलेली जवानी दिसली.

कोल्हाटयांचीं लहान पोरें माळावर स्वैरपणानें हुडकत होतीं. झुडुप झाडोऱ्यावरची रंगीं–बेरंगी फुलपांखरें पकडीत होतीं. सुस्तावलेलीं कुत्रीं त्यांच्यामागें धांवत होतीं. तीं पाय मोकळे करीत होतीं. कुणी म्हातारगडी आपले गाई–घोडे गवतावर हिंडवत होते. मोठ्या पोरांनीं शेरडं माळावर सोडलीं होतीं, कांहीं गडी जवळच्च सडकेच्या झाडाखालीं बसले होते. जुन्या-पान्या गोष्टी उजळत होते. कांहींजण पत्त्यांचीं पानं पिसत होते. डाव खेळत होतीं……पैशाचा आवाज येत होता. मोठमोठ्यांदा बोलण्याचा आवाज कानांवर पडत होता.

गुणवन्त मास्तर ओढ्यानें आंघोळ करून आला. बळीच्या पंखासारखे धुवून काढलेले कपडे गवतावर वाळत टाकले. आणि मलमली धोतर, त्यानें एका कडेला, आणि इंद्रानें दुसऱ्या कडेला धरून हडकवीत होते. एकमेकाला बोलत होते. तिच्या हास्यांतून सौंदर्याचा सुगंध बाहेर उधळत होता. त्यांत गुणवंत मास्तर अधिकच्च गुरफटून जात होता……

गुणवंत मास्तर सुंद्रा मायणीकरणीच्या बारींत पेटी वाजविणारा होता. त्याला मास्तर या नांवानें पालावर ओळखीत होते. बोलवीत होते. तसें म्हणाल तर तो खरा शाळामास्तर नव्हता; किंवा शाळामास्तरइतका मराटी फायनलहि झाला नव्हता. फक्त तो दोन बुकें शिकला होता. वाचण्याच्या सरावानें आलेलं पत्र फडाफडा फोडत होता. कोऱ्या कागदावर आल्या-गेल्याचीं पत्रें लिहीत होता. एवढ्या सामुग्रीवर कोल्हाटी समाजांत त्याला मास्तरची पदवी मिळाली होती. आणि पालावर तो तोंडातोंडीं कायमचा

मास्तर झाला होता. तसा दिसायला नीट नेटका होता, अंगापिंडानं धड व रंगानं सांवळा होता.

सूर्य वर चढत होता आणि कोल्ह्याट्यांच्या पालांवर गांवचीं नादिक तरणीबांड पोरें जमत होतीं; आणि हुरड्यांत आलेल्या कणसावर पाखरें तरंगावीत तशीं तीं पालाभोंवतीं फिरत होतीं. बैठकीला सोकावलेले गडी पालावर आले होते; व आपापल्या दाट ओळखी बघून पालापुढें चटईवर विसावले होते. तरण्या पोरी न्याहाळत होते.

—त्यांत नवें असें कांहींच नव्हतें. जुनें तेंच पाळलें जात होतें. संभाळलें जात होतें. त्यांना तेंच पाहिजे होतें. आणि गांवच्या वळूगत वास घेत हिंडणाऱ्या तरण्या पोरांना तर दुसरें काय...! त्यांत ते एकमेकांचे ऋणी होते. ऋण फेडण्याची ते वाट काढीत होते.

मास्तर व इंद्रा धोतर वाऱ्यावर धरून तशीच उभीं होतीं. हलकेंच बोलत होतीं. त्यांतून चेहऱ्यावर स्मित उमटत होतें. तेवढ्यांत सणाचा बाजार करून गांवांतून सुन्द्रा पालावर आली. तिनें येतां येतां बैठकीचे उंबरे पुजले, आणि तोंडहि लाल करून आली. पालावर येऊन ती टेकते न टेकते तोंच गांवचा मानकरी आण्णा वासावर आला. आणि धोतर धरून उभ्या असलेल्या इंद्राकडे त्याची नजर आपोआप खेचली. जवानीनें भरलेल्या तिच्या गात्रांत रुतली. मानकऱ्याच्या निबार नजरेचे तीर तिला लागले.... अन् ती खालीं मान घालून भुईकडे बघूं लागली. त्यानें आपली नजर बाजूला फिरवली व सुंद्राकडे पाहून तो हांसत बोलला,

"सुंद्रा ! अगं, ही तुजी पोरगी चांगली उपवर झाली ! ओळखूं येईना !"

—आणि पालाकडे तोंड करून बसलेली सुंद्रा एकदम बावचळल्यागत झाली. एकाएकीं कोण आलं म्हणून झटकन् मागें मान वळवून बघितलें तोंच "मालक...! तुमी आला...!" असें बोलून ती झटकन् उठली. मानकऱ्याच्या पायां पडली. उगचच हांसत म्हणाली,

"मालक ! बायाच्या जातीला लय वाढ असती. सा महिनं झालं, आतां ती कळती झाली." असें बोलून ती इंद्राकडे बघून तिला बोलली,

" अगं, अशी खालीं का बघतीच ! इंद्रा ! हे गांवचं मालक ! मानकरी आण्णा ! आपल्याला मोठा आसरा असतो तेंचा ! चल पुढं, पड तेंच्या पायां ! "

—आणि सुंद्रा लगबगीनें हात्न पालांत शिरली. चटई उचलून बाहेर आली. मळसूत गवतावर टाकली व चटईकडे हात करून हांसऱ्या चेहऱ्यानें म्हणाली,

" मालक ! हेच्यावर टेका ! "

मानकरी आण्णा सुंद्राच्या लघळ बोलण्यानें पाघळला. त्याच्या तोंडावर आपोआप हास्य उमटलें. अंगावरचें नकीचें धोतर त्यानें नीट सांवरलें. डाव्या हातानें मिशा पिळीत, इंद्राला आपल्या नजरेंत धरून बोलला,

" हं ! पोरे....! तूं आतां मोठी झालीस, तुला काय माहीत ! तुज्या आयचा आमचा लय लोभ ! "

—तोच मानकरी आण्णाच्या बोलानें सुंद्रा आपल्या चेहऱ्यावर लाडावलेला आव आणीत नीट पदर घेत म्हणाली,

" तुमी आमच्या जीवा-भावाला होता, तवा माणूस ओळख ठेवतं. साताजल्मी तुमच्या दारांत पाणी भरल्यानं तुमच उपकार फिटायचं न्हायतं आमाला ! "

सुंद्रा मानकरी आण्णाचे गुण गावूं लागली. तसा तो फुगूं लागला, त्याचा चेहरा खुलूं लागला. चटईवर बसल्याबसल्या मिशाला पीळ देऊं लागला, इंद्राकडे नजर फेकून तिला खालीं-वर न्याहाळूं लागला, तोंच पुन्हां सुंद्रा आवाज चढवून इंद्राला बोलली,

" खालीं काय येड्यागत बघतीस ! आगं हे आय पांढरीचं मालक ! तेंच्या पायां पड ! "

—आणि त्याबरोबर तिच्या हातांतून मास्तराच्या धोतराचा पदर सुटला. खालीं मातींत पडला. तिनें डोईवर नीट पदर घेतला. डोळ्याच्या पापण्या खालीं लवल्या. तशीच ती खालीं बघत चार पावलें पुढें आली. हात जोडून, खालीं लवून मानकरी आण्णाच्या पायां पडली. मागे सरून चार पावलें गेली व पालाच्या मागें उभी राहिली. तिच्याकडे पाहात मिशीवर हात फिरवीत मानकरी आण्णा हासत बोलला,

" पोरगी अजून लाजतीया ! "

" तिला अजून माणसाचा वारा न्हाय ! " .एकदम पुढचं सुंद्रा बोलली. तोंच मानकरी आण्णा म्हणाला,

" लागंल आतां माणसाचा वारा.... ! " आणि सुंद्राकडे बघून मोठ्यांदा हांसला. सुंद्राहि लाजली व तोंडाला पदर लावून तिनें मान बाजूला वळवली.

—मास्तरनें धोतराची घडी घातली व पालांत शिरला. तोंच मानकरी आण्णाची नजर लांडग्यासारखी त्याच्यामागं धांवली. व त्यानें सुंद्राला पुसलें,

" सुंद्रा ! पालांतला पोरगा कुणाचा ? "

" हाय आमच्याच लांबचा नात्याचा. तेला आमीच संबाळतों. भाकरी घालतो. आपल्या बारींत तो पेटी वाजवतो. "

—आणि तें ऐकल्याऐकल्या मानकरी आण्णाची नजर त्याच्याभोंवतीं घारीसारखी घिरट्या घालूं लागली. 'लांबचा नातेवाईक' हें ऐकून तो घोटाळला. गोंधळला, आणि धीरानें बोलला.

" मग हेच्या पेटीचं वाजप-काम एकदां आमाला दावा ! "

" त्येंच आमचं काम हाय ! आज तेवढा देव—देव केला आमी मोकळं झालं. आज रातींच वाड्यांत बारीचा नारळ फोडूं ! मग माझ्या इंद्राचा गळा ऐका ! काम बघा ! मग त्याबरोबर तुमाला पेटीचा ताल-सूर कळंल ! "

सुंद्रानं सगळं मोकळं करून सांगितलं. त्याबरोबर इनामदार सुखावला. त्याच्या मनांत हर्षाच्या उकळ्या फुटल्या आणि खुषींत येऊन त्यानें खिशांतून पानाची चवड व सुपारी काढून सुंद्रापुढें ठेवली व मानकरी आण्णा उठला. तिनें ती पान—सुपारी मानाची म्हणून घेतली—आणि पालांत देवापुढें ठेवण्यासाठीं इंद्राच्या हातीं दिली.

" ठीक हाय ! मी वाट बघतोंय् ! " असें बोलून मानकरी आण्णानें वाटेकडे पाय वळवले आणि मान फिरवून पुन्हां एकदां इंद्राच्याभोंवतीं नजरेचे तिढे टाकले.

....ओढ्यावरून आडवाच घोडे घेऊन सोनबा आला. पालापुढें उभ्या असलेल्या मानकरी आण्णाला चटकन् ओळखून त्यांच्यापुढें धांवला. खालीं वाकून नमस्कार घातला व म्हणाला,

" येरवाळीच मालकाचं पाय गरीबाच्या पालाला लागलं ? "

सोनाला नीट बघून, खांद्यावरचें धोतर सरळ करून मानकरी आण्णानें विचारलें,

" हं ! कसं काय सोनबा ! ठकल्यावानी दिसतोस ! "

त्याबरोबर लाचारीपणाचें हास्य तोंडावर आणून सोनबा हात जोडून उभा राहिला व म्हणाला,

" मालक ! माणूस दिवसानं दिवस ठकतं. त्यांत मग आमा गरीबाचं काय !—पण तुमी मात्र बघतुं तसंच हाय ! "

आणि आण्णाला सोनबाच्या बोलण्यानें अधिक हुशारी आली व मोठ्या तोऱ्यांत बोलला,

" अरं, तेला चांगलं चांगलं खावं लागतं, तवा अंगांत नव रगात येतं !"

" खरं हाय मालक ! " असें बोलून एकदम सुंद्राकडे पाहून म्हणाला,

" अग, ती इंद्रा कुठाय ! मालकांचं दर्शन घे म्हणावं तिला. ते आपल्या दारांत आल्यात ! "

—आणि त्या लोभी म्हाताऱ्याचा शब्द ऐकतांच पालांत बसलेल्या इंद्रानं मागें तोंड फिरवलें व खालीं बघूं लागली. तिला पाहून सोनबा म्हणाला,

" मालक ! पोरगी तुमाला लाजतीया ! नव हाय तंवर असंच ! एकदां दाट वळख झाली का आपल्या मनानं जेचं तें माणूस वळखतं ! "

सोनबाचे हे लाचारी, लोभस बोल ऐकून, मानकरी आण्णाची छाती अधिकच ताठ झाली; तो डाव्या हातानें मिशा पिळूं लागला व बोलला,

" मी जातों आतां. वाड्यावर येऊन काय पोटाला लागेल तें घेऊन या." असें आपल्या बोलाचें माप सोनबाच्या पदरांत टाकून आण्णानें पुढें पाऊल टाकलें.

त्याच्या बोलानें आपल्या शिरावर उपकाराचा मोठा बोजा पडला, असें भासवून सोनबा तसाच खालीं मान घालून कुत्र्यासारखा लाडावून मानकरी आण्णाच्या पुढें चालूं लागला. ते त्याच्या मागें निघाले. ते सडकेला लागले.

* *

भुजलेली पिवळी जर्द नागीन बिळांतून बाहेर यावी तशीच इंद्रा पाला-च्या बाहेर मोकळेपणानीं आली. आपल्या काळेनीळ ओल्या केसाचा संभार उन्हांत उडवूं लागली. त्याबरोबर तिच्या अंगावरचें सौंदर्य फडफडूं लागलें....

प्रत्येक पालापुढें धोतर-लुगडीं वाळत होतीं. बाया न्हावून आपले केस वाळवीत उन्हाला पाठ देऊन बसल्या होत्या. ओढ्याच्या धारेत आंघोळ करुन गडी आले होते, कुणी आपल्या पालापुढें बसले होते तर कुणी झाडाकडे वळले होते.

देवाला नवसाची बकरी, कोंबडीं पडलीं होतीं....

पालापुढें चुली चांगल्या पेटल्या होत्या. त्यावर तवे तापत होते. त्यांत चपात्या तळत होत्या. कुठें कुठें चुलीवर कोंबड्या बकऱ्याची सागुती शिजत होती. त्याच्या वासानें तोंडाला पाणी सुटत होतें. लहान लहान मुलें खमंग वासानें चुलीभोंवतीं घुटमळलीं होतीं.

दुपार झाली....

'निवद नारळांची' तयारी झाली. देवदेव करावयास खंडोबाला निघण्याची घाई चालली. इंद्रा टेवणीचें टोपपदरी इरकली लुगडें नेसली. इंद्रा आस्मानी रंगाचें पातळ व जरी-तारी चोळी ल्याली. तिच्या कांतीला पातळ खुलून दिसूं लागलें. बाकी पालावरच्या गडीबायांची घाई झाली. कुणीं घडीचे कपडे अंगावर घातले. कुणीं धुतलेलें घडूत ल्यालें.

लहान मुलें नव्या अंगड्याटोपड्यांनीं नटलीं होतीं. 'निवद-नारळांनीं' ताटें भरलीं. ताटांत दिवे पेटले. ती घेऊन बाया निघाल्या. गडी पुढें चालले. तरण्या मुली हांसत खिदळत निघाल्या. सगळा ताफा खंडोबाच्या वाटेला लागला.

देवापुढें आज इंद्राचा कौल लागणार. चार वर्षांनीं धाकटी गजरा तिच्या पाठोपाठ येणार, त्यांच्या जिवावर पोटापाण्याचा प्रश्न सुटणार, म्हणून त्यांचे आईबाप त्यांना पाहून अधिकच सुखावत होते. त्यांच्यापुढची चिंता दूर होत होती.

सगळा ताफा देवाच्या आवारांत आला. जयमल्हार...खंडोबाचा गजर चालला. भंडारा उधळला. सगळं आवार त्यानं भरुन गेलें.

देवापुढें नारळ फुटले. नारळाच्या पाण्याचा सडा सगळ्या अंगणांत झाला. बायांनीं भक्तिभावानें देवपूजा केली. गड्यांनीं देवदर्शन घेतलें. देवाच्या आवारांत सगळा बाया-पोराचा गलगा झाला. भंडारा उधळला जात होता. उद्-कापराचा घमघमाट सुटला होता. भंडाऱ्याच्या धुराळ्यांत धूर मिसळला. त्यांत तरण्या मुली पार बुडून गेल्या होत्या.

—आणि त्याच दाट धुरांत इंद्रा व गुणवंत मास्तर यांचीं तोंडं देवापुढच्या समईच्या उजेडांत उठून दिसलीं. दोघांचे हात देवापुढें जुळलेले दिसत होते....

इंद्राचा कौल लागण्याची वेळ झाली. घोळक्यांत तिला धुंडाळण्यासाठीं सुंद्राची नजर भिरभिरूं लागली. तिनें इंद्राला हाताला धरून पुढें आणली. तिच्या कपाळावर भंडाऱ्याचा मळवट भरला. भांगांत भंडारा सोडला. तिला भक्ति-भावनेनें देवापुढें बसविली. सुंद्रा व सोनबानें मिळून कौल लावला. इंद्रावर देवाच्या अक्षता टाकल्या. देवाच्या दारचें पाणी अंगावर टाकलें आणि भरल्या मनानें सुंद्रानें देवापुढें लोटांगण घेतलें व बोलली,

"देवा! माजी लेक तुझ्या दारांत सोडली. तुजी आमच्यावर सावली असूं दे. पोटपाणी चांगलें पिकूं दे!"

असें बोलून तिनें इंद्राला जवळ पोटाशीं धरलें व तिला मायेनें कुरवाळूं लागली तिचा लालबुंद चेहरा आशाळभूतपणें न्याहाळूं लागली. पोटीं चांगला मिळवता मुलगाच आला, म्हणून ती तिच्या पाठीवरून लाडानें हात फिरवूं लागली. त्याबरोबर तिच्या आशा अधिकच उजळूं लागल्या—

वयांत आलेल्या बाकी मुलींचे देवापुढें कौल लागले व त्यांच्याहि आई-बापांच्या तोंडाला पाणी सुटलें—

सालाचा देव-देव झाला! मुलींचे कौल लागले. देवाच्या आवारांत सगळे शांतपणें विसांवले—

इंद्रा गप्पगार बसली होती. उमललेलें फूल सुकावें असे भाव तिच्या मुखावर दाटून आले होते. तिच्या हांसऱ्या चेहऱ्यावर भंडाऱ्याच्या मळवटानें गंभीर छटा उमटल्या होत्या.

मास्तर खांबाला टेकून तटस्थ नजरेनें देवाच्या पुढच्या जळत्या ज्योतीकडे पहात होता. मधूनच इंद्राकडेहि डोळ्यांचीं बुबळें फिरवीत होता. तिच्या कपाळावरील मळवट नजरेनें उडवीत होता.

सावल्या चांगल्या उतरेपर्यंत सगळेच ते देवाच्या दारीं थांबले आणि सावकाशपणें पालाकडे निघण्यासाठीं उठले. देवाच्या आवारांतून निघतां निघतां पुन्हां देवापुढें त्यांचे हात जुळले आणि मनांतले मनांत देवाला बोल कबूल करून निघाले. पालाच्या वाटेला लागले--

रात्र झाली. चंद्र उगवून वर आला. शुभ्र चांदण्यांत पालं बुडालीं....

रात्र बरीच झाली. सगळें गांव झोंपलें आणि मानकरी आण्णाच्या वाड्यांत सुंद्राची संगीत बारी उभी राहिली....

चंद्रकोर उगवावी तशी बत्तीच्या उजेडांत इंद्रा पुढें आली. मास्तरनें पेटीचे गोड सूर बाहेर उधळले. सोनबानें तबल्याचा ठेका धरला आणि त्याच्या तालावर इंद्राच्या पायांतले चाळ झणकारले. सुंद्रा व धाकटी गजरा यांनीं मागें साथ धरली—आणि शांत वातावरणांत मधुर लहरी दाटल्या.

इंद्रानें आपला गोड गळा मोकळा सोडला. गाण्याची ललकारी मारली....

नको सख्या ! भिजलें मी भारी !
सोड सख्या ! भिजलें मी सारी !

या गाण्याच्या मधुर लहरी सगळ्या वातावरणांत उधळल्या. सगळी उघडी पोकळी संगीतानें भरून गेली.

इंद्राच्या गोड गळ्यावर आण्णा लुब्ध झाला. गाण्याच्या गोड स्पर्शानें त्यांच्या अंगांतल्या ठिणग्या उसळल्या. बाकी बैठकींतले जोडीदार संगीतानें भारून गेले व तालावर डोलूं लागले. गाण्याला भलताच रंग भरला आणि इंद्राच्या अंगावर पैसे नोटा उधळल्या गेल्या...

निम्मी रात्र सरली. पहिल्या कोंबड्यानें बाग दिली.

आणि बारी बंद झाली. मानकरी आण्णानें इंद्राला मानाची साडी-चोळी नेसविली. मानाचा सव्वा रुपाया व पानाचा विडा तिच्या हातांत दिला. बैठक संपली. लोक उठले. आपापल्या घरीं निघाले...

सुंद्रा एकटीच मागें मानकरी आण्णाशीं चार गोष्टी बोलायच्या म्हणून थांबली व बाकी इंद्रा, मास्तर असे सगळे वाड्याच्या बाहेर पडले.

सुंद्रा व आण्णाच्या कानगोष्टी झाल्या....सुंद्राला पटल्या...आणि आण्णा अधिकच सुखावले....आणि लागलीच सुंद्रा वाड्याच्या बाहेर पडली.

दुसऱ्या दिवशींच सुंद्रा इंद्राला घेऊन मानकरी आण्णाच्या वाड्यांत आली... पुढें रोजच येऊं लागली....इंद्राच्या अंगावर नवी नवी साडी दिसूं लागली. तिच्या अंगावर नवे डाग चढूं लागले आणि त्याचबरोबर तिच्या अंगावर वेगळीच कांति येऊं लागली....

दिवसांमागें दिवस गेले. चार महिने उलटले. इंद्राच्या अंगांत जडपणा आला. गातांना तिला दम लागूं लागला. बारींत उभी राहिल्यावर तिच्या अंगांतली चपलता ओसरल्याचें जाणवूं लागलें....आणि तें सगळें उमजून तिच्या आईच्या मनांत धस्स झालें....पोरगी कांहीं न बोलतां गप्प बसली. आणि बघत बघत अंगावर दिवस काढले....या गोष्टीनें सुंद्राच्या मनाला जबर धक्का बसला....पुढच्या काळजीनें ती सारखी झुरणीला लागली. दाल्ल्याबरोबर कानगोष्टी करू लागली....पुन्हां पुन्हां विचार करूं लागली. यांतून वाट काढूं लागली. शेवटीं नवरा-बायकोचा विचार झाला...सुंद्रानें मार्ग काढला....

आणि इंद्राला बाजूला घेऊन हलकेंच बोलली,

"कुणाचं गं हे?"

उतरलेल्या चेहऱ्याची इंद्रा फाडकन् बोलली,

"तुज्या त्या जेजुरीच्या मानकरी मालकाचं।"

धाबऱ्या घाबऱ्या सुंद्रा पुन्हां म्हणाली,

"मला बोलायचा अगुदरंच!"

इंद्रा आवाज चढवून फणकाऱ्यांत बोलली,

"त्यांत काय बोलायचं, हाय तें खरं! राहिल तेच्या नांवावर!"

इंद्राच्या या निश्चयी बोलण्यानें सुंद्राला घाम आला...आणि तिच्या मनांतला बेत मनांतच कोलमडला. तिला वाटलें अजून चार-सहा वर्षं खेळा-वयाचं. बारी गाजवायची. बैठकींतलीं माणसं लुटावयाची. मिळकत करावयाची.

चांगलं घरदार करून राहायचं. या सगळ्या इंद्राच्या जवानीवर केलेल्या आशा-आकांक्षांवर पोरीनें पाणी पाडलें आणि उलट भावकींतून उठण्याची पाळी आली. सुंद्रा विचारानें अधिकच चितागती झाली. आणि पुन्हां सावरून इंद्राला म्हणाली,

" इंद्रा माझं ऐक ! तूं यांतनं आमचा गळा सोडव न् मोकळी हो ! "

आईचा सल्ला ऐकला आणि इंद्राच्या अंगावर भीतीचा कांटा उभा राहिला. तिचें अंग थरारलें आणि तीं पुन्हां ठामपणानें बोलली,

" मी दवा घेणार न्हाय, अन् मोकळी होणार न्हाय ! "

असें बोलून ती तोंड फिरवून बसली. आणि त्याबरोबर सुंद्राच्या मनांतील विचार ढांसळला तरी ती धीर धरून पुन्हां बोलली,

" अगं इंद्रा ! आपल्या भावकींत असं हें चालत न्हाय ! "

" पण ही करणी आयबाचीच कीं ! "

" पोरी ! अगं, आमाला कळतं ! म्हणूनशान् आमी त्यावर ' उतारा ' देतुं ! "

" पण मला तुमचा उतारा नकुं.... ! त्या परास हाय तेंच खरं... ! "

—आणि इंद्राच्या या घट्ट विचारानें सुंद्रा पार गडगडली तिच्या मनांतील फुलत्या आशा पार करपून गेल्या. तिचा चेहरा काळवंडला. पडला. घशाला कोरड पडली. पुढें शब्द उमटेना. तिचें मन तिला खाऊ लागलें.... बसली भुई पायाखालीं हादरूं लागली....पोरीनं घात केला. कुळीला बट्टा लावला. भावकींतून तोंड काळें करण्याची पाळी आणली...त्यानें तिचें काळीज करपून गेलें. ती कपाळ बडवून घेऊं लागली....तिच्या डोळ्यांपुढें सगळी अंधारी आली....

हां हां म्हणतां दिवस गेले. नवें साल आलें....

दसरा जवळ आला....

दसरा गांठून जेजुरीला कोल्हाट्यांचीं पालं उतरलीं. देव देव करावयाला. जवान पोरींचा देवापुढें कौल लावावयाला. सुंद्रा मायणीकरणीचें पाल आलें. पालांत पाल उतरलं.

उद्यां दसरा...पण आजच भावकीची बैठक झाडाच्या सावलीला बसली. बैटकीला कर्ते गडी जमले. सोनबा आला. कळल्या बाया आल्या. त्यांत सुंद्रा बसली. इंद्राला भावकीपुढें बोलावणें झालें. मंद मंद पावलें टाकीत, आपल्या तान्ह्या लेकराला पोटशीं घेऊन आली. तिला पाहून बोलते गडी गप्प झाले. बाया एकमेकींच्या कानीं लागल्या.

——आणि त्या शांत वातावरणांत कोल्हाट्याचा जात-पंच सोनबाकडं तोंड करून हलक्या आवाजांत बोलला,

" सोनबा.... "

त्याबरोबर सोनबा जागींच हालला व नीट बसून बोलला,

" हाय कीं मी...काय भावकीचा बोल हाय ते बोला....? "

" अरं, त्यांत काय बोलायचं राहीलंय....तुज्या पोरीनं हें काय वाढवलं.? "

त्यावर सोनबा गप्प झाला. खालीं बघत उगीचच काटकीनं जमीन टोकरूं लागला.

पुन्हां पंच आवाज चढवून बोलला.

" कुठाय ती सुंद्रा ? चुरुचुरु बोलणारी, आतां कां गप्प ? पोरीच्या या कर्तुकीचा जाब द्या भावकीला ! "

सुंद्राला भावकीचा कडक कायदा माहीत होता. भावकीपुढें तोंड उघडायला तिला आतां जागा नव्हती. म्हणून तीहि गप्प झाली होती.

दटावण्याच्या सुरात पंच पुढें बोलला,

अरं गप्प का ? बोला कीं ? तुमच्या पोरीनं भावकींत उलटा पायंडा पाडला. तुमी तिचं आय-बा ! न्हाय का पहिलीच काळजी घियाची ! "

त्यावर सोनबानें मान वर केली व पडत्या आवाजांत बोलला,

" खरं हाय ! आमी करायचा तो बेत केला, पण पोरगीच हाटवादी ! "

पुन्हां भावकीचे व इंद्राच्या आय-बाचे सवाल जबाब झाले...बोलांचा गलगा झाला. पुन्हां सगळें शांत झालें. भावकीचे गडी आपआपसांत कुजबुजले....एकमेकाला हालकें हालकें बोलूं लागले....कुणी पंचाचे कानीं लागले.

—आणि शेवटीं भावकीचा निर्णय पंचानें इंद्राच्या आईबापांपुढें ठेवला....

" तुमच्या पोरीनं जातीला बट्टा लावला, त्यापाय तुमाला भावकींतून वाळींत टाकलंय ! "

भावकीचा निर्णय ऐकतांच सोनबा एकदम जागा झाला व भावकीला हात जोडून बोलला,

" आमाला कां वाळींत ? "

' तुमी पोरीचं आय-बा. तुमी तिला संबाळतां. ती तुमच्याजवळ राहती !

त्यावर भावकींत वागलेला सोनबा लागलीच बोलला,

" आमी पोरीला सोडूं पण भावकी सोडणार न्हाय...! आमाला भावकींत जगायचं हाय. भावकींतच मरायचं हाय. "

सोनबाचें उत्तर सरळ होतें. आणि भावकीला पाहिजे तें मिळालें होतें. सोनबाचा सरळ बोल भावकीपुढें आला. तो भावकीला पटला. बैठक संपली. भावकी उठली.

...सोनबा व सुंद्रा मंद मंद पावलें टाकीत निघाले व पालांत येऊन गप्प गप्प पडले, इंद्रा उठली, जड पावलांनीं पालाकडे निघाली. गुणवंत मास्तर उठला व तिच्या मागें खालीं मान घालून निघाला....

दसरा उजाडला.....

दिवस उगवायला. इंद्रा पालांतून बाहेर पडली...डोईवर लुगडं-चोळीचं बोचकं घेतलें. पोटाशीं मूल घेतलें...वाटेला लागली.

आणि तिच्या नेत्रावाटें आसवांची धार लागली....

गुणवंत मास्तर पालांतून बाहेर पडला आणि मंद पावलें टाकी' तिच्या मागोमाग निघाला.

लांब....लांब...वाटेला लागलेल्या इंद्राला पाहून सोनबा व सुंद्रा आपले अश्रु पुसत होते.

—आणि धाकट्या गजराला कुरवाळीत, खोल आवाजांत सुंद्रा बोलली,

" पोरी ! आतां तूंच आमच्या जिवाचा आधार ! "

इंद्रा वाटेला लागली....मास्तर बरोबर निघाला....आणि कटनाला लागल्यावर मास्तरनें तिच्या अवघडलेल्या हातांतून तान्ह्या लेकराचा बोजा घेतला....व दोघं पुढें चालले.

# नंदीवाला

बनेगांवाला सुगी भरांत आली. शिवारांत, रानोमाळ पाखरांच्या कळपासारखें माणूस तरंगूं लागलें. सुगीच्या ऐन घाईटींत नंदीवाल्याचीं पालें गांवच्या मावळतीला ओढ्याकांठीं माळावर उतरलीं.

माळरान तसें उगडें बोडकें असलें, तरी ओढ्याकाटचीं झाडें-झुडपें व पाण्याची धार मागतकऱ्या माणसांना, जनावरांना आधार होतीं.

दिवस उगवला. कोंवळ्या उन्हांत वाटेचीं झाडें-झुडपें न्हावून निघालीं. तीं टवटवीत, तांबूस-पिवळीं दिसूं लागलीं. भयीर–ससाण्याची फेरी झपाट्यानें आली, पिंपरणीचे झाडांत घुसली. चिमण्या-पांखरांचा अधिकच कलकलाट झाला. अन् त्या भुर्कन् उडून गेल्या.

—आणि मन्यापा नंदीवाल्याचे डोळे त्या भयीर ससाण्याचा पाठलाग करूं लागले........

अंगावर ऊन लागलें. अंगांत उबारा आला. आणि लेकुरवाळी कोंबडी आपल्या इवल्याशा पिलांना घेऊन पालाच्या पुढं आलि. माती उकरूं लागली व पिलाना किडा मुंगी वेचून घालूं लागली. इतर कोंबडयाहि पालाच्या आजूबाजूला हिंडूं लागल्या. कणा दाणा टिपूं लागल्या. उकराउकरी करूं लागल्या.

नंदीवाल्याचीं कुत्रीं वास घेत घेत ओढयाकांठच्या जाळी–झुडपांत घुसूं लागलीं. कांहीं आरवाळ कुत्रीं बारीक नजरेनें हेरलेल्या खारोटया, पांखरांवर चाल करून चारी दिशेला धावूं लागलीं; पाय मोकळे करूं लागलीं.

नंदीवाल्याचें कळतें पोर सरसर सरडागत ओढयाकांठच्या उंबराच्या झाडावर चढलं. आणि पिकलीं उंबरं, आंतलीं चिलटं न पहातांच कचाकच खावू

लागलं. बारकी गोटीसारखीं मुलं, उगीचच झाडाच्या बुडक्यांत झटया घेऊं लागलीं. वर तोंड करून ओरडूं लागलीं. त्यावर उंच आगराळी बारीक फाटयाला खारोटीप्रमाणं चिकटलेलं पोर लालभडक उंबरं बदाबद खालीं टाकूं लागलं. तीं पाहून लहान मुलं हारकून टम झालीं. गबागबा खाऊं लागलीं.

झाडावरच्या पोरानं फाटा हालीवला अन् झाडाखालीं उंबरांचे अंथरूण झालं आणि लहान मुलं आनंदानें उड्या मारूं लागली, गलगा करूं लागलीं. उंबराच्या बारीक बारीक दोड्याचे घोस तोडून ते खालीं टाकूं लागलें. त्याची कोरड्यास भाजी करण्यासाठीं पोरं तीं जमा करूं लागलीं.

कुत्रीं रानोमाळ उधळत होतीं. लहान पोरें साळुंक्या होल्यांवर दगडं फेकूं लागलीं. दगडाच्या दिशेनं कुत्रीं धावूं लागलीं. बेरकी कुलंगी कुत्रीं वास घेत, हुंगत शिकार हेरूं लागलीं.

...तेवढ्यांत पालावर खैरी कोंबडी फडाडली, केकाटली. कड्फड् पळाली. कोंऽकोंऽ आवाज करूं लागली. पुढंच मातींत टोचा हाणींत चरण्यांत गुंग झालेल्या कोंबड्यांच्या माना वर झाल्या. त्या बावरलेल्या नजरेनं माना वर-खालीं तणावूं लागल्या. माना उंचावत दमादमानें पाय उचलून टाकीत कोंऽकों आवाज पुन्हा पुन्हां करूं लागल्या.

कोंबड्यांच्या आवाजानं व्यालेली कुत्रीं जागावली व पालांतून भुंकत झपाट्यानें त्या नवख्या माणसाच्या अंगावर पडली. त्यांतला एक गडी जोरांत पळत सुटला...त्याबरोबर ओढ्याकांठचीं कुत्रीं नेटांत, वाऱ्यासारखीं धांवत आलीं आणि त्या माणसावर तुटून पडलीं. त्यांनीं त्याला पुरा एर-गटला. तो माणूस घाबरून गेला. त्याला वाटलं, " आतां हीं कुत्रीं आपल्याला फाडून खाणार ! " म्हणून तो ओरडूं लागला. हातपाय झाडूं लागला. त्यांत त्याच्या धोतराच्या टिरकान्या झाल्या. पैरण पुढं-मागं धनपसल्यासारखी झाली.

...तोंच पालांतून मऱ्यापा नंदीवाला काठी घेऊन त्या माणसावर धांवला. उंबरावरच्या पोरानं धाडकन खालीं उडी घेतली. हातांत काठी घेऊनच त्या माणसाकडे ते पळत आले. तो नवा माणूस कुत्र्याच्या तावडींतून सुटला; नंदीवाला घांव घालील का काय या भीतीनें बाजूला पळत गेला. त्याचा जोडीदारहि झुडपाआडून पुन्हां जवळ आला. कुत्र्यांनीं भुंकून कालवा केला,

आरडा-ओरड झाली. आजूबाजूचीं वाटचीं माणसं. नंदीवाल्याच्या पालावर आलीं. त्यांचा घोळका झाला.

त्यांत संदिपान पाटील एकदम बोलला,

"का रं शिरप्या बेरडा, या गरीबांच्या कां वाटंला गेला?" कुत्र्यांनीं तंगड्यांत तोडल्यामुळं शिरप्या बेरड पुरा बेजार झाला होता. त्याचा जोडीदार नान्या बेरडहि हातांत काठी घेऊन जवळ आला. त्या गोष्टीचा शिरप्याला धीर आला. जरा दम खावून रागानं खाकरत गुरकत बोलला,

"लेका! गांवांत येऊन भीक मागतुयास ते मागतुयास अन् निस्कारणी आमच्या अंगावर कुत्रीं सोडतुयाच! तुझीं कुत्रीं सोड, पण तूं इसरलास आमाला! आमची बेरडाची आवलाद...!"

तोंच नंदीवाला संदिपान पाटलाकडे बघून व कुत्र्याकडे हात करून म्हणाला,

"पाटील! हीं कुत्रीं माणसाचं गुण बघून, अंगावर धांवतील त्याला फाडतील. पन विन गुन्ह्याची साधी गुरगुर करणार नाहींत!"

"तुझी भिकाऱ्याची आवलाद! अन् मला रं काय तुज्या पालांत घावायचं? शिरप्या बेरड नंदीवाल्याच्या अंगावर तावदारून बोलला.

तेवढ्यांत नंदीवाल्याचें दहा वर्षांचें उघडें-बोडकें पोरगें पुढें येऊन म्हणालें,

"बा, यानें कोंबडीकडं बोट दावलं! अन् ह्यो बोलतोय् तेनं गलोलीच्या खड्याचा फटका मारला. कोंबडीला खडा वर्मी लागला. कोंबडी फडाडली, ओरडली. तवां माझीं कुत्रीं अंगावर धावलीं."

एवढ्यांत नंदीवाला पाटलाला म्हणाला,

"पाटील! तुम्ही आम-पांढरीचं धनी! तुम्हीच ऐका काय पोरगं म्हणतं तें!"

"हेनं कां माझ्यावर टप धरला"

शिरप्या बेरडानें फाटलेल्या धोतराला गांठी मारून, पुन्हां गुर्मीतच भाषा केली. तो अंगावर धांवला; त्याबरोबर नंदीवाला आणि त्याचीं पोरेंहि त्या बेरडाच्या अंगावर धावलीं. आतां मारामारी चांगलीच होणार तेवढ्यांत पाटील ओरडला,

"लेकांनो; काय माणसं हाय का जनावरं ? माझ्या देखत माज चढल्यागत करताय् !"

"पाटील, आता तुमचं ऐकायचं ! तुम्हांला माहीत, आमची जात बेरडाची ! डाव धरून कांटा काढील.... !"

"पाटील ! आमी गरीब ! तुमच्या नांवावर गांवाला येतो. गांवोगांव पोटाला मागून खातो ! आज हितं तर उद्यां दुसरीकडं !"

"म्हणून आमच्या अंगावर व्या दुपारा कुत्रीं सोडलीस ! बरं लेका.... !"

तेवढ्यांत पाटील ओरडून बेरडाच्या अंगावर गेला. म्हणाला,

"त्या गरिबाच्या का तोंडीं लागतोस ? पोट भरायला ते गांवीं येतं ! लाग बरं तूं वाटंला !"

शिरप्या व नान्या बेरडानं पाटलाच्या बोलाला मान दिला अन पाटलावर घारीच्या नजरेनं पाहिलं. नंदीवाल्यावर इंगळीगत डोळे वटारून वाटेला लागले....ते मागें पुढें बघत ओब्यानं खालीं उतरले.

भांडण मिटलं. कुत्र्याचा कालवा गप्प झाला. नंदीवाल्या बाया पोरांचा कलकलाट थंड झाला. कोंबडी निवांतपणें माती उकरूं लागल्या. कण कण वेचीत हिंडूं लागल्या. नंदीवाल्यानें आपल्या झिपऱ्या नीट बांधल्या. डोइला पटका कसा बसा आळपला. शेपटी हालवीत अंगावर वाला मारीत असलेल्या कुत्र्याच्या अंगावर मायेनं हात फिरवत, पाटलापुढं तंबाकूसाठीं हात केला.

बेरडांचीं तीं तरणीबांड पोरं लांब गेल्याचं पाहून पाटील नंदीवाल्याला म्हणाला,

"लेकांनो ! बरं सावध होता ! न्हायतर ती बेरडाची आवलाद ! तुझ्या कोंबडीचं त्यांनीं आज कोरड्यास केलं होतं बग !"

एकदम नंदीवाला त्याच्या कुत्र्याकडे हात दाखवून म्हणाला,

"काय तुमी बोलता पाटील ! माझ्या या कुत्र्यांनीं मारूनी फाडून खाल्लं असतं !"

"अरं ही डाकं टाकणारी बेरडाची आवलाद ! तुझ्या कोंबडीची काय-कथा ! त्यांनीं हिसकावून जबरीनं पळवली असती !"

" पाटील ! आमची नंदीवाल्यांची जात ! एकदां बिघडलं तर रानांत धोरपड ठेंचून मारतों, तसं दगड-काठीनं त्यांना ठेचलं असतं. पण माजी पडली एका पायाची कावड ! बारीक पोरं खाणार ! कशाला कुणाच्या नादी लागूं ? आला दिवस घालवायचा ! "

पाटील पुढें आला; तिथं जवळच काळसर रंगाची, रापलेल्या चेहेऱ्याची बाई लहान मुलाला पाजीत बसली होती. पाटलाला बघून मुलाचे अंगावर तिनं पदर टाकला. फाटक्या पदरांतून मुलाचा हात बाहेर निघाला. वाळक्या झिंज्यांत डाव्या हाताचीं बोटें चाळवीत ती खडमडीत शब्दांत बडबडत होती. उघडें पोर भाकरीचा तुकडा चघळत आईच्या पाठीला बिलगलें होतें.

पालांत वाकळा-बोतराच्या बाजूला बांडी कुत्री आपल्या मुठीएवढ्या पिलांना पाजीत होती. पाटलाला बघून गुरगुरत होती व अंगावर फिरून बसणाऱ्या त्या माशावर लचका मारीत होती.

पाटलानं नंदीवाल्याच्या हातांत तंबाकू सोडून म्हटलें,

" अरं मऱ्यापा, तूं एकटा गडी अन् काय रं ह्यो तुझा संसार ! "

नंदीवाल्यानं दाढेखाली तंबाकू सोडली व पालाच्या पुढेंच दोन पावलं तो गेला. तिथंच टेकत म्हणाला,

" पाटील ! पुसलं म्हणून बोलतों. हा बघा गरिबाचा मोडका संसार ! " असें म्हणून त्यानें गोधड्या, गिलटाची भांडीं , कोंबड्याची डालगी, पक्षी पकडायचा फांसा व वाकळेखालचे लहान ढोलगें दाखवलें व पालापुढच्या खुज्या बैलाकडे हात दाखवून तो म्हणाला,

" हा नंदी ! याच्यावर सगळं माजं पोट ! या दोन सड्या गाई ! सगळा संसार या जनावराच्या पाठीवर बसतो.

नंदीवाला पालाच्या पाठीमागें मावळतीला आला व सात-आठ पांढऱ्या पताकाकडे पाहून त्यानें हात जोडले व म्हणाला,

" पाटील ! असल्या राना-वनांत, भूताखेतांत या माताआईच्या सांवलींत तेंच्या आशीर्वादानें ही माझी एवढी पोरं सुखी हायेत. "

तेवढ्यांत मऱ्यापा पोराकडे बघून ओरडला, आणि कळत्यां पोरांनीं जनावरांचीं पेंडीं फोडलीं व ओढ्याकडे नेली. त्यांच्यामागें कुत्रीं पळालीं. लहान

मूल झोंपलें व मन्यापाचें बायकोनें त्या तीन धोंड्यांच्या चुलींत चिपाडं-रानशेण्या घालून धुरांत डोकें खुपसून ती फुंकूं लागली.

नंदीवाल्याच्या देवदेवतांच्या पताकाकडे पाटील बघत राहिला व मनांत म्हणाला.

" बायली, जात थंडीवाऱ्यांत एवढं पोरांचं लेंढार घेऊन वावरती पण बिनघोर ! ही सगळी यांच्या देवाची करणी ! आपण तरी तेला मनांतली गोष्ट विचारावी. "

" मन्याप्पा तुला एक गोष्ट इचारूं का ? "

" इचारा कीं ! "

" तुला देवपणाची माहिती हाय म्हणत्याती ! "

" पाटील या माता-आईच्या नांवानं मी ताईत भरून देतुं ! त्याचा माणसांना गुण येतो ! " असें म्हणून त्यानं देवीच्या पताकाला हात जोडले.

पाटलानें मनांतली गोष्ट काढली व तो गहिंवरून म्हणाला,

" हें बघ ! घरांत पोरगंच जगत न्हाय ! तेच्यावर तुज्या देवांचा कौल घे ! तुज्या देवाचा खाना-दाना देईन ! "

" पाटील ! माझ्या या माता-आईच्या दारांत बकऱ्याचं रगांत शिंपड ! त्यांची शांति कर ! तुला देवीचा अंगारा भरून ताईत देतों ! तुझ्या मालकिणीच्या दंडांत बांद. माझ्यावानी तुझ्या दारांत लेकरा-बाळांचा कालवा वाढील. "

पाटील पहिलाच घर-प्रपंच्याच्या अडचणींत घावलेला. लागलीच मन्यापाच्या बोलावर त्याचा विश्वास बसला आणि तो म्हणाला,

" बोल मन्यापा, कवा येऊं."

" ये, पण आंघोळ करून ये ! तेचं असं हाय, आमचं देव—ह्या काळूआय मरीआय, जोखाई, म्हासाआय तायआय, भारी कार, कडक. त्याना इटाळ चालत न्हाय ! आमाला काय रोज आंघोळ भेटत न्हाय ! तवा आमचं देव बाया-पोरांच्या इटाळापासून लांब बसलेलं असतात...मग तुम्ही कवाबी मंगळवार-शुक्रवार गाठून या "

" तुज्या बोलाप्रमाणं वागीन. पन येण्याचा नेम सांग ! "

" पाटील ! मला सुगी उगळूं द्या ! सुगीच्या नादानं मला येळेवर आंघोळ घडायची न्हाय ! तवा तुम्ही आज आठा दिसा मंगळवारीं या. "

थोडसं एकदम थांबून पुन्हां नंदीवाल्यानें पाटलाला सांगितलें,

" एक गोष्ट सांभाळ ! अन् त्या दिसी बाईचा वारा घेऊं नको ! "

तेवढ्यांत चुलीला चांगला जाळ लावून, त्यावर उंबराच्या दोड्याची भाजी ठेवली, ती रटारट उसळूं लागली...आणि मग ठणठणीत आवाजांत मऱ्याप्पाची बायको कांहींतरी बोलली. तसा मऱ्याप्पा मातीची घागर घेऊन ओढ्याला पाण्यासाठीं निघाला.

" आज आठा दिसा मंगळवारीं नेमका येरवाळीं तयारींत येतो " असें म्हणून पाटीलहि थोडा समाधानी चेहऱ्यानें हालला. गांवच्या वाटेला लागला.

हा हा म्हणतां कामा-उद्योगांत आठ दिवस गेले ! आणि पाटील नेमका येरवाळी ओढ्याच्या निर्मळ धारेंत आंघोळ करून मंगळवार गाठून आला.

....पण त्याला मऱ्यापा नंदीवाला पालावर दिसेना.

मग त्याला त्याच्या बायकोकडून समजलें,

" धनी ! तांबडं फुटायचे आंत खळीं उकळायला पालाबाहेर जातो ! अन् रात करून पालावर येतो ! "

—त्या बाईचें बोलणें बरोबर होतें ! सुगीसराईत मिळवायचे अन् पावसाळ्यांत बसून ते खायचें. ज्याचें गांवावर पोट, त्या मागतकऱ्याचें असेंच असतें !

पाटलाला नंदीवाल्याच्या बायकोचें बोलणें पटलें, आणि त्याचे पुढें मऱ्याप्पाचें रोजचें काम उभे राहिलें....

मऱ्यापा काय शिंगणापूरचा नंदीबैलवाला नव्हता. चावडीपुढं खेळ करावा अन् गांवानं त्याच्या पोटाला घालावं. हा मऱ्यापा दारोदार घरोघर फिरत असेल ! आयाबाया नंदीच्या पायावर तांब्याभर पाणी ओतीत असतील. त्याला कुंकू लावून पुजींत असतील. त्याच्या पदरांत सुपानें दाणे वाढीत नंदीला कौल लावीत असतील. नंदीबैल मान डोलवून घाट्या-घुंगरें वाजवीत उत्तरें देत असेल. त्यांत तो कोणाला ताईत भारून देत असेल, कुणाचे भुताखेताचें झिंगट काढून देत असेल—

आणि पाटील मनांत म्हणाला,

" कशाला, त्या गरीबाचे पोटाचे आडवं या ! येऊं पुढचा शुक्रवार गांठून ! "

—पण पाटलाच्या मनाला उगीचच हूरहूर वाटली अन् ताईत भारून घेण्यासाठीं, तो नेमानें सांज-सकाळ पालावर येऊं लागला.

पण नंदीवाला भेटला नाहीं. हिरमुसून तो परत गेला.

पुन्हां ठरल्याप्रमाणें पाटील पालावर आला. पण त्याला रोज दिसणारी नंदीवाल्याची बायकोहि दिसली नाहीं. पाटलाला वाटलं, सुगीचे दिवस आहेत ! नवरा बायको चार हातांनीं पोटाला मिळवत असतील.

नंदीवाल्यानें पाटलाला आशा लावली !...आपल्याला नंदीवाला भारलेला ताईत देईल. देवीच्या आशीर्वादानें आपलें पोटपाणी पिकेल. घरांत वंशवेल वाढेल आणि मांडवाला चढेल. या आशेनें पाटीलहि भारून गेला. आणि पुन्हां ठरल्या मंगळवारीं तो दिवस उगवायच्या आंत आला.

...त्याला माळ सुना दिसला....पालं दिसलीं, पण लांब फडफडणाऱ्या देवाच्या पताका एकदम कुठें गप्प झाल्या म्हणून पाटलाच्या मनांत शंका भरून आल्या. त्याला वाटलें कीं, नंदीवाल्याचा मुक्काम पुढच्या गांवाला हालणार कीं काय ?

पाटलाला पहिलेंच माहीत होतें कीं, नंदीवाल्याचीं पालें पुढच्या गांवाला निघावयाचें ठरलें, तर त्यांच्या देवतांना प्रथम मुक्कामाला नेतात, मग त्यांचीं बिऱ्हाडें गाई-बैलांवर जातात.

—म्हणून पाटील मुद्दाम त्याच दिवशीं माळावर रात्र करून आला. पण पक्षी उडून जावेत तशी पालें कधींच उठून गेलीं होतीं.

पाटील चिंतेंत पडला, आणि जवळच माळावरील जाधवाच्या वस्तीवर गेला. तेथें आन्याबा जाधवाला त्यानें पुसलें,

" आरं अन्याबा ! नंदीवाल्याचीं पाल दिसेनात ? "

" दिवस कलतांनाच गेलीं...! "

भुंकणाऱ्या कुत्र्याला ' हाड ' म्हणून त्यानें गप्प केलें आणि तो पुन्हां म्हणाला.

" पाटील ! त्या गरीबाचा बैल चोरीला गेला बगा ! रानोमाळ वनवन हिंडून तीनचार दिवस त्यानें तपास केला. अन् बैल हातीं लागेना तवा हळहळत त्यानं आपलं गाव सोडलं ! तेच्या पोटाचं साधन गेलं अन् ते आतां उघडं पडलं ! "

हें ऐकून पाटील गप्प झाला. मनांत हळहळला व उगा वर तोंड करून सहज पुटपुटला,

" बायली, नंदीवाल्या भोंवती कुणीं डाव करावा...?"

मनाशीं विचार करीतच तो एकदम मागें फिरला, वाटेला लागला. नंदीवाल्याच्या पालाच्या जागा ओलांडून पुढें चालला अन् एकदम त्याच्या मनांत शंका आली—

" च्यामारी ! त्या बेरडाच्या अवलादीनं तरी ह्यो डाव केला न्हाय ?"

पाटलाच्या मनांत आलेल्या शंकेनं जोर केला अन् पाटील तरातरा गांवांत आला. बेरडांना बोलावण्यासाठीं माणूस पाठविला—पण कोणींच मिळालं नाहीं.

पाटलानं रात्र काढली, आणि येरवाळींच तो बेरडांच्या वस्तीवर आला. पाहतो तो, दाराला पार तडक्या लागलेल्या. तेवढ्यांत घराच्या चांदईला पोराला पाजत बसलेली बाई एकाएकी उठली अन् पाटलाला पाहून, "पाया पडते," असें बोलून पुन्हां म्हणाली,

" का जी आण्णा ! येरवाळीच ?"

" अग ! शिरप्या बेरड कुठाय ?"

" करगणीच्या बाजाराला गेलं !"

" तुला का माहीत ?"

" ते माझा दाल्ला नव्हं का ?"

" कशाला ग बाजाराला गेला, शिरप्या ?"

" दारांतली शेळी इकायची हाय !"

एवढ्याच बोलावर पाटलाला खाणाखूण पटली. आणि मनांत शंका अधिकच बळावली. पाटील घरीं आला. न्याहारी केली अन् घोड्यावर खोगीर चढवून करगणीच्या बाजारला निघाला.....

शिरप्या बेरडानें नंदीवाल्याचा बैल तळेवाडीच्या गिऱ्हाईकाच्या पदरांत बांधला. आणि हातांत पैसे घेऊन नामानिराळा झाला.

शेतकऱ्यांनीं ते खुजे बैल, मोठे आरवाळी, मारके म्हणून त्याला चांगल्या नव्या कासऱ्यानें बांधला. एकानें पुढें व दुसऱ्या गड्यानें मागें कासर धरून हातांतल्या दांडक्यानें भुजवत, मोठ्या बंदोबस्तांत ते चालले.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

बाजार मागें राहिला. गांव मागें पडलें. आणि ते बैल अंगांत आल्यागत डरकाळ्या फोडूं लागले. त्यांत ते पुढच्या गड्याच्या अंगावर ठिसकारून धांवलें. जोराच्या हिसक्यानें मागच्या गड्याच्या हातांतला कासरा निसटला. बैल आतां आपल्याला शिंगावर उचलतोय् कीं काय या भीतीनें हातांतला कासरा सोडून तो बाजूला पळाला. आणि तो बैल रस्त्यांत रान-जनावरागत पळत सुटला ! ते शेतकरी गडीहि त्याच्या पाठीमागें धावूं लागले....

मळया वस्तीवर, शेत-वाडीवर, गांवोगांव नंदीवाल्यानें पायपीट केली; पण त्याचें जनावर त्याला मिळेना. शेवटीं नंदीबैलाचा त्यानें नाद सोडला.... आणि दारांतली दुसरी कालवड घेऊन तिच्यावर नंदीचा साज चढवून दारोदार खेळ करूं लागला....

तळेवाडीपासून करगणीचा बाजार जवळ. बाजार तरी उगळावा म्हणून नंदीवाला कालवडीवर नंदीचा साज चढवून निघाला. बरोबर कळत्या पोराला घेतले व बाजारच्या वाटेला लागला...

करगणीच्या खालच्या लवणांत एक बैल वाटेनें आडवा पळत येत होता. दोन माणसें मागें धावत होतीं. तीं आडव्या माणसांना मोटमोठ्यांदा हांका मारून, " बैल धरा ! बैल धरा ! ! " असें ओरडत होती. हाळीचा आवाज नंदीवाल्याच्या कानावर गेला अन् बारीक नजरेनें पुढें बघूं लागला.

तो बैल आला म्हणत उधळतच पुढें आला अन् त्याला बघून नंदी-वाल्याचें काळीज सूपाएवढें झालें. आपलाच बैल म्हणून तें कळतें पोरगें हारकून उड्या मारूं लागलें.

आणि नंदीवाल्याच्या एका बोलानं तो नंदी नंदीवाल्याजवळ येऊन थांबला. मन्यापाचें अंग चाटूं लागला. मन्यापा त्याच्या पाठीवरून मायेचा हात फिरवूं लागला. लाडांत पाठीवर थाप मारूं लागला.

तेवढ्यांत शेतकरी गडी धावतच जवळ आलें. शेवटीं बैल हातीं लागला म्हणून, त्यांच्या जीवांत जीव आला.

धापा टाकीत...! जीवघोरी उसासे टाकीत....ते शेतकरी गडी नंदी-वाल्याला येऊन भिडले, दम खाऊन एकजण बोलला,

" अरं थांब बाबा ! बरं धरलंस जनावर ! भलतं आवखळ ! त्यांत मारकी आवलाद ! दोघांना आवरेना ! "

तोच नंदीवाला हात जोडून म्हणाला,

" हे अप्पा ! हा नंदी माझा हाय ! मी नंदीवाला ! "

त्या गड्यांना वाटलें. बायली ही नंदीवाल्याची अवलाद !

आपलाच बैल म्हणील व गळंझटीला येईल. म्हणून ते पुन्हां म्हणाले,

" अरं लेका ! आमी आतां बाजारांत खरेदी केला ! अन् तूं रे कोण उपटसुंब ? "

पुन्हां नंदीवाला कळवळून बोलला,

" न्हाय ! न्हाय ! ! मालक, तुझं पाय धरतो. हा माझा नंदीबैल. चार दिस झालं चोरीला गेला होता....! "

नंदीवाला चांगलाच गळंझिटीला आला. नंदीवाल्याची अवलाद ! काय हिकमत करील अन् पेचांत टाकील म्हणून पुन्हां तो उघड बोलला,

" अरे लेका ! आतां बाजारांत हेची खरेदी-पावती झाली. त्या बने-गांवच्या बेरडानं करून दिली.... "

पण ते त्या नंदीवाल्याला कांहीं पटेना. तो गयावयां करूं लागला. पाय धरूं लागला. त्याचं पोरगं या बोलाचालींत बैल लांबवूं लागला.

आणि बोलाचालींत नंदीवाल्याची व त्या गड्यांची हिसकाहिसकी, धराधरीं चालली. शेतकरी गडी बिथरले ! नंदीवालाहि तिरमिरीवर आला. त्या गड्यांनीं नंदीवाल्याला रट्टे दिले, त्या पोराच्या हातून बैल हिसकावून घेतला. पुन्हां तो नंदीवाला बैलाला ओढूं लागला......

आतां ते शेतकरी गडी पुरे कावले. त्यांना नंदीवाल्याचा इसाळ आला, अन् रागाच्या झपाट्यांत त्यांनीं नंदीवाल्याला कुऱ्हागत झोडपला.

मारानें त्याचें डोकें फुटलें. तो विव्हळत खालीं पडला. त्याचं पोरगं ओरडूं लागलें, बोंबलूं लागलें आणि त्या बैलाला घेऊन पळूं लागलं....

ते गडी त्या पोराचे पाठीमागें दांडकं घेऊन लागलें....

बैल पालाच्या दिशेनें नेटांत उधळत सुटले.

नंदीवाल्याचें पोरगे बैलामागें वेगांत पळत निघाले.

ते गडी बैलाचा पाठलाग करीत जोरांत धावूं लागले....

# मांगगारूडी

शेवटीं हद्दपारीचा हुकूम झाला....

मांगगारुड्यांच्या वस्तींत एकदम कालवा झाला....कुत्रीं जागवलीं. बसल्या जागीं उगीचच ओरडूं लागलीं; उदासवाणा आवाज काढूं लागलीं. दारांतलीं गुरं-शेळया, कुत्र्यांच्या आवाजानें कावरीं-बावरीं झालीं आणि कान टवकारून उभीं राहिलीं.

झोपड्यापुढें गडीबाया चितागती होऊन गोळामेळ्यानें उभे राहिले. एक-मेकांशीं कानगोष्टी करूं लागले. बायापोरांचा अधिकच कलकलाट झाला नि त्यांनीं शिव्या-शापांचा सपाटा चालविला.

गांवच्या चावडीवरून धन्या मांगगारुडी काळवंडलेल्या चेहऱ्यानें खालीं मान घालून आला. त्याच्या ताठर डोळ्याच्या पापण्या खालीं उतरल्या. बोलण्यांत निबर गडी, पण हळहळला. " गव्हाबरोबर किडंबी रगडलं ! आतां आलंय कपाळाला तें भोगलं पाइजे ! "

आतां मांगगारुड्यांच्या झोपड्याचीं दारें बंद झालीं. दाराला तडक्या लागल्या. त्यांवर काट्या-बोराट्याचे फेस लागले. त्याला दगड-शिळा लावल्या गेल्या. दारांतले लहानमोठे जित्राब हालले. कुत्र्यांचा आवाज गेला. मांग-गारुड्याच्या वस्तींतला माणसाचा वारा बंद झाला. रोगाच्या साथीच्या झपा-ट्यांत सांपडावें, घरादाराला कवाडें लागावींत असेंच सगळें झालें. मांग-गारुड्याची सगळी वस्ती उठली. आपापला सगळा संसार गांठोडीं-बोचक्यांत बांधून, डोईवर घेऊन ते निघाले. दिसेल त्या मार्गानें फुटेल, त्या वाटेनें. रानोरान पक्ष्यासारखे ते निघून गेले.

धन्या मांगगारुड्याचें बिऱ्हाड गाईगाढवावर निघालें. त्याच्याबरोबर मांग-गारुड्याची दुसरी सात-आठ बिऱ्हाडें निघालीं. त्यांत लहान-मोठे पंचवीस तीस माणूस ! लेकुरवाळ्या बायांच्या पाठीशीं पोटाशीं तान्हीं मुलें धडप्यांत बांधलीं होतीं. कुणाचीं शेरडें, करडें, गाय-वासरूं होतीं. सारे वाटेला लागले होते. ते लोक सारखे चालत होते.....

तीन दिवस चालत होते...चालून चालून म्हाताऱ्या गडी-बायांचे पाय पेकळून गेले होते. कळतीं मुलें दमून गेलीं होती. तरणीं माणसें जीव धरून नेट करून चाललीं होतीं, त्यांचे चेहरे उतरले होते. त्यांच्या बोलण्यांत जडपणा आला होता. चालण्यांत मंदाई आली होती. धन्या सगळ्यांच्या पुढे होता. सगळ्यांचा भार त्याच्या शिरावर होता, त्यामुळें तो अधिकच चिंतेंत होता.

ओसाड रान, डोंगरमाळ, दगडधोंड्याची वाट मागें टाकीत, धन्या व बाकी बरोबरींचीं बिऱ्हाडें टेकडावरच्या ताई-आईच्या देवळाजवळ आले. देवळापुढच्या झाडाखालीं उतरले. उन्हातान्हांत आगराळी घारवांड, तळपत भक्ष्य बघून खालीं उतरते; तसेच धन्यानें बारीक कावळ्याच्या नजरेनें मावळतीला बघितले....

चांगला हिरवागार खोरा दिसला. जवळच तळ्या-मळ्याचें शिवार असलेलें देवगांव दिसले. ते सगळें बघून धन्याला धीर आला व दम टाकून तो म्हणाला,

" गांव जवळ आलं, दिवे-लागण झाल्यावर गांवांत वस्तीला जाऊं, न्हाय-तर तडीपार माणसं म्हणूनशान आपल्याला कोन थारा दियाचं न्हाय ! "

धन्याच्या बोलावर चित्त देऊन रकमा म्हातारीनें मिटलेले डोळे चटकन् उघडले व थरथरत्या मंद आवाजांत ती बोलली " अरं माझ्या बाबा ! तुजा बोल खरा हाय. "

सगळेच लहान-थोर मांगगारुडी लांबच्या वाटचालीनें दमलेले. ते झाडा-खालीं पडले. कुणी झाडाच्या मुळीची उशी करून कलंडले. कुणी दगडाला उसें देऊन आडवे झाले. किरकिरती तान्हीं मुलें आयांना चिटूं लागलीं. कोणी चिलमी भरल्या; चकमकी हाणून विस्तव पाडून पेटविल्या. कुणी ताई-

आयच्या आवारांतली माती कपाळाला लावलो. कळतीं मुलें देवळाच्या कट्टयावर बसलीं. धन्या चारचौघांत बसून तंबाकू चघळूं लागला. त्यांत मध्येंच तंबाकू चघळून अवसान आलेला, लालतंबर डोळ्याचा धोंड्या वाकून थूंक टाकून म्हणाला,

" आपली तडीपारीची हद्द या देवळाजवळ खलास झाली ! " धन्यानेंहि तंबाखूचें तोंड मोकळें केलें व डोईचें मुंडासें मांडीखालीं घेऊन दुःखित सुरांतच बोलला.

" गड्यांनो ! तडीपारची हद्द झाली खरी ! पण आतां कंच्या गांवांत वस्ती करायची ? "

" आता काय ! आपल्या मनचं राज ! " धोंडी गुर्मितच बोलला. त्यावर धन्या खऱ्या जाणीवनें म्हणाला,

" अरं ! आपन तडीपारचं दाखलबाज ! माणसांतनं बाहेर ! तेची तुमाला काय हाय का ? "

कर्त्यागड्यांचें आपल्या पुढच्या भवितव्याचें बोलणें चाललें होतें. आतां कुठें वस्ती करावी याचाहि खल चालला होता.

....तोवर ताई-आयच्या देवळाभोंवतीं रकमा म्हातारी फेरी मारून आली व किंचाळली...थरथर कांपूं लागली. लटलट हालूं लागली. तिच्या झिंज्या सुटल्या. ती हातवारे करीत देवीपुढे झुलूं लागली.

आणि बाकीच्यांना कळलें, रकमा म्हातारीच्या अंगांत आलें. भुईवर अंग टाकलेलें. लोक एकाएकीं काय झालें म्हणून पडल्याजागीं उठून बसले; व म्हातारीकडे धावले. म्हातारीभोंवतीं घोळका जमा झाला.

धन्यानें सगळीं माणसं बाजूला केलीं. सगळ्यांना वाटलें : बरें झालें, देवीचा आता कौल मिळेल ! आपल्या ठावठिकाणाचं काय तें कळेल !

रकमा म्हातारीच्या अंगीं देवगुण आहे. तिच्या अंगीं अशीच कधीं कधीं देवी येते. तिच्या मुखांतून चार गोष्टी सांगते. ही सगळ्या मांगगारुड्याची विश्वासाची गोष्ट. म्हणून, रकमा म्हातारीच्या अंगांत आलें, आणि सर्वांना हायसें वाटलें. सगळे शांत बसले. ताई-आईच्या दारांतली अंगारा-माती सगळ्यांनीं भाक्ति-भावानें कपाळाला लावली व हात जोडले.

धन्या पुढें झाला. रकमाच्या अंगीं देवी आली म्हणून त्यानें तिच्या पायाचें दर्शन घेतलें. पुन्हां देवळांतल्या देवीला भक्तिभावानें हात जोडले व तो म्हणाला,

" आईचा काय बोल हाय ? "

थरथर कांपत, हाताच्या मुठी वळवत ती धुंदींतच बोलली,

" तुम्ही माझ्या दारीं कां आला ? खरं खरं सांगा ! "

देवीच्या बोलानें सगळेच घाबरले. सगळ्यांनीं हात जोडले. सर्वांच्या चेहऱ्यांवर अपराधीपणाच्या वेगळ्याच छटा उमटल्या. आपण झालें तें खरें सांगावें. देवीच्या झपाट्यांतून मोकळें व्हावें. ताई-आईचा आशीर्वाद लेंकरा-बाळांना घ्यावा. तिच्या हद्दींत सुखानें राहावें, पुढची पीडा नको—अशा विचारानें त्यांचे चेहरे अपराध्यागत पडले होते.

आणि सगळे एकमुखानें एका आवाजांत बोलले, " आय ऽ ऽ ! आमच्या हातून अपराध घडलं ! आमची चूक आमच्या पदरांत घाल ! आता आमच्या लेंकरां-बाळांवर तुझी सावली असूं दे ! तुझ्या हद्दींत आमी आलुंय बघ ! "

शांतपणें देवीनें कौल दिला,

" माझ्या आवारांत राहा ! बर्साकांठीं माझी जत्रा करा ! तुमची, वेल-वस्ती वाढंल ! "

आणि पुन्हां सगळे एकमुखानें, एकआवाजांत गरजले,

" ताय-आईचं ऽऽऽ चांग भलं ऽऽ ! ताय-आईचं ऽऽऽ चांग भलं ! ! "

आपण आल्या संकटांतून मुक्त झालों, असें मांगगारुड्यांना वाटलें. या गोष्टीनें सगळ्यांचा जीव खालीं पडला. सर्वांच्या सुकलेल्या चेहऱ्यांवर त्या क्षणीं टवटवीची चमक येऊन गेली. म्हातारी रकमा धाडकन धरणीवर पडली....तिच्या अंगांत आलेली देवी गेली.

* *

या वेळीं रानांत हिंडायाला आलेलं लहान-मोठं जित्राब गांवांच्या वाटेनें निघालें होते. रानांतलें माणूस घरच्या वाटेनें चाललें... आणि गांवच्या वाटेनें लवणांतून गपकन पांढरा-फेक गडी, आप्पा भुईटे देवळाच्या मागून

आला. पुढं येऊन ताई-आईच्या दर्शनाला जाणार तोंच देवळापुढची गर्दी पाहून तो गुरगुरल्या आवाजांत बोलला, " कोण रंऽ तुमीं ? "

गांवचा कोण कर्ता गडी आहे कीं काय, हे पाहून धन्या पुढें झाला व म्हणाला,

" आमी मागगारुडी. लांबचं ! "

मांगगारुडी हें नांव ऐकतांच आप्पा मुईस्यानें पुन्हां आवाज चढवून विचारलें.

" काऽऽरं लेकांनो ! तुम्हीं माझ्या गांवावर डाका टाकायला आला कीं काय ? "

तेवढ्यांत धन्या हात जोडून म्हणाला,

" पाटील ! डाका घालायला का बाया-पोरं घेऊन येत्यात, उगच कसं बोलतां ! "

" आरं मग एवढी रात करून हितं कशाचा बेत चाललाय ? "

धन्या विचार करून पुन्हां म्हणाला,

" मालक ! आमी लांबून आलं...तीन दिवस वाट चालतोय ! "

इचार करत होतु, आमाला कोण मायबाप आसरा देईल ! तवा हितच देवीच्या आसऱ्याला रातच्यारात काढावी असं ठरलंऽ ! " " लेकांनो, तुम्हीं मांगगारुडी ! तुमचं नांव ऐकून माणूस बिचकतं ! मग एवढ्या लांबनं सगळ्या बिऱ्हाडांसकट कां आला रं ऽ तुमचं काय गाव शीव ? "

धन्यानें मनांत विचार केला. ' आज ना उद्या आपलं भांडं उघडं पडायचं ? ताकाला जाऊन मोगा कशाला दडवा ! खरं काय तें सांगावं अन् या कर्त्या गड्याच्या सल्ल्यानं पुढची वाट काढावी. तो सांगूं लागला, " तुमी या आय-पांढरीचं धनी ! तुमच्या म्होरं कशाला चोरा. मालक कसलं आमाला गांव ! कुठं आसरा मिळल तथं आमी वस्ती करणार ! तवा आमी सोलापूरच्या माळशिरस तालुक्यांत माणेगावांत राहात होतो. पण त्याचं असं झालं, गुन्हेगारांबरोबर बिनगुन्हेगार एकाच दावणीला अधिकाऱ्यानं बांधलं. अन् आमां सगळ्या मांगगारुड्यांचीं वस्तीं तडीपार केली, तेव्हां आमी हितं आलों. आता तुमीच आसरा द्या बघा ! "

आप्पा भुईटे मूळचाच टग्या माणूस. पोलिस अधिकाऱ्याजवळ वागणारा तालुक्याला कचेरींत हेलपाटे मारणारा. अनेक गुन्हेगारांना त्यानें आश्रय दिला होता. त्यांच्या कमाईत वाटणी घेतली होती. अशा माणसाला मांग-गारुडी आपल्या गांवीं आले, ही आयतीच आपल्या घरांत संपत्ति आली असें वाटलें. त्याच्या तोंडाला पाणी सुटलें. तरीपण त्यांचें मन बघण्यासाठीं म्हणाला,

" लेकांनो ! तुमाला आसरा दियाचा म्हंजीं सापाला दूध पाजल्यागत हाय कीं ! ऊब लागली कीं उलटी चाल अंगावर करणार ! "

धन्या पुन्हा कळवळून म्हणाला, " मालक ! आमच्यांत काय वंगाळ तशी चांगली बी हायत की ! आतां जनावराच्या बाजारांत हेडी-दलाली करतां करतां मी निम्मा झालों. ह्यातलीं कुणी बटईनं शेतकी करतं. कुणी म्हशी भादरतं. कुणी रोजगार करून पोट भरतं ! लबाड कशाला सांगूं ! कुणी पोटापाय चोरीबी करतं ! मण तुमी असं आमांला एका मापानं मोजूं नका ! "

आप्पा भुइटे लागलीच बोलला,

" आरं मी तुमच्यांत रंगलोय ! मला कशाला बनवतां ! " अरं म्हशी भादरायला म्हणून जाता, अन् डाका टाकायला भरलं घर हेरून ठेवतां. म्हैस भादरायला म्हणून घ्याल. अन् तीच हूल देऊन लांबवाल, अन् दलालींत काय ! गरीबाच्या गळ्यांत वांझोट जनावर बांधणार ! या तुमच्या सगळ्या वाटा मला माहीत हायत्या ! "

हें ऐकून धन्या पुन्हा कळवळ्यानें म्हणाला. " मालक ! एकच सांगतों. सागळीं बोटं सारखींच नसतात हेचाच इचार करा, अन् आमाला आसरा द्या!"

दारांत मांगगारुड्याची वस्ती म्हणजे ' इकाचं झाड ' घातलं दुसऱ्याला तर फायदा होतो, आपल्याच पोटांत गेलं तर जीव जातो. हा आप्पा भुइ-ट्याचा हिशेब होता. तो म्हणाला,

" तुमीं आजची रात हितच काढा ! मी सकाळीं येऊन काय तें सांगतों "

त्यावर धन्या बोलला,

" ठीक हाय ! "

धन्याचें व आपा भुइट्याचें बोलणें सगळ्या मांगगारुड्यांनीं ऐकलें. सगळ्यांना हायसें वाटलें. ताई आयला पुन्हा सगळ्यांनीं हात जोडले...

जवळच्या ओढ्याचें पाणी पोरांनीं आणलें. ओली-वाळली भाकरी त्यांनीं चावली. पाण्याला आधार केला. तेथेंच धरणीवर अंग टाकलें. देवीच्या आवारांत रात्र काढली.

आप्पा भुइट्यानें रात्रभर विचार केला. धनलोभी वासनेनें त्याच्या मनांत जोर केला व त्याचा विचार पक्का ठरला.

....दिवस उगवायच्या सुमारास अप्पा भुइटे देवळाजवळ आला आणि सगळ्या मांगगारुड्यांना जवळ बोलावून म्हणाला, "बघारे! कळून-वळून इकाचं ताट पुढं घेतलंय! एकच गोष्ट ध्यानांत ठेवा, अन् माझ्या शब्दा-प्रमाणं वागा!"

मग धन्या सगळ्या मांगगारुड्यांकडे तोंड करून बोलला,

"ऐकलं का, मालकाचा बोल! तेनी आपल्याला आतां पदरांत घेतलं! तेंच्या शब्दांत रगपण वागायचं!"

धन्याच्या बोलोबरोबर सगळ्यांनीं माना हालविल्या. "ठीक हाय! बराय म्हणून तोंडानें सगळे बोलले. आणि धोंड्या, गंग्या, पांड्या अशा सगळ्यांनीं आप्पा भुइट्याचे पाय धरले. लेकुरवाळ्या बायांनीं आपलीं तान्हीं मुलें त्यांच्या पायावर ठेवली. मग सगळे मांगगारुडी आप्पा भुइट्या मागोमाग गावांत निघाले....

आप्पा भुइट्याचें घर गांवच्या उगवतीला. दारांत ऐसपैस मोकळी पडीक जागा. त्या जागेंत मांगगारुड्यांनीं आपल्या झोपड्या उभ्या केल्या. गवतकाडीने शेकारून काढल्या. आप्पाच्या पडीक जागेंत वस्ती आली. मांगगारुडी गावच्या मळेकऱ्यांच्या शेतांत रोजगारानें कामाला जात असत. बाया-पोरें भांगलण करायला, गवतकाडी आणायला जात. धन्या जनावरांची दलाली-हेडी करावयाला गावोंगावचे बाजार करी. कुणी म्हशी भादरा-वयाला जात. जो तो आपापलें काम करी व पोट भरी.

दिवसानें दिवस गेले. आणि धोंड्या, गंग्या, पांड्या हे सर्व मांगगारुडी आप्पा भुइट्याच्या पक्के नादीं लागले. त्यांची निशापाणी होई व अप्पाच्या सोप्यांत बसून रात्रभर बेत चाले....

धोंड्या, पांड्या, गंग्या, चार दुसऱ्या तरण्याबांड पोरांना घेऊन बाजाराला म्हणून जात. रात्रभर तिकडेच काढून पहाटे पहाटे घरीं अंधारांत आप्पाला भेटत व त्याच्याशीं कानगोष्टी करीत....

ते तिघे डाके टाकूं लागले. आणि आप्पा ते जिरवूं लागला....या मांग-गारुड्यांच्या घरांत रोजच सागुतीचा वास येऊं लागला. आणि निशा-पाण्याच्या गुंगींत धन्याला वाईट-वकटें बोलूं लागले. त्याच्या अंगावर मारण्यासाठीं धावूं लागले. धन्या कळना गडी, 'निशा उतरल्यावर ठिकाणावर येतील,' म्हणून तो सगळ्या गोष्टी डोळ्याआड टाकी व पुन्हां चार चांगल्या हिताच्या गोष्टी धोंड्या, पांड्या, गंग्याला सांगी, शिकवी. ते शुद्धीवर आल्यावर त्याचे पाय धरीत....

महिन्यामागें महिने गेले. एक वर्षाचा काळ पालटून गेला...धन्या तसा जिभेनें गोड, वागण्यांत सरळ त्यामुळें चार चांगल्यांच्या ओळखीचा फायदा झाला; आणि गांवच्या ओढ्याकांठची सरकारी पडीक जमीन सगळ्या मांग-गारुड्यांसाठीं त्यानें मिळविली. धन्याची मनांतली आशा पुरी झाली. त्याच्या अपेक्षेपेक्षां किती तरी लवकर ही गोष्ट घडली.

जमीन चांगली गाळमातीची. पाणस्थळाची. विहीर पाडली तर मुसांडा लागेल अशी. त्यांतच ताई-आईच्या देवळामागें लवणांत.

आतां आपलें नशीब फळाला आलें....मागची इडापिडा कायमची गेली, कायम एका ठिकाणीं ताई-आईच्या आवारांत वस्ती करावयाला मिळाली, म्हणून सगळे मांगगारुडी हारकून गेले. ते पडीक जमिनींत कामाला लागले. रात्रंदिवस कष्ट केले. झाडें-झुडपें तोडलीं. जमिनीची चांगली मेहनत-मशागत केली. जमीन रंगा-रूपाला आणली. त्यांत पेरा केला. पहिल्याच वर्षीं मना-सारखें पीक आलें.

मांगगारुड्यांनी आप्पाच्या दारांतल्या झोपड्या मोडल्या, आपल्या स्वतःच्या जमिनींत कायमचीं घरें उभीं केलीं. आडरानांत ओढ्याकांठीं वस्ती वाढली. देवीच्या आवारांत कायमचे दिवे लागले. चुली पेटल्या. सांज-सकाळ धूर निघूं लागला....

आप्पा भुइट्याच्या दारांतून मांगगारुड्याची वस्ती उठली आणि ती दूर गेली. त्याचा त्यांत मोठा तोटा झाला. पैशाला लालचावलेलें आप्पा भुइट्याचें मन जळफळूं लागलें. मांगगारुड्याबाबत तो मनांत खार खाऊं लागला; आणि मांगगारुड्यांना डावांत पकडण्यासाठींच विचारांत गुंग होऊं लागला; मांगगारुड्यांनीं पुन्हां पुन्हां सरकार-दरबारीं पैशाची याचना केली. त्यांना पैशाची मदत मिळाली. त्यांत त्यांनीं बैल-बारदाना केला. मांगगारुड्यांनीं, गडी-बायांनी श्रम केले, घाम गाळला. ओढ्याकांठीं जमिनींत विहीर पाडली. विहिरीला जिवंत पाण्याचा मुसांडा लागला.

मांगगारुड्याचें चांगलें झालें. त्यांचे पाय या गांवांत पक्के रोवूं लागले. त्यांची वेल-वस्ती वाढूं लागली. रोजची पोटभर भाकरी मिळूं लागली. कुणाचें एक नाहीं दोन नाहीं. ते आपल्या जमिनींत राबूं लागले. जमिनींतून पिकांच्या रूपांत सोनें काढूं लागले.

——आणि ही गोष्ट आप्पा भुइट्याच्या जिव्हारीं लागून राहिली.

मांगगारुडी कोण....कुठले....डोळ्यादेखत गांवांत आले काय — अन् त्यांनीं मोठा मनासारखा बागायती मळा उभा केला काय ? दिवसें-दिवस बळावूंच लागले, म्हणून गांवकऱ्यांच्या डोळ्यांत ते सलूं लागले.

आप्पा भुइटे गांवाच्या कर्त्या गड्यांच्या कानीं लागला व आपल्याच मनांतले गांवच्या मनांत आहे हें त्यानें हेरलें, ताबडतोब 'मुरल्या रानांत पेरा करावा' हें ओळखून आप्पा भुइटे गांवच्या चार पुढाकार, मंडळींना घेऊन तालुक्याला फोजदार कचेरींत हेलपाटे मारूं लागला. गांवांत चावडी-वर, आप्पाच्या सोप्यांत बैठकी बसूं लागल्या. बेत पक्का झाला आणि ठरावाप्रमाणें आप्पा व चार गडी गांवांत घरोघर मळ्यावस्तीवर जाऊन लोकांच्या सह्या-आंगठे घेऊं लागले. लिहिलेल्या कोऱ्या कागदावर आंगठे द्यावयाचें काम झालें व तें प्रकरण आप्पा भुइट्यानें थेट तालुक्याला धाडलें....

सालाकाठची ताय-आईची जत्रा जवळ आली होती. मांगगारुड्यांची बैठक बसली. मोठी जत्रा करावयाचें सगळ्या मांगगारुड्यांनीं ठरविलें. पै पाहुणें बोलावावयाचें ठरलें आणि बैठक संपली.

धन्या जेवायला बसला आणि काय झालें . . . ? गप्पकन् दिवाच गेला. . . धन्या तसाच अंधारांत जेवत बसला. . .

दिवस उजाडला. न्याहारीच्या वक्ताला धन्याच्या दारांत एकदम दोन पोलिस उभे राहिले. धन्या जेवतां जेवतां हातांतला घास तसाच ताटात गळून पडला. बाहेर येऊन त्यानें हात धुतला व विचारलें.

" हवालदार ! कां एकाएकीं येणं केलं ? "

" अरे अगोदर सगळ्या मांगगारुड्यांना बोलावून आण. "

" काय तें मला तरी बोला ! "

" प्रथम सगळ्यांना बोलाव ! "

धन्याला कांहींच कळेना. तो मनांत गोंधळून गेला. त्यानें सगळ्यांना हाळी मारली. धोंड्या, पांड्या, शिरप्या, गंग्या इतर सगळे आले. ' पोलिस कां एकाएकीं वस्तींत आले ? ' म्हणून बायका-मुलेंहि कावऱ्या-बावऱ्या चेहऱ्यानें पुढें आलीं.

हवालदारानें पंधरा नांवें वाचलीं. त्यांत धन्या होता व बाकी सगळेच गडी व बाया होत्या. लहान मुलें फक्त वगळलीं होतीं. हवालदारानें प्रत्येकाच्या सह्या, आंगठे घेतले व त्यांना प्रत्येकीं एक एक कागद दिला आणि शेवटीं हवालदारानें एकाचा कागद वाचला.

" तुम्ही...मांगगारुडी गांवांत, मळ्यावस्तीवर, आजूबाजूच्या गांवांत गुन्हे करतां, दहशती बसवितां. तुम्ही दाखलेबाज आहांत. म्हणून तुम्हांला हद्दपार करण्यांत येत आहे. तुम्हीं येत्या मंगळवारीं गांव सोडलें पाहिजे. नाहींतर तुम्हांला अटक होऊन कायदेशीर इलाज होईल ! "

हें ऐकून धन्याच्या हातांतला कागद खालीं गळून पडला. गडी मटकन् खालीं माना घालून बसले....भरल्या पिकाकडे बघूं लागले. बायका उभ्या पिकांकडे बघून डोळ्यांतून आंसवें गाळूं लागल्या.

सगळ्या गांवांत ही गोष्ट झाली आणि धन्या व इतर गडी आप्पा भुईस्याकडे धावले व त्याचे पाय धरून म्हणाले, " मालक ! आतां तुमीच आमाला यांतनं वांचवा ! "

"लेकांनो ! तुमी सापासारखं उलटलां. मी कशाला तुमचा फास माझ्या गळ्याला घेऊं !"

अप्पा भुईटे असं म्हणताच, धन्या व इतर पंधरा मांगगारुडी बाया-मुलांसह जिल्ह्याच्या कचेरीला निघाले....

धन्यानें मांगगारुड्याची सगळी पोरं, गडी-बायांना कलेक्टरसाहेबांच्या पुढें उभे राहिले व त्यांच्या करुण कहाणीचा लेखी जबाब त्यांच्या पुढें झाला....

...."आम्ही गुन्हेगार....पण माणसांत आलों....पुन्हां माणसांतून आम्हांला बाहेर लोटूं नका व आमच्या तोंडांतला घास काढूं नका...."

कलेक्टरसाहेबांनीं जबाब लक्षपूर्वक ऐकले. मांगगारुड्यांना आडवे तिडवे प्रश्न विचारले आणि केलेलें पीक हातीं पडेपर्यंत सगळ्यांची हद्दपारी तहकूब केली...व तसे खालीं हुकूम सुटले.

कांहीं का असेना, कांहीं दिवस तरी हद्दपारी तहकूब झाली. पुढचें पुढें पाहूं म्हणून मांगगारुड्यांना समाधान झालें आणि ते सगळे लागलीच गांवाकडे निघाले.

मांगगारुड्यांची हद्दपारी तहकूब झाली—ही बातमी सगळ्या गांवांत कळली. मांगगारुड्यांनीं पुन्हां गांवांवर कडी केली, म्हणून गांव चिडलें, पुन्हां विचार करूं लागलें. त्यांच्या बैठकी होऊं लागल्या. आप्पा भुईटे पुन्हा घरोघर फिरूं लागला. कर्त्या गांवकऱ्यांशीं कानगोष्टी करूं लागला. आणि गांवकऱ्यांच्या बैठकीवर बैठकी झाल्या, आणि त्यांचा विचार पक्का झाला...

मांगगारुड्यांच्या शेतांत मनासारखें पीक आलें होतें. जोंधळा रसरशीत हुरड्यांत आला होता. मका काढणीला आली होती. पाण्यावरची खपली हिरवीगार होती. त्यांत गाजरें, रताळीं व माळवे पाहून मन हारपून जात होतें. वाटेचे वाटसरू जातां-येतां घटकाभर मळ्यापाशीं थांबत. मळ्यांतल्या पिकांकडे टकाटका हावऱ्या नजरेनें बघत. माघाची 'पुनव' आली. 'पुनवे'-लाच ताय-आईची जत्रा ! आलेली वेळ गेली, म्हणून ताय-आईच्या जत्रेला मांगगारुडी मोठ्या उत्साहानें, जोरांत तयारीला लागले. मांगगारुड्यांच्या घरोघर बकरीं पडणार होतीं. [illegible] लागले. ताय-आईच्या देवळाला रंग दिला. [illegible] केली.

IRBK-0108989

दुसऱ्या दिवशीं पौर्णिमा. जेवण्या-खाण्यांचा, बायामुलांच्या कपडालत्त्याचा बाजार केला पाहिजे म्हणून धन्या, पांड्या, धोंड्या, शिरप्पा, गंग्या असे सगळे कर्ते गडी बाजार आणावयाला तालुक्याला गेले.

× × ×

....गांवकऱ्यांचा रात्रीचा बेत झाला व पूर्णिमा साजरी करायची ठरली. सरकार कांहीं का म्हणेना, गुन्हेगारांची आवलाद आमच्या शेजारीं नको.... म्हणून...

रातोरात सगळ्या गांवानें मांगगारुड्यांच्या वस्तीला वेढा दिला. घरांना बाहेरून कड्या घातल्या. गांव मांगगारुड्याच्या शेतांत घुसले. उभें पीक कापलें गेलें. पिकाची लूट झाली. त्यांतच सगळ्या गांवचीं जनावरें रात्रभर शेतांत चरलीं. पिकाची नासधूस झाली. सगळा उभा भरला मळा उद्ध्वस्त झाला. जनावरें हाकलून देण्यांत आलीं. आणि त्यांतच माथें बिघडलेले गांवकरी विहिरीवर गेले. विहिरीचें थारोळें त्यांनीं पाडलें. मग त्यांचें मन शांत झालें...व 'तायआईचें चांगभलंऽऽ' असा जयजयकार करून गांवच्या वेशीच्या आंत ते निघून गेले.

....जत्रेसाठीं बाजारहाट केला नि धन्या व इतर गडी दिवस उगवावयाला आपल्या वस्तीजवळच्या ओढ्यांत उतरले. ओढ्याची दरड चढून वस्तीची वाट धरली आणि ओढ्याची टिटवी धन्या व इतर गड्यांच्या अंगावरून ओरडत वस्तीकडे सरकली....

आणि धन्या व इतर गडी पुढें येतात तोंच त्यांना वस्तींत सगळा कालवा दिसला....व सगळ्या मळ्याचा डोंबाळा झालेला दिसला. एकाएकी मळ्यावर कां काळ? हें बघून धन्या घेरी येऊन मटकन् खालींच बसला व दोन्ही हातांनीं डोकें धरून, हळहळून विव्हळला, "अरं! अरं!! अन्नांत माती कीं कालवली...!" बाकीचे गडी नेटानें ढांगा टाकीत वस्तीवर गेले... कावऱ्या बावऱ्या नजरा. निराश चेहरे. उद्ध्वस्त मनोराज्यें....

...मांगगारुड्यांचीं बाया-पोरें उद्ध्वस्त मळ्यांत फिरत होतीं. जोंधळ्याचें एक एक ताट उचलीत होतीं. मातींत रुतलेलें एक एक हुरड्याचें कणीस उचलून ओटीला ठेवीत होतीं... व डोळ्याचीं आसवें पुशीत होतीं. लहान

पोरें चिखलानें भरलेल्या मक्याच्या किरळ्या उचलून, पुसून कुरतडीत, सगळा मळा धुंडाळीत होतीं. आंब्याचे, लिंबाचे तोडून पाडलेले बांड बघून, गडी हळहळत होते. कळतीं पोरें हुसकलेल्या जनावरांपाठीमागें पळालीं होतीं.

आणि मांगगारुड्यांचा सगळा मळा उद्‌ध्वस्त झाला होता....

मळ्याची राखरांगोळी झाली... हातातोंडाला आलेलें पीक गेलें. वेळ भरली...तहकूब झालेली हद्दपारी पुन्हां आली. आणि मांगगारुड्यांची सगळी वस्ती उठली....

दिवस उगवतांना गाठोडीं, बोचकीं व जनावरें घेऊन सगळे मांगगारुडी ताईआईच्या देवळाजवळ आले. धन्या देवीच्या पुढें गेला व ताई आईला हात जोडून बोलला, ' आय ! तूं आतां आमाला कुठं नेणार....? '

...आणि मग तो सगळा तांडा दिसेल त्या मार्गानें, फुटेल त्या वाटेनें पुढें चालला... लांब लांब टेकडीच्या चढणाला लागला...

म. ग्रं. सं. ठाणे,
दा. क्र. ८०८९
दि. ७।-७।
राज्य ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम